# आपण जवळजवळ तिथं पोहोचलोच आहोत !!!

जगाच्या अंताशी आपण जवळजवळ पोहोचलोच आहोत, यासंबंधातील जो भरपूर पुरावा बायबलमध्ये आहे, त्याबद्दल जास्तीतजास्त लोकांना सावध करणं हा या पुस्तकाचा उद्देश आहे, आणि आम्हाला त्याबद्दल कोणतीही दिलगिरी नाही. एदेनाच्या बागेत, जेव्हां आदाम आणि हव्वा यांनी देवाचा आज्ञाभंग केला, तेव्हां सुरु झालेल्या न्यायप्रक्रियेची पूर्तता, मनुष्यजातीचा सर्वोच्च सत्ताधीश, येशू ख्रिस्त, जेव्हां करील, तो भयंकर आणि भयानक क्षण म्हणजे जगाचा अंत.

हॅरॉल्ड कॅम्पिंग / फॅमिली रेडिओ

आपण जवळजवळ तिथं पोहोचलोच आहोत !!!
(We Are Almost There-Marathi))
Harrold Camping

Family Stations, Inc.
Oakland, CA 94621

Internet: www.familyradio.com

04-20-09

# अनुक्रमणिका


प्रकरण १. वैभवशाली ईश्वरी वचन........................................................................ 1
देवाचा अलिखित कायदा ........................................................................ 1
प्रकटीकरणाचा तिसरा कालखंड........................................................................ 2
बायबलचा अर्थ लावणं ........................................................................ 3
शेवटी, देवाच्या तारणयोजनेचं संपूर्ण प्रकटीकरण........................................................................ 4

प्रकरण २. बायबल इतिहासाची कालरेषा देतं........................................................................ 6
देवाच्या तारणयोजनेचा उलगडा म्हणजे इतिहासाची कालरेषा........................................................................ 7
इस्राएल आणि ख्रिस्तपूर्व १४४७ ते इसवी सन ३३ साल ही वर्षे ........................................................................ 7
मंडळीयुगाची सुरुवात........................................................................ 9
दोषी मंडळीची बायबलला पूर्वकल्पन ........................................................................10
मंडळींमधील सैतानाचा प्रश्न ........................................................................ 12
सबंध बायबल म्हणजे बिनचूक ईश्वरी वचन आहे काय? ........................................................................ 14
मंडळीयुगाचा अंत होईल........................................................................ 15

प्रकरण ३. अंताचं आकलन पुढे ढकलण्याची देवाची योजना........................................................................17
आता आपण आकलन होण्याच्या काळात आहोत........................................................................ 18
काळाचे महत्त्वाचे टप्पे सणांच्या दिवसाशी जोडलेले आहेत........................................................................ 23
तारणाच्या महत्त्वाच्या घटनांची बिनचूकता........................................................................ 25
आध्यात्मिक सत्य समजाविण्यासाठी देवानं मंदिराचा वापर केला........................................................................ 26
मंदिराच्या समर्पणाची माहिती काळाची महत्वपूर्ण माहिती देते ........................................................................ 27
आठवा दिवस, २१ ऑक्टोबर, २०११........................................................................ 28
मांडवांच्या सणावर आणखी एक नजर........................................................................ 29

प्रकरण ४. आपण जगाच्या अंताच्या वेळापत्रकासाठीचा आपला शोध सुरू करू ........................................................................ 32
मंडळीयुगाच्या अंताची तारीख ........................................................................ 38

प्रकरण ५. इतिहासाच्या कालरेषेचं आपलं आकलन बिनचूक आहे काय?........................................................................ 43
जगाचा १३,००० वा वर्धापन दिन ........................................................................ 45
एक दिवस म्हणजे हजार वर्षे........................................................................ 48
शेवटचे पांच महिने ........................................................................ 50
आणखी अविश्वसनीय माहिती ........................................................................ 51
प्रायश्चित्तापासून हवेत वर उचललं जाण्यापर्यंत : ७२२,५०० दिवस........................................................................ 52

आणखी पुरावे ........ 53
प्रचंड जनसमुदाय तारला जात असताना देवाची न्यायप्रक्रिया चालू आहे ........ 54

प्रकरण ६. माझ्यासाठी आशा आहे का?........ 56
ज्यांनी कधीच ऐकलेलं नाही ते........ 57
ज्यांनी ऐकलेलं आहे पण जे उपहास करतात ते ........ 57
बायबलचं आज्ञापालन करायचं असतं असा ज्यांचा नम्र विश्वास असतो ते ........ 59
ज्याला कान आहेत तो ऐको........ 60

# प्रस्तावना

**जगाच्या अंताशी आपण जवळजवळ पोहोचलोच आहोत, यासंबंधातील जो पुरावा बायबलमध्ये आहे, त्याबद्दल जास्तीतजास्त लोकांना सावध करणं हा या पुस्तकाचा उद्देश आहे, आणि आम्हाला त्याबद्दल कोणतीही दिलगिरी नाही. एदेनाच्या बागेत, जेव्हां आदाम आणि हव्वा यांनी देवाचा आज्ञाभंग केला, तेव्हां सुरु झालेल्या न्यायप्रक्रियेची पूर्तता, मनुष्यजातीचा सर्वोच्च सत्ताधीश, येशू ख्रिस्त, जेव्हां करील, तो भयंकर आणि भयानक क्षण म्हणजे जगाचा अंत.**

तारल्या न गेलेल्या प्रत्येक व्यक्तीला देवाचा संपूर्ण कोप सहन करावा लागेल. जर ख्रिस्तानं तुमच्या पापांचा दंड भरला नसेल, तर तुम्हाला देवाचा संपूर्ण कोप सहन करावा लागेल.

या प्रकारच्या माहितीबद्दल बोलायला कोणालाच आवडत नाही. यापेक्षा अधिक निराशाजनक कांहीच असू शकत नाही. ते पूर्णपणे नाकारत राहाणं, आणि न्यायदिवसाबद्दलचं हे सर्व बोलणं म्हणजे निव्वळ बोलणंच आहे आणि त्याच्याकडे गंभीरपणे बघण्याची कांही गरज नाही, अशी मनातल्या मनात आशा करत राहाणं, हे पुष्कळच जास्त सोपं आहे.

तथापि, जेव्हां आपल्याला कळतं की बायबल सर्वस्वी सत्य आणि प्रमाण मानण्याजोगं आहे, तेव्हां त्या भीतिदायक घटनेबद्दल बायबल जे सर्व कांही शिकवितं, ते जगाला सांगण्याची आपल्याला आज्ञा मिळते. ख्रिस्तावर खरोखर विश्वास ठेवणाऱ्यांना त्यावाचून पर्याय नाही. येऊ घातलेल्या निवाड्यासंबंधी त्यांनी जगाला सावध केलंच पाहिजे. उदाहरणादाखल, ४० दिवसांत देव निनवेतील लोकांचा नाश करील, अशी सावधगिरीची सूचना निनवेच्या त्या दुष्ट नगरात जाऊन तेथील लोकांना देण्याची आज्ञा देवानं योना संदेष्ट्याला दिली. ती भयंकर बातमी निनवेला घेऊन जाण्याचा योनाला अजिबात आनंद वाटत नव्हता, पण, शेवटी, त्यानं आज्ञापालन केलं. अद्भुतरीत्या, निनवेतील लोकांनी पश्चात्ताप केला, आणि विनम्रपणे देवाकडे याचना केली आणि अशी आशा केली की कदाचित देव त्यांच्यावर दया करेल. आणि देवाला त्यांची दया आली आणि देवानं त्यांच्या नगराचा नाश केला नाही.

आजची परिस्थिती तशीच आहे, एवढंच की, आता सबंध जग दृष्टिक्षेपात आहे. ४० दिवसांऐवजी, चार वर्षांहून कमी काळ उरला आहे. जरी निनवेच्या सबंध नगरानं पश्चात्ताप केला, तरी आपल्या काळातील सबंध जग पश्चात्ताप करणार नाही. तथापि, चांगली बातमी ही आहे की बायबल जाहीर करतं की कोणाही माणसाला मोजता येणार नाही, एवढा मोठा जनसमुदाय विनम्रपणे देवाकडे दयेची याचना करील, आणि ज्या लोकांना देवानं तारणासाठी निवडलं आहे, अशा लोकांच्या एका महान पिकाला सार्वकालिक जीवन दिलं जाईल, आणि त्यांच्या पापांमुळे ते देवाच्या ज्या निवाड्याला लायक आहेत, त्यातून त्यांची सुटका होईल.

एक असं सर्वसाधारण विधान छातीठोकपणे केलं जातं, विशेषतः स्थानिक मंडळीच्या सदस्यांकडून, की ख्रिस्त रात्री चोरासारखा येईल. अशा प्रकारे, ते असा दावा करतात की जगाच्या अंताच्या वेळेबद्दल देव काय म्हणतो, ते बायबलमधून शिकण्यात कोणालाही रस असू नये.

या प्रिय लोकांचं बरोबर आहे. बायबल असं नक्कीच शिकवितं की पुष्कळ लोकांसाठी ख्रिस्त रात्रीच्या चोरासारखा येईल. थेस्सलनीकाकरांस पहिले पत्र ५:२–३ मध्ये आपण वाचतो :

> **कारण तुम्हांला स्वतःला पक्के माहीत आहे की, जसा रात्री चोर येतो, तसाच प्रभूचा दिवस येतो. शांति आहे, निर्भय आहे असे ते म्हणतात तेव्हां गरोदर स्त्रीला ज्याप्रमाणे अकस्मात वेदना होतात त्याप्रमाणे त्यांचा अकस्मात नाश होतो, आणि ते निभावणारच नाहीत.**

पण मग पदे ४–६ मध्ये बायबल म्हणतं :

> **बंधुजनहो, त्या दिवसाने चोरासारखे तुम्हांस गाठावे असे तुम्ही अंधारात नाही. कारण तुम्ही सगळे प्रकाशाची प्रजा व दिवसाची प्रजा आहा. आपण रात्रीचे व अंधाराचे नाही; ह्यावरून आपण इतरांसारखी झोप घेऊ नये, तर जागे व सावध राहावे.**

ही पदं असं शिकवित आहेत की ह्या जगात दोन प्रकारचे लोक आहेत, जे ओळखतात की ह्या जगाचा अंत होणार आहे, ज्या वेळी देव श्रद्धाळूंना तारल्या न गेलेल्यांपासून वेगळं करील. दोन्ही गटांना माहीत आहे की तारल्या न गेलेल्यांना देवाचा संपूर्ण कोप सोसावा लागेल, व जे तारले गेले असतील ते सर्व काळ ख्रिस्ताबरोबर परमानंदात व वैभवात असतील.

एका गटात अशा लोकांचा समावेश होतो, ज्यांना असा विश्वास आहे की ते तारले गेले आहेत, पण वास्तवात, ते तारले गेलेले नाहीत. त्यांना माहीत नाही आहे की आपल्या काळात बायबलमध्ये देवानं इतिहासाच्या कालरेषेशी संबंधित पुष्कळ माहिती उघड केली आहे, अगदी जगाच्या अंतापर्यंत, व बायबल जे सर्व कांही शिकवितं ते शिकण्याचा प्रयत्न करण्याची त्यांना फिकिर नाही. त्यांना खात्री आहे की ते तारले गेले आहेत, व म्हणून, ख्रिस्त खरोखर केव्हां येईल ह्यामुळे त्यांना काही फरक पडत नाही. त्यांच्यासाठी, तो रात्री येणाऱ्या चोराप्रमाणे येईल. पण दुःखद गोष्ट अशी की, ही पदं शिकवितात की जेव्हां ख्रिस्त येईल तेव्हां त्यांचा **"अकस्मात नाश"** होईल. बायबल जे शिकवितं त्याबद्दल जमेल तेवढं माहीत करून घेण्यामध्ये रस न घेऊन ते असं दाखवून देत आहेत की ते तारले गेलेले नाहीत, व अजूनही त्यांच्यावर देवाचा भयंकर कोप लागू आहे.

पण पुष्कळ लोक असेही आहेत जे त्यांच्या बायबलवरील प्रेम व आदरामुळे असं शिकले आहेत की इतिहासाच्या कालरेषेबद्दल बायबल पुष्कळ माहिती देतं. अशा तऱ्हेने, अंतसमयीच्या घटनांसंबंधी, तसंच ह्या घटनांच्या वेळापत्रकासंबंधी, पुष्कळ बारकावे त्यांना कळले आहेत. बायबल त्यांचा **"पहारेकरी"** असा उल्लेख करतं (यहेज्केल ३३:२–९), अशा अर्थाने की येऊ घातलेला जगाचा अंत, जो एवढा जवळ आला आहे, त्याबद्दल जगातील तारल्या न गेलेल्यांना ते सावध करू शकतात.

हे पुस्तक अशासाठी लिहिलं गेलं, की जेणेकरून आशादायकपणे, जग ज्या बिकट अवस्थेत आहे, तिचं संपूर्ण गांभीर्य, तुम्ही सुद्धा ओळखाल. जगाच्या अंतासाठी देवाची जी योजना आहे, ती बदलण्याचा कुठलाही मार्ग नाही. तथापि, हे शक्य आहे की देवाच्या अद्भुत तारणरूपी दयेच्या द्वारे ज्यांची त्याच्या कोपापासून सुटका होणार आहे, अशा लोकांपैकी तुम्ही सुद्धा एक होऊ शकाल.

देव जसा जगासमोर त्याची तारणयोजना उघड करतो, तसं जगाच्या संपूर्ण इतिहासकाळातील त्याच्या कृत्यांकडे ह्या पुस्तकात आपण थोडक्यात पाहू. विशेषकरून पृथ्वीच्या इतिहासाचा अंतिम कालावधि हा आपला केंद्रबिंदू असेल, जेव्हां दोन घटना एकाचवेळी घडत आहेत. या घटना म्हणजे देवाच्या न्यायप्रक्रियेची पूर्तता आणि कोणाही माणसाला मोजता येणार नाही एवढा प्रचंड जनसमुदाय तारला जाणं.

ह्या पुस्तकात, विविध ऐतिहासिक तसंच भावी घटनांच्या तारखा दिल्या गेल्या आहेत. ह्या तारखांसाठीच्या बायबलमधील आणखी पुराव्यांची पडताळणी करण्याची व त्या तारखांशी जोडल्या गेलेल्या घटनांची तपशीलवार माहिती शोधून काढण्याची इच्छा ज्या लोकांना असेल, त्यांनी फॅमिली स्टेशन्सला फोन करावा किंवा पत्र लिहावं अशी आमची विनंति आहे, जेणेकरून आम्ही त्यांना कांही मोफत पुस्तकं पाठवू शकू, ज्यातून त्या लोकांना दिसेल की ही सर्व माहिती बायबलमधून आलेली आहे, व ती कुठल्याही प्रकारच्या तर्कावर किंवा अंदाजावर आधारित नाही. या पुस्तकांमध्ये खालील शीर्षकांच्या पुस्तकांचा समावेश आहे.

*काळाला अंत आहे*
*मंडळीयुगाचा अंत आणि त्यानंतर*
*गहू आणि निदण*
*बायबलच्या अभ्यासाची आद्य तत्वं*
*देव मला तारील अशी मी आशा करतो*
*आदाम केव्हां?*

# प्रकरण १. वैभवशाली ईश्वरी वचन

जग काळाच्या अंताच्या अगदी जवळ आहे ही भीतिदायक कल्पना समजण्यासाठी ईश्वरी वचनाच्या, म्हणजे बायबलच्या स्वरूपाचं व अधिकाराचं स्पष्ट आकलन होणं आवश्यक आहे. आपल्याला जर देवाकडून सत्य कळायला हवं असेल, तर बायबल जी मूलभूत तत्वं मांडतं, त्यांचं पालन आपण केलं पाहिजे. ज्याला कोणाला ही भीतिदायक कल्पना समजून घेण्याची इच्छा असेल, त्याच्या मनात ही तत्वं पूर्णपणे रुजली पाहिजेत.

बायबल म्हणजे ईश्वरी वचन. बायबलच्या मूळ भाषांमध्ये, विशेषतः, इब्री आणि हेल्लेणी, प्रत्येक शब्द, आणि प्रत्येक शब्दातील प्रत्येक अक्षर देवाच्या मुखातून आलेलं आहे. म्हणून, बायबलच्या मूळ भाषांमधील कोणत्याही शब्दावर किंवा शब्दप्रयोगावर कोणाही मनुष्याचा किंवा मंडळीसंस्थेचा कसलाही अधिकार आहे ही कल्पनाच कधीही स्वीकारली जाऊ नये. देवानं मूळ इब्री आणि हेल्लेणी हस्तलिखितांच्या सर्वात प्राचीन प्रती सुरक्षित ठेवल्या आहेत, जेणेकरून आपल्याला खात्री मिळू शकते की आपल्याकडे थेट देवाच्या मुखातून आलेलं मूळ ईश्वरी वचन आहे. राजा याकोब इंग्रजी भाषांतरासाठी, तसंच त्या काळातील इतर भाषांतरांसाठी ज्या हस्तलिखितांचा उपयोग केला गेला, ती देवानं सुरक्षित ठेवलेली हस्तलिखितं आहेत. हे खरं की, बायबलमधील कोणत्याही शिकवणुकीचा अभ्यास करतांना, बायबलच्या कोणाही गंभीर शिक्षकानं भाषांतरकाराचं काम नेहमीच तपासलं पाहिजे आणि ज्या दुरुस्त्यांची गरज भासेल, त्या केल्या पाहिजेत.

सबंध बायबल म्हणजे देवाचं सर्वोच्च कायद्याचं पुस्तक, आणि प्रत्येक मनुष्यानं त्याचं काटेकोरपणे पालन केलं पाहिजे. देवाचं कायद्याचं पुस्तक म्हणून, बायबल असा नियम घालून देतं की देवाच्या कायद्याचं कोणत्याही प्रकारे उल्लंघन करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला नरकदंडाची शिक्षा दिली जाईल. (रोमकरांस पत्र ६:२३; याकोबाचे पत्र २:१०).

बायबल म्हणजे देवाचा तारणाचा संदेश. म्हणजे, देवाच्या कायद्यात या अद्‌भुत सुवार्तेचा समावेश आहे, की पापासाठीच्या शिक्षेपासून, म्हणजे सार्वकालिक नरकदंडापासून वाचविण्यासाठी देवानं ज्या लोकांना निवडलं, त्यांच्या वतीनं देवाच्या कोपाची शिक्षा भोगण्यासाठी देव स्वतः, प्रभु येशू ख्रिस्ताच्या रूपात, बदली मनुष्य झाला.

बायबल हे स्वतःच स्वतःचा शब्दकोष आणि भाष्य असतं. प्रत्येक शब्दन् शब्द, वाक्यन् वाक्य, तत्त्वन् तत्त्व, वगैरे समजून घेण्यासाठी त्या त्या शब्दाचा किंवा तत्त्वाचा बायबलमध्ये इतरत्र कसा वापर केला आहे हे तपासून पाहावं लागतं. बायबलमधील कोणत्याही धर्मोपदेशासंबंधीच्या कोणत्याही निष्कर्षाची काळजीपूर्वक तपासणी सबंध बायबलमध्ये केली पाहिजे व याची पडताळणी केली पाहिजे की बायबलमधील इतर सर्व सत्यांशी तो निष्कर्ष सुसंगत आहे ना आणि हे केल्याशिवाय तो स्वीकारता कामा नये. करिंथकरांस पहिले पत्र २:१३ मध्ये देव आज्ञा देतो :

> **ते आम्ही मानवी ज्ञानाने शिकविलेल्या शदांनी नव्हे, तर आत्म्याने शिकविलेल्या शब्दांनी, आध्यात्मिक गोष्टींबरोबर आध्यात्मिक गोष्टींची संगति लावून सांगतो.**

**देवाचा अलिखित कायदा**

देवदयेनं, देवानं देवाच्या कायद्याची लिखित स्वरूपातील प्रत दिली आहे. तो लिखित कायदा म्हणजे, बायबल, ईश्वरी वचन. तो कायदा म्हणजे देवाचा मानवजातीसोबतचा करार सुद्धा आहे, आणि त्याला सुवार्ता, तसंच जुना आणि नवा करार म्हटलं जातं. अशा प्रकारे, “कायदा”, किंवा “आज्ञा”, किंवा “करार”, किंवा “सुवार्ता”, किंवा “वचन” असे कोणतेही शब्द बायबल वापरत असलं, तरी ते केवळ बायबलबद्दलच बोलत असतं. हे सर्व शब्द समानार्थी आहेत.

बायबल मानवजातीला दोन वेगळ्या भागांमध्ये दिलं गेलं, पण देवानं बायबल अशा पद्धतीनं लिहिलं की बायबलमधील सत्यं मनुष्यजातीकडे तीन भागांमध्ये उघड केली गेली.

लिखित ईश्वरी वचनाचा पहिला भाग जुन्या करारात दिला गेला. जुन्या कराराचं लिखाण खिस्तपूर्व १४४७ या वर्षी चालू केलं गेलं जेव्हां देवानं इस्राएलाला दहा आज्ञा आणि इतर अनेक कायदे घालून दिले. त्याच वेळी, सृष्टीची निर्मिती, पापाचा जगात प्रवेश, आणि नोहाच्या काळातील प्रलय यासंबंधातील अनेक सत्यं त्यानं या कराराच्या किंवा कायद्याच्या पुस्तकात लिहिली, व अशा अनेक आज्ञा पण त्यानं त्यात लिहिल्या, ज्यांनी मनुष्यजातीला असलेल्या तारणहाराच्या गरजेवर जोर दिला. खिस्तपूर्व ३९१ सालापर्यंत देवानं जुना करार लिहिणं चालू ठेवलं.

तथापि, देवानं जुना करार अशा पद्धतीनं लिहिला की जुन्या करारात समाविष्ट असलेल्या सत्यांपैकी प्रचंड संख्येनं सत्यं मनुष्यजातीकडे अस्पष्टपणेच उघड केली गेली. शिवाय, जुना करार लिहिला गेल्यानंतर कित्येक शतकांपर्यंत छापखान्याचा शोध लागला नसल्याकारणाने, बायबलच्या पहिल्या भागाच्या प्रती जवळजवळ अस्तित्त्वातच नव्हत्या. सुरुवातीला, बायबलच्या पहिल्या भागाच्या फारच थोड्या प्रती उपलब्ध होत्या.

कराराचा दुसरा भाग, ज्याला नवा करार म्हटलं जातं, तो लिहायला देवानं साधारण इसवी सन ३३ मध्ये सुरुवात केली. त्याची पूर्तता साधारणपणे इसवी सन ९५ मध्ये झाली. त्यात पुष्कळशी सत्य दिली गेली, ज्यांच्यामुळे जुना करार कांहीसा अधिक समजण्यास मदत झाली. हे असं झालं याला मुख्य कारण असं की ज्या सर्व लोकांना तारण्याची तारणहार येशू खिस्ताची योजना होती, त्यांच्या वतीनं त्यानं जसा शब्दशः आणि प्रत्यक्षात देवाचा कोप सहन केला, त्याबद्दल बरीच माहिती नव्या करारात दिली गेली. तरी देखील, देवानं नवा करार, जुन्या कराराप्रमाणेच, अशा पद्धतीनं लिहिला की त्यात मांडलेली अनेक सत्यं मंडळीयुगातील खऱ्या श्रद्धाळूंपासून लपून राहावीत. [१]

अशा प्रकारे, जरी सुमारे २,००० वर्षांपासून, बायबल हा एक पूर्ण झालेला, लिखित करार किंवा कायद्याचं पुस्तक आहे, तरी सबंध बायबलभर विखुरलेली अनेक महत्त्वाची सत्यं अगदी सर्वात एकनिष्ठ, देवभीरु आणि देवाचं लेकरु असलेल्या अशा ईश्वरी तत्त्ववेत्त्यांकडे सुद्धा कधीच उघड केली गेली नव्हती. हे गूढ किंवा दडलेले धर्मोपदेश खास करून देवाच्या तारणकार्यक्रमाच्या स्वरूपाशी व वेळेच्या बिनचूक आकलनाशी, तसंच जगाच्या इतिहासाच्या शेवटच्या २३ वर्षांत ज्या महत्त्वाच्या घटना घडतील त्यांच्याशी संबंधित असतात.

**प्रकटीकरणाचा तिसरा कालखंड**

तथापि, आपल्या काळात, जेव्हां आपण अंतसमयाच्या अगदी जवळ आहोत, तेव्हां देव तिसऱ्यांदा, आणखी पुष्कळसं सत्य उघड करत आहे, जे बायबलमध्ये नेहमीचं आहे, पण ते सर्वकाळ गूढ राहिलं आहे. अशा प्रकारे, ते जणू असं आहे की देवानं जुन्या आणि नव्या करारात भर घातली आहे, पण बायबल, अर्थातच, वाढलेलं नाही. कोणत्याही नवीन शब्दांची त्यात प्रत्यक्षात भर घातली गेलेली नाही. बायबल मूळ भाषांमध्ये जसं लिहिलं गेलं, ते जे बायबल आपण आज वापरतो, ते अगदी तेच आहे जे सुमारे १,९०० वर्षांपूर्वी पूर्ण केलं गेलं. एवढंच की, पूर्वी लपविलेल्या सत्यांसाठी, आपल्या काळात, आता देव आपलं आकलन उघडत आहे, तेव्हां सुवार्तेचं संपूर्ण वैभव दिसू शकतं. इब्री ८:८ मध्ये देव जाहीर करतो :

> **लोकांना दोष लावून तो म्हणतो, परमेश्वर म्हणतो, पाहा, असे दिवस येत आहेत की, त्यात इस्राएलाचे घराणे व यहूदाचे घराणे ह्यांच्याबरोबर मी नवा करार करीन.**

या पदात, **"मी नवा करार करीन"** हा शब्दप्रयोग **"मी नवा करार संपवीन"** असा भाषांतरित करायला हवा होता. नवा करार म्हणजे बायबलमधील नवा करार, पण अंतसमयी, आपल्या काळात, कित्येक

---

१ देवानं जेव्हां सुवार्ता आणण्यासाठी मंडळींचा उपयोग केला, त्या कालखंडासाठी आम्ही "मंडळीयुग" हा शब्दप्रयोग वापरतो.

नवीन सत्यांकडे आपले डोळे उघडून, देव त्या कराराचं आपलं आकलन पूर्ण करत आहे. ती नेहमीच बायबलमध्ये आहेत, पण आपल्या काळात, ती आपल्याकडे उघड केली जात आहेत, जेणेकरून आपल्याला ती समजू शकतील. ते जणू असं आहे की देव कराराचं, म्हणजे, बायबलचं लिखाण संपवीत आहे. दानीएल १२:९ सारख्या पदाशी ते तंतोतंत जुळतं :

> **तो म्हणाला, हे दानीएला, तू आपला स्वस्थ राहा; कारण अंतसमयापर्यंत ही वचने गुप्त ठेवून ती मुद्रित केली आहेत.**

**बायबलचा अर्थ लावणं**

जगभरातील जवळपास सर्वच मंडळींना बायबलमधील अनेक सत्यं समजत नाहीत, हे खरोखर दुःखदायक आहे. हे अशामुळे आहे की बायबलचा अर्थ लावण्यासंबंधीच्या बायबलच्या सूचनांचं पालन ते करीत नाहीत. शिवाय, अशी बरीच शक्यता आहे की बहुतेक बायबलच्या शिक्षकांना हे कळत नाही की मूळ भाषांमधील प्रत्येक शब्द देवाच्या मुखातून आलेला आहे, आणि म्हणून, तो अत्यंत महत्त्वाचा तसंच अत्यंत बिनचूक आहे.

प्रत्येक मंडळी, संप्रदाय, ख्रिस्ती विद्यालय वगैरेंना मान्य असलेली बायबलचा अर्थ लावण्याची मानवनिर्मित, ऐतिहासिक, व्याकरणावर आधारित भाषार्थशास्त्राची पद्धत पूर्णपणे नाकारली गेली पाहिजे. बायबलचा अर्थ लावण्याची खरी पद्धत बायबलनुसार ह्या वस्तुस्थितीवर आधारित आहे की बायबल असं शिकवितं की बायबल हे ऐहिक पद्धतीनं लिहिलं गेलेलं एक आध्यात्मिक पुस्तक आहे. ते देवानं लिहिलं असल्यामुळे, प्रत्येक ऐतिहासिक प्रसंग व प्रत्येक संवाद, व बायबलमध्ये नोंद केली गेलेली प्रत्येक घटना अगदी सत्य व विश्वासार्ह आहे. तथापि, ह्या खऱ्या, ऐतिहासिक विधानांचं आध्यात्मिकरीत्या सुद्धा आकलन झालं पाहिजे; म्हणून, अभ्यासल्या जात असलेल्या त्या पदाची आध्यात्मिक शिकवणूक सापडल्याशिवाय, देव मानवजातीला जो खरा अंतिम संदेश बायबलमध्ये देत आहे, तो आपल्याला समजणार नाही.

ह्या भाषार्थशास्त्राच्या तत्वाबद्दल मार्क ४:३३–३४ मध्ये येशू बोलला, जिथं आपण वाचतो :

> **असले पुष्कळ दाखले देऊन, त्यांच्या ग्रहणशक्तीप्रमाणे तो त्यांना संदेश देत असे. आणि दाखल्यांवाचून तो त्यांच्याबरोबर बोलत नसे; तथापि एकांती तो आपल्या शिष्यांना सर्व काही समजावून सांगत असे.**

येशू हा ईश्वरी वचनाचं सार आहे. योहान १:१४ मध्ये आपण वाचतो की शब्द देही झाला, आणि त्याने आम्हांमध्ये वस्ती केली. अशा तऱ्हेने, बायबलमध्ये नोंदल्या गेलेल्या प्रत्येक शब्दाचा व शब्दरचनेचा आध्यात्मिक अर्थ शोधण्याचं तत्व संपूर्ण बायबलला लागू पडतं कारण संपूर्ण बायबल हीच ख्रिस्ताची ओळख आहे. बायबल म्हणजे ईश्वरी वचन आहे. ख्रिस्त म्हणजे ईश्वरी वचन आहे. आणि बायबल हे देवाचं पुस्तक असल्याकारणाने, बायबलच्या विद्यार्थानं प्रत्यक्ष देव, पवित्र आत्म्याकडून मदत मिळविली पाहिजे. फक्त देवच आपल्या हृदयांकडे सत्य आणू शकतो (योहान १६:१३). कोणताही आध्यात्मिक निष्कर्ष, बायबल शिकवित असलेल्या इतर कुठल्याही आणि सगळ्या सत्यांशी पूर्णपणे सुसंगत आहे ना, ह्याची खात्री करून घेण्यासाठी, बायबलच्या विद्यार्थ्यांनी त्या निष्कर्षाची काळजीपूर्वक तपासणी केली पाहिजे.

ख्रिस्त बोधकथांद्वारे बोलला व तो बोधकथांवाचून बोलला नाही हे मागील तत्व, खऱ्या श्रद्धाळूंना बायबल आणखी समजून घेण्यात मदत करण्याचं प्रमुख साधन असल्यासारखं दिसतं. पण आपल्या पूर्वगर्भित कल्पना घेऊन बायबलकडे येणाऱ्यांना आंधळं करण्याचंही ते प्रमुख साधन असल्यासारखं दिसतं. मार्क ४:११–१२ मध्ये ते तत्व मांडलं गेलं आहे, जिथं देव म्हणतो :

**तो त्यांना म्हणाला, देवाच्या राज्याचे रहस्यदान तुम्हालाच दिले आहे; परंतु बाहेरच्यांना सर्व काही दाखल्यांनी सांगण्यात येते; ह्यासाठी की, त्यांनी पाहून घ्यावे पण त्यांस दिसू नये, ऐकून घ्यावे पण त्यांस कळू नये, त्यांच्या मनाचा पालट होऊ नये व त्यांना क्षमा मिळू नये.**

उदाहरणार्थ, आज संपूर्ण मंडळीजगतात ज्या मानवनिर्मित, व्याकरणाधारित, ऐतिहासिक भाषार्थ शास्त्राचा उपयोग केला जात आहे, त्याचं अनुकरण जो कुणी करतो, त्याला बायबलमधील पुष्कळ महत्वाची सत्यं अचूकपणे समजू शकणार नाहीत. मंडळीयुगाच्या अंताशी संबंधित असलेल्या बायबलच्या शिकवणुकींचा आणि खऱ्या श्रद्धाळूंना जगाच्या अंताच्या वेळापत्रकाबद्दल व तपशीलांबद्दल बरीच माहिती मिळू शकते, ह्या वस्तुस्थितीचा ह्यात समावेश आहे.

**शेवटी, देवाच्या तारणयोजनेचं संपूर्ण प्रकटीकरण**

संपूर्ण मंडळीयुगात ज्या सत्याचं चांगलं आकलन झालं नाही अशा पुष्कळ सत्याकडे जेव्हां देव आपल्या काळात, आपले डोळे उघडतो, तेव्हां विशेष करून तीन महत्वाचे प्रांत दृष्टिक्षेपात आहेत. हे प्रांत खालीलप्रमाणे आहेत. (१) देवाच्या तारणयोजनेचं स्वरूप व वेळ. (२) अंतसमयाचे तपशील ज्यात इतिहासाच्या कालरेषेचा समावेश आहे. (३) देवाच्या न्याययोजनेचं स्वरूप व वैशिष्ट्य.

ह्या अभ्यासात, आपण देवाच्या तारणयोजनेच्या स्वरूपावर कांही प्रमाणात लक्ष केंद्रित करू. दुसरं म्हणजे, अंतसमयाच्या तपशीलांवर आपण मोठ्या प्रमाणावर लक्ष केंद्रित करू. देवाच्या न्याययोजनेचं स्वरूप व वैशिष्ट्य एका आगामी पुस्तकात दिलं जाईल.

इब्री लोकांस पत्र ८:१०—११ मध्ये देव आपल्याला शिकवितो :

**कारण परमेश्वर म्हणतो, त्या दिवसानंतर इस्राएलाच्या घराण्याशी जो करार मी करीन तो हा : मी आपले नियम त्यांच्या मनांत घालीन, आणि ते त्यांच्या हृदयपटांवर लिहीन, आणि मी त्यांना देव असा होईन, आणि ते मला माझे लोक असे होतील, तेव्हां परमेश्वराला ओळखा, असे प्रत्येक जण आपल्या सहनागरिकाला, आणि प्रत्येक जण आपल्या बंधूला, शिकविणार नाही. कारण त्यांतील लहानपणापासून थोरांपर्यंत ते सर्व मला ओळखतील.**

ही पदं विशेष करून देवाच्या तारणयोजनेवर लक्ष केंद्रित करीत आहेत. सभांमधील बंधू व भगिनी तारले गेले आहेत का ह्याची खात्री त्यांनी <u>कशी</u> करून घ्यावी हे सांगणं किंवा ते <u>कसे</u> तारले जातील हे सांगणं, ही बहुतेक सर्व बायबलाधिष्ठित मंडळींची, सबंध मंडळीयुगात, प्रमुख शिकवण होती. ह्या संप्रदायांच्या शिकवणुकींचं काळजीपूर्वक विश्लेषण नेहमी असं दर्शवितं की तारण हवं असलेल्या व्यक्तीनं कांहीतरी कृति करणं आवश्यक आहे ह्या शिकवणुकीचा ते समावेश करतात. ह्या कृति करण्यामध्ये पाण्यातील बाप्तिस्मा, श्रद्धेची सार्वजनिक कबुली, ख्रिस्ताला स्वीकारण्याचं कृत्य, युखारिस्ट किंवा सहभागित्वाचं मेज याचा लाभ घेणं, किंवा एखादी खास प्रार्थना म्हणणं ह्यासारख्या कृत्यांचा समावेश असू शकतो. जवळजवळ सर्वच बाबतीत, देवाच्या कायद्याचा तो निश्चितपणे भंग होता, जो स्पष्टपणे नमूद करतो की एखाद्या व्यक्तीला तारण्याचं सर्व काम त्या व्यक्तीच्या जन्माच्या पुष्कळ आधी ख्रिस्तानं केलं. [२]

वर ज्यांचं अवतरण दिलं आहे, त्या इब्री ८:१०—११ मध्ये, देव यावर जोर देतो की एकदा बायबलचं संपूर्ण प्रकटीकरण झालं की मग जगातील तारणाची शिकवण संपूर्णपणे बायबलाधिष्ठित असेल. मानवजातीला हे शिकविलं जाणार नाही की ते <u>कसे</u> तारले जाऊ शकतील, तर तारण हे <u>सर्वस्वी</u> देवाचं काम आहे असं शिकविलं जाईल (इफिसकरांस पत्र २:८—९). एका मोठ्या जनसमुदायाला देव तारेल, ज्यांना प्रत्यक्षात कदाचित बायबलमधील फार थोडसं समजत असेल.

---

२ या भीतिदायक विषयाबद्दलच्या पुष्कळशा अधिक माहितीसाठी *मला आशा आहे की देव मला तारील* या विनामूल्य पुस्तिकेची तुम्ही मागणी करू शकता.

कोणाही माणसाला मोजता येणार नाही एवढ्या मोठ्या जनसमुदायाचं आपल्या काळात जे तारण होत आहे, त्याच्याशी संबंधित अशा बायबलमधील शिकवणुकीची एक सोपीशी रूपरेषा मांडण्याचा आम्ही प्रयत्न करू.

१. जगात सुवार्ता पाठविण्याची आज्ञा बायबल खऱ्या श्रद्धाळूंना देतं. नभोवाणी आणि इंटरनेट या सारख्या जागतिक संदेशवहनाच्या साधनांच्या विकासाला देवानं मार्गदर्शन केलं आहे, जेणेकरून जगातील प्रत्येक व्यक्तीला सुवार्ता ऐकणं शक्य होईल.

२. ज्या लोकांना बायबलमधील सत्याबद्दल फार थोडं माहीत असतं किंवा अजिबात माहीत नसतं, अशा लोकांना, देवाच्या गूढ विधिलिखितामध्ये, खालील गोष्टी समजू लागतील :

- ते पापी आहेत जे एका भीतिदायक भविष्याकडे वाटचाल करत आहेत, ज्यात त्यांना त्यांच्या पापांची शिक्षा मिळेल.
- ज्या बायबलबद्दल ते ऐकत आहेत, आणि ज्याच्याकडे ते लक्ष देऊ लागले आहेत, ते देवाकडून आलेलं असलं पाहिजे, आणि म्हणून, ते त्याच्या आज्ञा पाळायला लागतात.
- त्यांना कळतं की न्यायदिवस अगदी जवळ आला आहे, पण देव पुष्कळ लोकांना तारत आहे.
- त्यांना कळू लागतं की ते देवाकडे दयेसाठी आक्रोश करू शकतात आणि त्यांनी तो केला पाहिजे, आणि अशी आशा केली पाहिजे की कदाचित देव त्यांना तारील.

जगात आज ही परिस्थिती आहे, जेव्हां सर्वस्वी देवाच्या कृतीमुळे, जगभरात अधिकाधिक लोक तारले जात आहेत. जेव्हां देव एखाद्या व्यक्तीला तारतो, तेव्हां तो त्या व्यक्तीला एक नवीन कोरा, सार्व कालिक, पुनरुत्थित आत्मा देतो. म्हणून, त्यांना बायबलचं आज्ञापालन करण्याची एक तीव्र, सततची तळमळ असते. बायबल ठामपणे सांगतं (प्रकटीकरण ७:९–१४) की आता तारल्या जात असलेल्या लोकांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे, आणि त्याचा संबंध नक्कीच या वस्तुस्थितीशी आहे की देव आता बायबलमधील पुष्कळ सत्यं उघड करीत आहे, जी मागच्या पिढ्यांना माहीत नव्हती.

# प्रकरण २. बायबल इतिहासाची कालरेषा देतं

सबंध बायबलचा काळजीपूर्वक अभ्यास करून, आम्ही शिकलो आहोत की बायबल हे एक केवळ कायद्याचं पुस्तकच आहे असं नाही, की ज्यात ते सर्व कायदे घालून दिले आहेत, ज्यांच्या द्वारे देव सबंध मानवजातीचा कारभार चालवतो, तर ते एक असं पुस्तक पण आहे, जे मनुष्यजातीला एवढ्यासाठी दिलं गेलं की जेणेकरून त्यांना इतिहासाची ईश्वरी कालरेषा माहीत व्हावी. उपदेशक ८:५—७ मध्ये आपण वाचतो :

> **जो आज्ञा पाळितो तो अनिष्ट पाहणार नाही; नेमिलेला काळ व न्यायसमय हे ज्ञान्याच्या मनाला अवगत होतील. प्रत्येक गोष्टीला नेमिलेला काळ व न्यायसमय असतो, कारण मनुष्याची भयंकर दुर्दशा होते; पुढे काय होणार हे त्याला ठाऊक नसते; कसे काय होणार हे त्याला कोण सांगेल?**

या पदांमध्ये, “न्याय” हा “कायदा” या शब्दासाठी समानार्थी शब्द आहे. अशा प्रकारे, ते असं शिकवीत आहे की बायबलचा अभ्यास करून, खरा श्रद्धाळू केवळ देवाच्या न्यायप्रक्रियेशी संबंधित असे देवाचे कायदेच शिकतो असं नाही, तर पृथ्वीसाठीचं देवाचं जे वेळापत्रक आहे, त्याबद्दल पण तो खूप कांही शिकतो.

या कारणासाठी, खऱ्या श्रद्धाळूला इतिहासाच्या वेळापत्रकाबद्दल आणि जगाच्या अंताच्या वेळेबद्दल बरंच कांही समजू शकतं. बायबलचा अर्थ लावण्याच्या बायबलाधिष्ठित पद्धतीचं अनुकरण जे लोक करत नाहीत, त्यांच्यासाठी मात्र ख्रिस्त रात्री येणाऱ्या चोरासारखा येईल. क्षणार्धात, त्यांच्या दुर्दशेत प्रचंड वाढ होईल, आणि त्यांना थोडंसं उशिराच कळेल, की जगाचा अंत आला आहे. तारल्या न गेलेल्यांसाठी आता दया किंवा कृपा किंवा तारण नसेल. अशा प्रकारे, थेस्सलनीकाकरांस पहिले पत्र ५:२—६ मध्ये आपण वाचतो :

> **कारण तुम्हांला स्वतःला पक्के माहीत आहे की, जसा रात्री चोर येतो, तसाच प्रभूचा दिवस येतो. शांति आहे, निर्भय आहे असे ते म्हणतात तेव्हां गरोदर स्त्रीला ज्याप्रमाणे अकस्मात वेदना होतात त्याप्रमाणे त्यांचा अकस्मात नाश होतो, आणि ते निभावणारच नाहीत. बंधुजनहो, त्या दिवसाने चोरासारखे तुम्हांला गाठावे असे तुम्ही अंधारात नाही. कारण तुम्ही सगळे प्रकाशाची प्रजा व दिवसाची प्रजा आहां. आपण रात्रीचे व अंधाराचे नाही; ह्यावरून आपण इतरांसारखी झोप घेऊ नये, तर जागे व सावध राहावे.**

आणि प्रकटीकरण ३:३ मध्ये आपण वाचतो :

> **म्हणून तू कसे स्वीकारले याची आठवण कर; ते जतन करून ठेव व पश्चात्ताप कर; कारण तू जागृत झाला नाहीस, तर मी चोरासारखा येईन; मी कोणत्या घटकेस तुझ्यावर चालून येईन हे तुला मुळीच कळणार नाही.**

या पदांमध्ये, देव आपल्याला असं शिकवीत आहे की बायबल वाचणारे लोक दोन प्रकारच्या लोकांमध्ये विभागलेले आहेत. असे लोक असतात जे देवाबरोबरच्या त्यांच्या संबंधाच्या त्यांच्या सध्याच्या आकलनामध्ये समाधानी असतात. त्यांना माहीत असतं की एक दिवस जग संपणार आहे, पण त्यांची समजूत अशी असते की शेवटच्या दिवसाचं वेळापत्रक फक्त देवालाच माहीत आहे. म्हणून, त्यांना वाटतं की मानवजातीनं त्याची काळजी करण्याचं कारण नाही. त्यांच्यासाठी, ख्रिस्त खरोखर रात्री चोरासारखा येईल. तथापि, या व्यक्तींसाठी त्याचं येणं हे त्यांचा विनाश करण्याच्या उद्देशासाठी असेल. किती भीतिदायक!

उलटपक्षी, असे लोक आहेत ज्यांना हे कळलं आहे की देवानं आपल्याला बायबलमध्ये इतिहासाच्या कालरेषेशी संबंधित पुष्कळ माहिती दिली आहे. म्हणूनच जगाच्या निर्मितीच्या वेळापत्रकाबद्दल व बायबलमध्ये नोंदल्या गेलेल्या इतर पुष्कळ प्रमुख घटनांबद्दल बरंच कांही, ते बायबलमधून शिकले आहेत. जगाच्या अंताच्या अचूक वेळापत्रकाबद्दलही ते शिकले आहेत. त्यांच्यासाठी जगाच्या अंताची वेळ ही अनपेक्षित नसेल.

**देवाच्या तारणयोजनेचा उलगडा म्हणजे इतिहासाची कालरेषा**

देवानं इतिहासाच्या संपूर्ण कालरेषेत मानवजातीला सुवार्तेचा संदेश कसा दिला आहे हे बायबल शिकवितं. सुवार्तेत संपूर्ण बायबलचा समावेश होतो. म्हणूनच, बायबलचा काळजीपूर्वक अभ्यास केल्यानं आपल्याला हे समजतं की देवाच्या तारणयोजनेचा उलगडा म्हणजे इतिहासाची कालरेषा आहे.

इतिहासाच्या कालरेषेतील पहिली ९,५०० वर्षे देवानं ह्या जगात देवाच्या राज्याचं प्रतिनिधित्व करण्यासाठी कुठल्याही प्रकारच्या ऐहिक संस्थेचा वापर केला नाही. त्या कालावधीदरम्यान, देव नेहमी एकेकट्या श्रद्धाळूंच्या माध्यमातून कार्य करीत असे, जे त्याच्या राज्याचे प्रतिनिधी होते. हाबेल, हनोख, ज्याला स्वर्गात नेलं गेलं, नोहा व त्याचं कुटुंब, अब्राहाम, इसहाक, याकोब, व योसेफ ही देवाच्या राज्याचे प्रतिनिधी म्हणून देवानं बायबलमध्ये नोंद केलेली नांवं आहेत.

जेव्हां आपण बायबलचा काळजीपूर्वक अभ्यास करतो, तेव्हां आपल्याला कळतं की जगाची निर्मिती सुमारे १३,००० वर्षांपूर्वी केली गेली [3]. बायबल अतिशय अचूक आहे, म्हणून जेव्हां आपण बायबलच्या दिनदर्शिकेचा आपल्या आधुनिक दिनदर्शिकेशी मेळ बसवितो, तेव्हां आपल्याला कळतं की निर्मितीचं साल खिस्तपूर्व ११,०१३ होतं.

पृथ्वीच्या इतिहासाच्या पहिल्या ९,५०० वर्षांदरम्यान, बहुतेक करून, फारच थोड्या व्यक्ती तारल्या गेल्या असाव्यात. उदाहरणार्थ, नोहाच्या काळात, खिस्तपूर्व ४,९९० साली अस्तित्वात असलेल्या संपूर्ण जगात, जेव्हां देवानं प्रलयात जगाचा नाश केला, तेव्हां फक्त आठ जण असे होते जे तारले गेले.

**इस्राएल आणि खिस्तपूर्व १४४७ ते इसवी सन ३३ साल ही वर्षे**

तथापि, खिस्तपूर्व १४४७ साली, देवानं ह्या पृथ्वीवर देवाच्या राज्याचं प्रतिनिधित्व करण्यासाठीच्या त्याच्या पद्धतीत फार मोठा बदल केला. त्या वर्षी, देवाच्या राज्याचा प्रतिनिधी म्हणून देवानं इस्राएलाच्या राष्ट्राचा वापर करण्यास सुरवात केली. ते खिस्तपूर्व १४४७ साल होतं, जेव्हां मोशेच्या नेतृत्वाखाली, इस्राएल मिसरच्या गुलामगिरीतून बाहेर पडलं. अब्राहाम, जो ७०० वर्षे आधी जन्माला आला होता, त्याच्या वंशजांचा इस्राएलाच्या राष्ट्रात समावेश होता,. अब्राहामाचा जन्म खिस्तपूर्व २१६७ साली खास्द्यांचे ऊर किंवा बाबेलचा नागरिक म्हणून झाला. खिस्तपूर्व २०९२ साली, तो व त्याची पत्नी, सारा, देवाच्या आज्ञेचं पालन करीत कनानाच्या देशात गेले. त्यांच्यापासून इस्राएलाच्या राष्ट्राची सुरवात झाली, व देवाच्या राज्याचा पृथ्वीवरील प्रतिनिधी म्हणून कनानाच्या देशाचा देवाकडून वापर केला गेला.

इस्राएलाचं राष्ट्र, आणि कनानाचा देश खिस्ताच्या जन्मापूर्वीच्या २,१०० वर्षांच्या कालावधीदरम्यान, देवाच्या तारणयोजनेच्या उलगडण्याचं केंद्रस्थान झाले. वस्तुस्थिती अशी आहे की परमेश्वरपुत्र येशूला त्याचं मानवी स्वरूप अब्राहामाचा थेट वंशज म्हणून मिळालं.

अब्राहामाचे वंशज, ज्यांना इस्राएल असं म्हटलं जातं, त्यांची लोकसंख्या खिस्तपूर्व १४४७ सालापर्यंत कदाचित सुमारे दोन दशलक्ष इतकी वाढली होती. त्याच वर्षी ते मिसरच्या गुलामगिरीतून बाहेर पडले. आणि पुढील १,४८० वर्षांपर्यंत इस्राएलाला देवाचे लोक म्हटलं जात होतं. त्यांना देवाचे अधिकाधिक कायदे दिले गेले. ते देवाच्या राज्याचे पृथ्वीवरील बाह्य प्रतिनिधी झाले.

देवानं इस्राएलाच्या लोकांना राहण्यासाठी जागा म्हणून कनानाची भूमि हे एक राष्ट्र, ज्याला इस्राएलाची भूमी असंही म्हटलं जातं, आणि प्रार्थना करण्यासाठी एक मंदिर, व प्रार्थनास्थळं दिली. त्यानं त्यांना कायदे दिले, ज्यांना ईश्वरी तत्वज्ञानानुसार आपण विधिनियम म्हणतो, त्यांचं पालन करायचं होतं

---

३ तुम्ही फॅमिली रेडिओला लिहून, *आदाम केव्हां* या विनामूल्य या पुस्तिकेची मागणी करावी अशी आमची विनंति आहे. बायबल ही माहिती कशी देतं ते या पुस्तिकेत दाखविलं आहे.

कारण ह्या कायद्यांनी इस्राएलींना त्या येणार असलेल्या मसीहाकडे, येशू ख्रिस्ताकडे निर्दिष्ट केलं. सणाचे दिवस, शुद्ध प्रतिपदेचे चंद्र, सातव्या दिवसाचा शब्बाथ, होमबळी, यज्ञातील रक्तार्पण, वगैरेसारख्या गोष्टी पाळणं ह्यांचा विधिनियमांमध्ये समावेश होता.

कनान, इस्राएल, यहूदा, यरुशलेम, सीयोन, मंदिर, यहूदीया वगैरेसारख्या पृथ्वीवरील गोष्टींचा देवाच्या राज्याचे बाह्य प्रतिनिधित्व करण्यासाठी देवानं वापर केला. अशा तऱ्हेने, ह्याच शब्दांचा देवाच्या राज्याचं आध्यात्मिक प्रतिनिधित्व करण्यासाठी बायबलमध्ये अगदी वारंवार वापर केला गेला आहे. उदाहरणार्थ, मंडळीयुगादरम्यान, मंडळी म्हणजे देवाच्या राज्याच्या बाह्य प्रतिनिधी होत्या. म्हणूनच, मंडळीयुगातील मंडळींबद्दल बोलताना बायबल वारंवार इस्राएल, यहूदा, मंदिर इत्यादीसारखे शब्द वापरतं.

इस्राएल राष्ट्राचा एक अविभाज्य भाग म्हणजे याजक, लेवी, संदेष्टे, आणि सबंध राष्ट्रावर राज्य करण्यासाठी राजे, यांच्या नेमणुकीशी संबंधित कायद्यांचा समूह, जो देवानं घालून दिला. तो एक दैवी जीव होता, ज्याची स्थापना देवाच्या राज्याचं या पृथ्वीवरील प्रतिनिधित्व करण्यासाठी प्रत्यक्ष देवानं केली होती. प्रत्येक यहूदी, जो अब्राहामाचा वंशज होता, तो आपोआप या महान सभेचा सदस्य असायचा. या सदस्यत्वावर जोर देण्यासाठी, प्रत्येक पुरुषाची सुंता केली जात असे, जो देवानं प्रस्थापित केलेल्या विधिनियमांपैकी एक होता.

इस्राएलाच्या राष्ट्राची सुरुवात होण्याआधीच्या वर्षांबद्दल, तसंच त्याच्या इतिहासाच्या पहिल्या एक हजार वर्षांबद्दल, बरीच माहिती बायबल आपल्याला देतं. एक राष्ट्र म्हणून इस्राएलाबद्दल बराच तपशील बायबल देतं, जेव्हां देवानं त्यांची गुलामीतून मुक्तता केली आणि त्यांना मिसरमधून बाहेर आणलं, जेव्हां ते अद्‌भुतपणे तांबड्या समुद्रातून पार होऊन कोरड्या भूमीवर आले, आणि ४० वर्षे रानावनात भटकले, आणि मग यार्देन नदीतून कोरड्या भूमीवर आले. मग त्यांच्या इतिहासाच्या पुढील ३६० वर्षासंबंधीची बरीच माहिती बायबल देतं, जेव्हां कनानाच्या भूमीत, शास्ते म्हटल्या जाणाऱ्या व्यक्तींचा उपयोग करून, देवानं त्यांच्यावर राज्य केलं.

मग आपल्याला पुढील ११६ वर्षांचा तपशील दिला जातो, जेव्हां इस्राएलाला सर्वात महान ऐहिक वैभव प्राप्त झालं, जेव्हां त्यांच्यावर राजा शौलानं राज्य केलं, ज्याच्यानंतर राजा दावीद आला, आणि मग राजा शलमोन.

इस्राएलाच्या १२ वंशांचा समावेश असलेल्या एकत्रित राष्ट्राची दोन राष्ट्रं झाली, याच्या संबंधातील पुष्कळ तपशील सुद्धा बायबलमध्ये दिले आहेत. राजा शलमोनाच्या मृत्यूनंतर, दहा वंशांचं एक स्वतंत्र राष्ट्र झालं, ज्याचं नांव इस्राएल होतं, आणि ज्याची राजधानी कालांतरानं शोमरोन झाली, आणि उरलेल्या दोन वंशांचं यहूदा राष्ट्र झालं, ज्याची राजधानी यरुशलेमेत होती. या राज्यांबद्दल आणि त्यांच्यावर राज्य करणाऱ्या राजांबद्दल बरीच माहिती बायबल देतं.

या राष्ट्रांच्या अंताबद्दल सुद्धा पुष्कळशी माहिती बायबल देतं. इस्राएल राष्ट्रातील दहा वंशांवर अश्शूरींनी ख्रिस्तपूर्व ७०९ मध्ये विजय मिळविला. मग ख्रिस्तपूर्व ५८७ मध्ये, यहूदाचं राष्ट्र बाबेलींनी पादाक्रांत केलं, ज्यावेळी यरुशलेमेचं नगर आणि राजा शलमोनानं बांधलेल्या भव्य मंदिराचा नाश झाला.

तथापि, ख्रिस्तपूर्व ५८७ मध्ये झालेल्या यरुशलेमेच्या नाशानंतर, त्या १२ वंशांच्या अनुभवाचे तपशील खूप कमी झाले. आपण शिकतो की ख्रिस्तपूर्व ५३९ मध्ये, बाबेलींनी ज्या यहूदाचा नाश केला होता, त्यातील उरलेसुरलेले सुमारे ४०,००० लोक यरुशलेमेला परतले. मंदिराची पुनर्बांधणी, जी ख्रिस्तपूर्व ५१५ मध्ये पूर्ण केली गेली, त्यासंबंधातील कांही वास्तविक गोष्टी आपल्याला कळतात. इस्राएलाच्या भूमीत परतलेल्या यहूदींच्या कांही अनुभवांबद्दल, बायबलमधील मुख्यतः एजरा, नहेम्या, आणि एस्थर या पुस्तकांमधून आपल्याला कळतं.

पण मग, ख्रिस्तपूर्व ३९१ पासून ते ख्रिस्तपूर्व ८ पर्यंत, इतिहासाची जवळजवळ ४०० वर्षे, इस्राएलाच्या देशाबद्दल, त्यातील रहिवाशांबद्दल, आणि खरं तर, जगातील कोणत्याही राष्ट्राबद्दल बायबल मूक आहे.

दुःखदरीत्या, इस्राएलाच्या अस्तित्वाच्या सबंध कालखंडात, फारच थोडे लोक खरोखर तारले गेले. इस्राएल राष्ट्राचं पाप, धर्मभ्रष्टता, आणि देवाच्या कायद्यांविरुद्ध त्यांचं बंड याबाबतच्या विधानांनी बायबल भरलेलं आहे. अगदी येशू ख्रिस्त, जो त्याच्या मनुष्यावतारात अब्राहामाचा वंशज होता, तो तारणहार म्हणून जेव्हां आला, तेव्हां सुद्धा, त्यांनी बंड केलं, आणि ते त्याला त्यांचा मसीहा मानत नव्हते. खरं तर, कालांतरानं, त्यांनी त्याला ठार मारलं (प्रेषितांची कृत्ये २:२२–२३).

बायबल आपल्याला खात्री देतं की ख्रिस्त म्हणजे इस्राएलाच्या राष्ट्रानं निर्माण केलेलं अद्‌भुत फळच. इस्राएल राष्ट्राच्या माध्यमातूनच, देवानं मनुष्यावतार घेतला, जो कुमारी मरीयापासून जन्मला, जी यहूदा वंशातील होती.

ख्रिस्तपूर्व ८ मध्ये, पुन्हा बायबल यहूदी राष्ट्राबद्दल बराच तपशील द्यायला लागतं. त्या वर्षी, बाप्टिस्ट योहानाच्या जन्माची घोषणा झाली, आणि जगाची पापं हरण करण्यासाठी मसीहा, प्रभु येशू ख्रिस्त, देवाचा कोकरा आला आहे असं जगाकडे जाहीर करणारा योहानच होता. अर्थातच, येशू ख्रिस्त म्हणजे असं एकमेव साधन, ज्याच्या द्वारे जगातील कोणीही मनुष्य स्वतःच्या पापांचा दंड भरून टाकू शकतो, आणि त्या प्रकारे देवाशी सर्वकाळासाठी सख्य करू शकतो.

ख्रिस्तपूर्व ७ साली येशूचा जन्म झाला, त्या वेळेपासून सुमारे इसवी सन ६५ सालापर्यंत, इस्राएल राष्ट्राबद्दल पुष्कळ माहिती बायबल देतं. या कालखंडादरम्यानच जगाच्या इतिहासातील सर्वात विलक्षण घटना घडली. देव, प्रभु येशू ख्रिस्तानं कुमारी मरीयाच्या पोटी जन्म घेऊन मनुष्यावतार धारण केला. या कालखंडात, येशूनं सुमारे साडेतीन वर्षे उपदेश केला. इसवी सन ३३ मध्ये, येशू ख्रिस्ताला वधस्तंभावर चढविलं गेलं. तो मृतांमधून उठला आणि परत स्वर्गात गेला. ते वर्ष, इसवी सन ३३, म्हणजे त्या १,४८० वर्षांच्या कालखंडाची समाप्ति होती, ज्याच्या दरम्यान सबंध इस्राएलाचं राष्ट्र म्हणजे ती सभा होती जिनं देवाच्या राज्याचं बाह्य प्रतिनिधित्व केलं.[४]

**मंडळीयुगाची सुरुवात**

ख्रिस्त स्वर्गात गेल्यावर कांही दिवसांनी, पुढील १,९५५ वर्षे जी महान दैवी संस्था देवाच्या राज्याचं प्रतिनिधित्व करणार होती, तिची सुरुवात झाली.

इसवी सन ३३ साली, पेण्टेकॉस्टच्या दिवशी, सुमारे ३,००० लोक तारले गेले (प्रेषितांची कृत्ये २). त्या दिवशी जे लोक तारले गेले, ते कित्येक वेगवेगळ्या राष्ट्रांमधून आले होते. या भव्य घटनेनं मंडळीयुगाची सुरुवात झाली. आज जे देश आपल्याला तुर्कस्तान, ग्रीस, आणि इटली म्हणून माहीत आहेत, त्या देशांमध्ये मंडळीयुगाच्या सुरुवातीच्या या भागामध्ये धर्मप्रसारक पाठविले गेले, त्यासंबंधातील पुष्कळ तपशील दिला गेला आहे. देवानं मंडळीयुग एक दैवी योजना म्हणून प्रस्थापित केलं, ज्याच्या द्वारे देव सबंध जगात सुवार्ता पाठवू शकला. यहूदी प्रार्थनास्थळं, यरुशलेम नगर, इस्राएलाचं राष्ट्र, किंवा यरुशलेमेतील मंदिर ही इथून पुढे पुन्हा कधीही देवाच्या राज्याचं बाह्य प्रतिनिधित्व करणार नव्हती. सबंध जगभरात ज्या स्थानिक सभा बनविल्या जाणार होत्या, त्या देवाच्या राज्याचं बाह्य प्रतिनिधित्व करणार होत्या. म्हणून, आध्यात्मिकदृष्ट्या, बायबल पुष्कळदा स्थानिक सभांना "यरुशलेम", "मंदिर", "सीयोन", "इस्राएल", "यहूदा", "यहूदीया" वगैरे म्हणतं.

---

४ मंडळीयुगाच्या अंताबद्दलच्या अधिक माहितीसाठी तुम्ही *मंडळीयुगाचा अंत आणि त्यानंतर* व *गहू आणि निदण* या विनामूल्य पुस्तकांची मागणी करावी.

ही दैवी संस्था, जिच्यात कालांतरानं सबंध जगभरातील मंडळींचा समावेश झाला, तिचा आराखडा देवानं काळजीपूर्वकपणे बनविला होता. आणि वडीलधारे आणि सेवक यांची निवड करण्यासाठी, देवानं त्याच्या कायद्याच्या पुस्तकात, बायबलमध्ये, कडक नियम घालून दिले (तीमथ्याला पहिले पत्र ३). स्त्रियांनी शिकवायचं नव्हतं किंवा त्यांना सभांमध्ये अधिकार द्यायचा नव्हता. जुन्या करारातील विधिनियम, ज्यांचं अनुकरण इस्राएलाच्या राष्ट्रानं करायचं असायचं, त्यांचं पालन आता इथून पुढे करायचं नव्हतं. त्याऐवजी, सुवार्तेच्या स्वरूपासंबंधीच्या शिकवणुकीमध्ये मदत व्हावी, म्हणून दोन नवीन विधिनियम घालून देण्यात आले. ते होते पाण्यातील बाप्तिस्मा आणि प्रभूची मेजवानी. मंडळीच्या सदस्यत्वातून बहिष्कृत करण्याशी संबंधित असा एक कायदा करण्यात आला (करिंथकरांस पहिले पत्र ५). देवानं रविवार हा शब्बाथाचा रविवार म्हणून नेमून दिला, ज्याचा उपयोग सर्व प्रकारच्या आध्यात्मिक कार्यांसाठी केला जायचा होता. सबंध जगभरात ज्या सर्व स्थानिक सभा स्थापल्या जाणार होत्या, त्यांचा कारभार बायबलमध्ये घालून दिल्या गेलेल्या कायद्यांनुसार चालवायचा होता.

देवानं आज्ञापित केलेल्या या सभांसाठी नेमून दिलेलं महान कार्य म्हणजे सबंध जगात सुवार्ता पाठविणं. म्हणून, जसं आपण पाहिलं, बायबल लिहून पूर्ण होण्याच्या आधीच, धर्मप्रसारकांना शेजारी राष्ट्रांमध्ये पाठविलं जाऊ लागलं होतं (प्रेषितांची कृत्ये १३).

साधारण इसवी सन ९५ च्या सुमारास, देवानं बायबलचं लिखाण पूर्ण केलं, आणि जगातील मंडळींच्या प्रत्यक्ष प्रगतीचं आणखी ऐतिहासिक वर्णन देवाकडून त्यानंतर आलेलं नाही. तथापि, मंडळीयुग सुरु होण्याच्या खूप आधीच, मंडळीयुगाचा आध्यात्मिक विकास कसा होईल, याबद्दल देवानं भाकीत केलं.

इसवी सन ३३ मधील पेण्टेकॉस्टच्या दिवशी मंडळीयुगाची मंगल सुरुवात झाली, जेव्हां सुमारे ३,००० लोक एका दिवसात तारले गेले (प्रेषितांची कृत्ये २), आणि त्यामुळे एखाद्याची अशी अपेक्षा असू शकेल की मंडळीयुगाचा विकास म्हणजे एक संस्मरणीय यशोगाथा असेल. तथापि, बायबलनं भाकीत केलं की देवाची योजना तशी नव्हती. बायबलमधून आपल्याला दुःखदरीत्या समजतं की देवानं बायबल लिहून पूर्ण करण्याच्या आधीच, (इसवी सन ९५ च्या सुमारास) मंडळीयुग ही कांही एक प्रचंड यशोगाथा होणार नाही, असा अधिकाधिक पुरावा उपलब्ध होऊ लागला होता.

**दोषी मंडळीची बायबलला पूर्वकल्पना**

प्रकटीकरण २ आणि प्रकटीकरण ३ मध्ये, सात प्रातिनिधिक मंडळींच्या आध्यात्मिक स्थितीबद्दल देव सांगतो. या मंडळींच्या स्थापनेच्या नंतर सुमारे ३० वर्षांनी ही परिस्थिती अस्तित्त्वात आली. उदाहरणार्थ, इफिस येथील मंडळींनी त्यांची पहिली प्रीति सोडली होती (प्रकटीकरण २:४–५). लक्षात घ्या, देवावर प्रेम करणं म्हणजे त्याच्या आज्ञांचं पालन करणं (योहान १४:२१–२३). म्हणून, ते आता देवाच्या कायद्याचं पालन करत नसल्यामुळे, जी त्यांची समई सुवार्तेचं प्रतिनिधित्व करते, ती काढून घेण्याची धमकी देवानं दिली. जगात सुवार्ता पाठविण्यासाठी या मंडळीचा उपयोग देव आता करणार नव्हता.

गलतीकरांस पत्र १:२–९ मध्ये, बायबल सांगतं की बायबल पूर्ण होण्याच्या आधीच, गलतीयामधील मंडळींनी अशा सुवार्तेचं अनुकरण करायला सुरुवात केली जी बायबलमधील सुवार्ता नव्हती. प्रकटीकरण २:१३ मध्ये, बायबल सांगतं की पर्गम येथील मंडळी आधीच अशी मंडळी होती, जिच्यात कांही प्रमाणात, सैतान राज्य करत होता. या पदात सैतानाच्या "आसना"चा उल्लेख आहे. बायबलमध्ये, "आसन" या शब्दाचा संबंध, याप्रकारच्या संदर्भात, राज्य करणं किंवा सत्ता गाजविणं याच्याशी असतो. आणि प्रकटीकरण ३:१–४ मध्ये, बायबल सांगतं की सार्दीस येथील मंडळीमध्ये जरी कांही थोडे खरे श्रद्धाळू उरले होते, तरी ती मंडळी आधीच मृत होती.

मत्तय १३:२४–३० मध्ये, गहू व निदणाची बोधकथा बायबल नोंदवितं. मंडळीमधील खऱ्या श्रद्धाळूंचं प्रतिनिधित्व गहू करायचे. निदण अश्रद्ध लोकांचं प्रतिनिधित्व करायचं, जे लोक ते खरे श्रद्धाळू

असल्याचा सर्व पुरावा द्यायचे, आणि मंडळीयुगाच्या शेवटीच, निदणापासून गहू वेगळे करण्याची साधनं देव देईल. याचा अर्थ असा होता की सबंध मंडळीयुगात, निदण असतील, म्हणजे जे अजून सैतानाचे गुलाम असतील, जे मंडळीत खूप मोठ्या प्रमाणावर कार्यरत असतील. अशा प्रकारे, जरी अधिकृतरीत्या, ख्रिस्त मंडळीचा राजा होता, तरी त्या लोकांच्या माध्यमातून, सैतान मंडळीत राज्य करू शकला.

याआधीच यशया ९:१–४ मध्ये, देवानं भाकीत केलं की मंडळीयुग कांही फार मोठी यशोगाथा असणार नाही. तिथं आपण वाचतो :

> **तथापि आता ज्या भूमीत विपत्ति आहे तेथे हा अंधकार राहणार नाही. त्याने मागील काळी जबलून प्रांत व नफताली प्रांत यांची अप्रतिष्ठा केली तरी पुढील काळी समुद्रतीरीचा प्रदेश, यार्देनेच्या पलीकडील प्रांत, विदेशी लोकांचे मंडळ (गालील) यांची तो प्रतिष्ठा करील. अंधकारात चालणाऱ्या लोकांनी मोठा प्रकाश पाहिला आहे; मृत्युच्छायेच्या प्रदेशात बसणाऱ्यांवर प्रकाश पडला आहे. तू राष्ट्राची वृद्धि केली आहे; त्याला महानंदप्राप्ति करून दिली आहे, हंगामाच्या उत्सवसमयी करावयाच्या आनंदाप्रमाणे, ते तुजसमोर आनंद करितात. कारण मिद्यानाच्या दिवसाप्रमाणे, तू त्याच्या भाराचे जूं, त्याच्या खांद्यावरची काठी, त्याजवर जुलूम करणाऱ्याचा सोटा मोडिला आहे.**

*(आपल्या मराठी बायबलमध्ये, या पदात आपण वाचतो "महानंदप्राप्ति करून दिली आहे". परंतु, मूळ इब्री बायबलमध्ये, ते म्हणतं "महानंदात वाढ केली नाही").*

या पदांमध्ये, देव यार्देनेच्या पलीकडील भूमीवर, म्हणजे "गालील"मध्ये प्रकाश पडण्याबद्दल बोलतो (मत्तय ४:१५–१६ पण पाहा). म्हणजे, जगातील सर्व राष्ट्रे सुवार्तेच्या प्रकाशाखाली असणार होती. तो प्रकाश म्हणजे, अर्थातच, प्रभु येशू, जो जगाचा प्रकाश आहे. (योहान १:७–१०).

सुवार्तेचा प्रकाश सबंध जगात चमकणार असल्यामुळे, देवाच्या सुवार्ता कार्यक्रमात एक मोठा बदल घडून येईल, अशा अर्थानं की हा प्रकाश जगातील आध्यात्मिक अंधकाराचा भेद करील (यशया ९:२). हा प्रकाश, सबंध जगात, लोकांच्या एका मोठ्या समुदायास अस्तित्त्वात आणील, जे बाह्यतः ख्रिस्तावर खरा विश्वास ठेवणारे वाटतील, जसं यशया ९:३ जाहीर करतं, **"तू राष्ट्राची वृद्धि केली आहे."** दुसऱ्या शब्दात, सबंध जगात ज्याचा विकास केला जाईल, त्या देवाच्या राज्याचा बाह्य आकार मोठा असेल.

तथापि, त्याच पदात, देव भाकीत करतो की त्यानं हंगामाच्या उत्सवसमयी करावयाच्या आनंदात वृद्धि केली <u>नाही</u> . हंगामाच्या उत्सवसमयी करावयाचा आनंद म्हणजे तो महानंद, जो तेव्हां येतो, जेव्हां एखाद्या व्यक्तीला सार्वकालिक जीवन दिलं जातं जेणेकरून तो एक खरा श्रद्धाळू होतो (लूककृत शुभवर्तमान १५:१०). जर हंगामाच्या उत्सवसमयी करावयाचा आनंद नसेल, तर त्याचा अर्थ फक्त असाच होऊ शकतो की खऱ्या श्रद्धाळूंचं पीक फार कमी आहे. जसं आपण पाहात आहोत, वस्तुस्थिती अशी आहे की, तारल्या जाणाऱ्या व देवाच्या राज्यात येणाऱ्या लोकांची फार मोठी कापणी होणार नाही, या दुःखद पूर्वकल्पनेचं भाकीत बायबलमध्ये पुष्कळ ठिकाणी वर्तविलेलं आहे.

आपण आधीच ज्यांची दखल घेतली आहे, अशा बायबलमधील सर्व संदर्भांच्या व्यतिरिक्त, यशया ५ मध्ये आपण वाचतो की देव मंडळीयुगाचं वर्णन द्राक्षाचा मळा असं करतो जो प्रत्यक्ष देवानंच काळजीपूर्वकपणे व प्रेमळपणे लावला आहे. पण ह्या द्राक्षाच्या मळ्यात चांगली फळं आली नाहीत. त्यानं रानटी द्राक्षं उपजविली. आध्यात्मिकरीत्या, रानटी द्राक्षं ही त्या लोकांचं उदाहरण आहेत ज्यांनी बायबलमधील सुवार्तेचं काटेकोरपणे अनुकरण करण्याऐवजी त्यांची स्वतःची सुवार्ता तयार केली आहे. ह्या अभ्यासात पुढे, आपण पाहू की देवाची अशी योजना होती की ह्या दुष्टपणामुळे, देव कालांतरानं द्राक्षाच्या मळ्याचा नाश करील.

यशया, यिर्मया, व यहेज्केल, वगैरे पुस्तकांमध्ये, इस्राएलाचं राष्ट्र व यहूदा ह्यांच्या सततच्या दुष्टपणामुळे त्यांच्याविरुद्धचा त्याचा तीव्र कोप देव दर्शवितो ह्याची नोंद घेतली गेली पाहिजे. शेवटी, त्यांचा नाश झालाच. इस्राएलाचा नाश ख्रिस्तपूर्व ७०९ साली, अश्शूरींकडून झाला, व ख्रिस्तपूर्व ५८७ साली बाबेलींकडून यहूदाचा नाश झाला.

देवानं मंडळीयुगाच्या संपूर्ण काळात देवाच्या राज्याचं बाह्य प्रतिनिधित्व करणाऱ्या स्थानिक मंडळींची उदाहरणं म्हणून इस्राएल व यहूदाचा वापर केला, ज्यांनी त्यांच्या काळात देवाच्या राज्याचं बाह्य प्रतिनिधित्व केलं. जेव्हां आपण जुन्या करारातील ह्या पुस्तकांचा अभ्यास करतो, तेव्हां खरंतर, आपण मंडळीयुगाबद्दल व खास करून मंडळीयुगाच्या अंताबद्दल, देवाला जी पूर्वकल्पना होती, ती वाचत असतो.

अशा तऱ्हेने, देव असं शिकवित आहे की संपूर्ण मंडळीयुगात जगात सर्वत्र मंडळींची स्थापना व्हायची होती, ज्यामुळे असं वाटतं की मंडळीयुग प्रचंडरीत्या यशस्वी झालं. पण वास्तवात, फक्त काही अवशिष्ट, संपूर्ण मंडळींमधील एक छोटासा भाग, प्रत्यक्षात तारला जाईल, म्हणजे, ते खरे श्रद्धाळू होतील.

हाच विचार रोमकरांस पत्र ९:२७ मध्ये मांडला गेला आहे, जिथं देव यशया १०:२२–२३ मधून उद्धृत करतो :

> रोमकरांस पत्र ९:२७ : **यशयाहि इस्राएलाविषयी असे पुकारतो की, जरी इस्राएल लोकांची संख्या समुद्राच्या वाळूसारखी असली, तरी अवशेष मात्र तारण पावेल :**
>
> यशया १०:२२–२३ : **कारण हे इस्राएला, तुझे लोक समुद्राच्या रेतीइतके असले तरी त्यांचा अवशेष मात्र परत येईल; न्यायाने परिपूर्ण असा प्रलय नेमिला आहे. कारण प्रभु , सेनाधीश परमेश्वर, सर्व देशभर नेमिलेला प्रलय आणीत आहे.**

**मंडळींमधील सैतानाचा प्रश्न**

मंडळीयुगात आध्यात्मिक यश न मिळण्याचं एक मोठं कारण म्हणजे सैतानाचा प्रश्न. वधस्तंभाच्या वेळी, सैतानाला एक प्राणघातक फटका मारण्यात आला. त्याला स्वर्गातून हद्दपार करण्यात आलं (प्रकटीकरण १२:७–११), आणि त्याला बांधण्यात आलं, जेणेकरून सबंध मंडळीयुगादरम्यान, म्हणजे तो काळ, ज्याला प्रतीकात्मकरीत्या, १,००० वर्षांचा काळ म्हटलं आहे (प्रकटीकरण २०:१–३), त्या काळात, तो राष्ट्रांना ठकवू शकणार नाही. १,००० वर्षे म्हणजे एक प्रतीकात्मक किंवा आध्यात्मिक आकडा असल्याचं समजून घेतलं पाहिजे जो "पूर्णत्व" दर्शवितो. त्याला प्रत्यक्षात १,९५५ वर्षे बांधलं गेलं होतं (इसवी सन ३३ पासून १९८८ पर्यंत).

सैतानाला बांधण्याचा परिणाम असा झाला की काळाच्या अगदी सुरुवातीला, ज्या लोकांना देवानं तारण्यासाठी निवडलं होतं, त्यांना तारण्याची देवाची योजना तो कोणत्याही प्रकारे निष्फळ करू शकला नाही. पण सैतानाला बांधलं गेलं होतं या वस्तुस्थितीमुळे, गर्जणाऱ्या सिंहाप्रमाणे त्यानं वावरण्याला व गट्ट करता येईल असं सावज शोधण्याला कोणताही प्रतिबंध नव्हता (पेत्राचे पहिले पत्र ५:८). म्हणजे, जरी मंडळीयुग ही सर्वस्वी देवाची योजना होती, जिच्याद्वारे सुवार्ता सर्व जगात पोहोचायची होती, तरी तिच्या आध्यात्मिक परिणामकारकतेत सैतानामुळे मोठी आडकाठी येईल. मंडळींमध्ये निदण किंवा तण पेरून तो त्यांच्या परिणामकारकतेत बाधा आणेल (मत्तय १३:२४–३०). म्हणजे, सैतान **"तेजस्वी देवदूत"** म्हणून कार्य करेल आणि त्याच्या सेवकांना **"नीतिमत्त्वाचे सेवक"** म्हणून प्रत्येक स्थानिक सभेत आणेल (करिंथकरांस दुसरे पत्र ११:१३–१५).

प्रकटीकरण ६:४ मध्ये, त्याचं चित्र असं रंगविलं आहे की तो लाल घोड्यावर स्वार झालेला व हातात एक मोठी तरवार, म्हणजे आत्म्याची तरवार, म्हणजेच बायबल घेतलेला, ज्या तरवारीच्या सहाय्यानं

तो पृथ्वीवरील शांति हरण करील. दुसऱ्या शब्दात, त्याच्या खोट्या शिकवणुकींना अधिकार प्राप्त व्हावा म्हणून तो बायबलमधील शब्द वापरील.

बायबलमधील या सर्व संदर्भांची काळजीपूर्वक संगति जेव्हां आपण लावतो, तेव्हां आपल्याला कळतं, की खरोखर, बाहेरून पाहिलं असता, मंडळीयुग यशस्वी झाल्यासारखं दिसतं, जेव्हां मंडळीमागून मंडळींनी मोठ्या संख्येनं लोक तारले गेल्याचे अहवाल दिले. प्रत्यक्षात मात्र, मंडळीतील सबंध सहभागितेत, जे लोक कबुलीजबाब देणारे सदस्य झाले, त्यांच्यापैकी केवळ कांही अवशिष्ट लोकच खरे श्रद्धाळू झाले.

मंडळीयुगात जगाला मिळालेला कदाचित सर्वात महान कृपाशीर्वाद म्हणजे बायबलच्या कोट्यवधि प्रती छापल्या जाणं आणि त्यांचं सबंध जगभरात वितरण होणं. जरी मंडळीयुगात खरे श्रद्धाळू झालेल्या लोकांची संख्या छोटी होती, तरी बायबल, म्हणजे सुवार्तेचा प्रकाश, जगभरात पाठविला गेला.

अशा प्रकारे, ज्या दिवशी देव त्याचा प्रचंड कोप जगातील तारल्या न गेलेल्यांवर आणील, त्यावेळी मत्तय ७:२१—२३ मधील भयसूचक भाकीताची बोचक पूर्तता होईल. आणि दुःखद गोष्ट ही की, प्रभूला भेटण्यासाठी खऱ्या श्रद्धाळूंना हवेत वर उचललं जाणं जेव्हां घडेल, त्या वेळी जे लोक अजून जगातील कोणत्याही मंडळीत असतील, अशा सर्वांचा समावेश त्या लोकांमध्ये होतो, ज्यांच्यावर देवाचा कोप होईल. या पदांमध्ये देव जाहीर करतो :

> **मला प्रभुजी, प्रभुजी असे म्हणणाऱ्या प्रत्येकाचा प्रवेश स्वर्गाच्या राज्यात होईल असे नाही; तर जो माझ्या स्वर्गीय पित्याच्या इच्छेप्रमाणे वागतो त्याचा होईल. त्या दिवशी पुष्कळ जण मला म्हणतील, प्रभो, प्रभो, आम्ही तुझ्या नांवाने संदेश दिला, तुझ्या नांवाने भुते घालविली, व तुझ्या नांवाने पुष्कळ महत्कृत्ये केली नाहीत काय? तेव्हां मी त्यांना स्पष्ट सांगेन की, मला तुमची कधीच ओळख नव्हती; अहो अनाचार करणाऱ्यांनो, माझ्यापुढून निघून जा.**

सबंध मंडळीयुगाकडे मागे वळून पाहू शकण्याच्या आपल्या उच्च टेहेळणी बिंदूवरून, मंडळीयुगाच्या अपयशाशी संबंधित असलेल्या देवाच्या भाकीतांची वस्तुस्थिती आपल्याला दिसू शकते. हे खरं आहे, की इसवी सन ३३ साली पेण्टेकॉस्टच्या दिवशी, जेव्हां सुमारे ३,००० लोक तारले गेले, तेव्हां मंडळीयुग मोठ्या दिमाखात सुरु झालं. पण जसं आपण आधीच पाहिलं आहे, बायबल पूर्ण होण्याआधीच ज्या मंडळींची स्थापना झाली, त्यांच्यात धर्मभ्रष्टता आधीच दिसू लागली होती. त्याचप्रमाणे, सैतान आधीच कित्येक मंडळींमध्ये निदण पेरून सत्ता गाजवीत होता. प्रकटीकरण २ व ३ मधील मंडळी म्हणजे नव्या करारातील सबंध मंडळीयुगभरात ज्या सर्व मंडळी अस्तित्त्वात येतील, त्यांच्या प्रतिनिधी होत्या.

शिवाय, जेव्हां आपण मंडळींचा इतिहास तपासून पाहातो, तेव्हां आपल्याला बायबलशी प्रामाणिक असण्याचा असा कोणताही काळ दिसत नाही. बायबलशी विश्वासघाताची भरपूर वर्णनं आपल्याला मंडळीयुगाच्या इतिहासात सापडतात. बायबलशी विश्वासघाताचा कदाचित परमोच्च बिंदु म्हणजे सुधारणांचा काळ, जो युरोपमध्ये सुमारे चारशे ते पाचशे वर्षांपूर्वी घडला. इतिहासातील त्या वेळी, रोमन कॅथलिक मंडळी ही प्रबळ मंडळी होती. ती बायबलच्या कायद्यांचं एवढ्या वाईट प्रकारे उल्लंघन करायची की मार्टिन ल्युथर आणि जॉन कॅल्विन सारख्या माणसांनी मंडळी सोडली आणि ते प्रॉटेस्टंट मंडळीचे उगमस्थान झाले. या प्रॉटेस्टंट मंडळीपैकी कित्येकांनी बायबलमधील शिकवणुकींशी प्रामाणिक राहाण्याचा कळकळीनं प्रयत्न केला.

तथापि, बऱ्याच प्रॉटेस्टंट मंडळी लवकरच एक मनुष्यनिर्मित सुवार्ता शिकवू लागल्या, जिच्यानुसार, कोणीही मनुष्य ख्रिस्ताला त्याचा प्रभु म्हणून आणि तारणहार स्वीकारू शकतो आणि या कृतीमुळे तारण होतं. भूतकाळातील महान पुनरुज्जीवनांकडे एक नजर टाकल्यास असं दिसतं की त्यांच्यापैकी बहुतेकांचा पाया म्हणजे त्या प्रकारची सुवार्ता होती. दुःखदरीत्या, ती बायबलमधील सुवार्ता नव्हती. तरी देखील, देवानं मंडळीयुगात कांही लोकांना तारलं.

**सबंध बायबल म्हणजे बिनचूक ईश्वरी वचन आहे काय?**

ज्या पुष्कळशा प्रॉटेस्टंट संप्रदायांचा विकास झाला, त्यांच्यामध्ये बायबलच्या कित्येक पैलूंच्या संदर्भात एकवाक्यता नाही ही वस्तुस्थिती असं दर्शविते की प्रत्येक संप्रदायानं बायबलमधील अशी पदं निवडली जी त्यांना खासकरून आवडली, आणि मग त्यांनी त्यांची तत्त्वं आणि कबुलीजबाब या पदांपासून विकसित केली. प्रत्येक संप्रदायाचा आग्रह असे की त्यांनी निवडलेली पदं बिनचूक आणि खात्रीची आहेत. अशा प्रकारे, जे ईश्वरी तत्त्वज्ञानविषयक निष्कर्ष त्यांच्या मंडळीची तत्त्वं बनले, आणि त्यांनी निवडलेल्या पदांच्या त्यांना झालेल्या आकलनाची संगति लावून जी तत्त्वं मिळाली होती, ती सर्वस्वी सत्य आणि विश्वासार्ह होती असं वाटायचं. त्यांची शिकवणूक खात्रीच्या ईश्वरी वचनावर, म्हणजे बायबलच्या पक्क्या पायावर आधारित असल्यासारखी वाटायची.

पण जे सत्य आणि विश्वासार्ह वाटलं ते नेहमीच सत्य आणि विश्वासार्ह नव्हतं. दुर्दैवानं, बऱ्याचदा, जी पदं त्यांनी त्यांच्या कबुलीजबाबासाठी आधारभूत म्हणून निवडली होती, त्यांचं चुकीचं आकलन झालेलं असायचं कारण मंडळीतील या ईश्वरी तत्त्ववेत्त्यांनी सबंध बायबल विचारात घेतलं नव्हतं. त्यांचे निष्कर्ष बरोबर आहेत की नाही याची खात्री करून घेण्यासाठी, त्यांनी सबंध बायबलमध्ये काळजीपूर्वक शोध घेतला नाही, आणि शास्त्राची पडताळणी शास्त्राशी केली नाही. असं दिसलं की त्यांचा विश्वास होता की सबंध बायबल बिनचूक आहे, पण प्रत्यक्षात, त्यांनी त्यांचा विश्वास फक्त त्याच पदांवर ठेवला, जी त्यांनी त्यांचे धर्मोपदेश सिद्ध करण्यासाठी निवडली होती. अशा प्रकारे, परिणामतः, त्यांनी सबंध बायबलमधील प्रत्येक पदाचा अधिकार नाकारला.

बायबलवरील या दोषपूर्ण विश्वासाचा परिणाम असा झाला की कित्येकदा सत्यापासून खूपच दूर असलेली सुवार्ता पाठविली जायची. म्हणूनच सबंध मंडळीयुगात निरनिराळ्या संप्रदायांना बायबलमधील तत्त्वांचं निरनिराळं आकलन झालेलं आहे. उदाहरणार्थ, बायबलमधील कित्येक शिकवणुकींबाबत, बाप्टिस्टांची ल्युथेरन्सशी एकवाक्यता नसते, ल्युथेरन्सची प्रेस्बिटेरियन्सशी नसते, प्रेस्बिटेरियन्सची बाप्टिस्टांशी नसते, वगैरे.

आपल्याला माहीत आहे की बायबलमधील प्रत्येक तत्त्वाच्या बाबतीत बायबल सत्य आणि विश्वासार्ह आहे, आणि म्हणून, केवळ <u>एकच</u> सत्य उत्तर असू शकतं. अशा प्रकारे, जर एखाद्या विशिष्ट तत्त्वाबाबत वेगवेगळ्या संप्रदायांनी वेगवेगळ्या भूमिका घेतल्या, तर या संप्रदायांपैकी जास्तीत जास्त एकच संप्रदाय सत्य बोलत असणार, आणि बाकीचे खोटा उपदेश करत असतील.

उलटपक्षी, जर या संप्रदायांचा असा विश्वास असेल की सबंध बायबल देवाचं बिनचूक वचन आहे, आणि त्यांची तत्त्वं केवळ बायबलच्याच आणि सबंध बायबलच्याच अधिकाराखाली असली पाहिजेत, तर मग आपण तर्कसंगतरीत्या अशी अपेक्षा करू शकतो की कालांतरानं, सर्व संप्रदाय प्रत्येक तत्त्व एकाच पद्धतीनं शिकवितील.

शिवाय, मंडळींचे कित्येक मोठे भाग असे होते, उदाहरणार्थ रोमन कॅथलिक, मॉरमॉन्स, सेव्हन्थ डे अॅड्व्हेन्टिस्ट्स, आणि आपल्या काळातील वलयांकित मंडळी, जी खुलेपणानं जाहीर करतात की बायबल आणि नंतर देवाकडून झालेली प्रकटीकरणं, म्हणजेच बायबल पूर्ण झाल्यानंतर जे संदेश दिले गेले ते, या दोन्हींचा परिपाक म्हणजे त्यांच्या मंडळीची तत्त्वं आहेत. म्हणून, त्यांच्या या घोषणेद्वारे, त्यांच्याकडे असा अधिकार असतो, ज्याच्यापासून त्यांच्या बायबलच्या आकलनाची संरचना होते आणि ते निश्चित होतं, जो अधिकार देवाच्या अधिकारापेक्षा वेगळा असतो, आणि देवाचा अधिकार म्हणजे केवळ बायबल आणि सबंध बायबलच (प्रकटीकरण २२:१८–१९). आपण हे अगदी चांगलं समजून घेतलं पाहिजे की १,९०० वर्षांपूर्वी एकदा बायबल लिहून पूर्ण झाल्यावर, त्यात कोणतीही भर घातली जाऊ शकत नव्हती.

जसं आम्ही आधी दर्शविलं, देवाला याची पूर्वकल्पना होती आणि त्यानं असं भाकीत केलं की या वरील सर्व कारणांमुळे, हे भाकीत खरं ठरेल, जे देवानं जाहीर केलं, **"तू . . . महानंदप्राप्ति करून दिली नाही"** (यशया ९:३). जरी इस्राएल, म्हणजे जगभरातील सर्व स्थानिक मंडळी, समुद्रकिनाऱ्यावरील वाळूसारखी असतील, तरी फक्त कांही अवशिष्टच तारले जातील (रोमकरांस पत्र ९:२७).

**मंडळीयुगाचा अंत होईल**

देवानं भाकीत केलं की शेवटी, मंडळीयुगाचा अंत होईल, आणि मग, मंडळीच्या कोणत्याही अधिकारकक्षेच्या बाहेर असलेल्या व्यक्तींकडे सुवार्ता आणून, देव त्याच्या निवडलेल्यांची, म्हणजे ज्यांना तारण्यासाठी देवानं निवडलं, त्यांची कापणी पूर्ण करील (इफिसकरांस पत्र १:३–६).

आपण जेव्हां बायबलमध्ये शोध घेतो, तेव्हां आपल्याला दिसतं की बायबल असं शिकवितं की एक शेवटचं संकट येईल, ज्याला मत्तय २४:२१ मध्ये "मोठं संकट" म्हटलंय. तिथं आपण वाचतो :

> **कारण जगाच्या प्रारंभापासून आतापर्यंत आले नाही व पुढे कधीहि येणार नाही असे मोठे संकट त्या काळी येईल.**

लक्षणीयरीत्या, आपण इतिहासाच्या अशा काळात राहात आहोत जेव्हां आपण जवळजवळ २,००० वर्षांच्या इतिहासाकडे मागे वळून पाहू शकतो, जो बायबल पूर्ण झाल्यावर घडला. जसं आपण या अभ्यासात पूर्वी शिकलो, बायबलच्या बाहेर उपलब्ध असलेली मंडळींच्या इतिहासासंबंधीची ऐतिहासिक माहिती आपल्याला शिकविते की जसं बायबलनं भाकीत केलं होतं, अगदी त्याचप्रमाणे मंडळीयुग अयशस्वी झालं.

पण मग आपल्यापुढे एक मोठा प्रश्न उभा राहातो. बायबलच्या विद्यार्थ्यांना नेहमीच असं समजलं आहे की शेवटी या जगाचा अंत होईल, जेव्हां तारल्या न गेलेल्यांना देवाच्या कोपाची पूर्ण शिक्षा मिळेल, आणि तारले गेलेले लोक नवीन स्वर्गात आणि नवीन पृथ्वीवर ख्रिस्तासोबत सर्वकाळ सुरक्षित असतील. शिवाय, असा एक सर्वसाधारण विश्वास आहे की जगाचा अंत तेव्हां होईल जेव्हां ख्रिस्त रात्री येणाऱ्या चोराप्रमाणे येईल. म्हणजे, अशी समजूत होती की अंताची वेळ आपल्याला बिनचूक कळू शकत नाही. जरी इतिहासातील निरनिराळ्या वेळी, जेव्हां ख्रिस्ती लोकांचा तीव्र छळ जगाच्या कांही भागांमध्ये दिसत होता, तेव्हां असे लोक होते ज्यांनी असा अंदाज वर्तविण्याचं धाडस केलं की त्यांना ख्रिस्त परत येण्याचं वर्ष माहीत होतं, तरी हे असं होतं. अर्थातच, प्रत्येक बाबतीत, त्यांचं चूक असल्याचं दाखवून दिलं गेलं. याचं कारण हे की ख्रिस्त परत येण्यासंबंधी बायबल जे सर्व कांही सांगतं, त्याच्या काळजीपूर्वक विश्लेषणावर त्यांचा निष्कर्ष आधारित नव्हता.

खरं तर, सबंध मंडळीयुगभर असं दिसतं की मंडळींची सर्वसाधारण समजूत अशी होती की अगदी काळाच्या अंतापर्यंत मंडळी चालू राहातील, आणि अचानक, जेव्हां ख्रिस्त रात्री चोरासारखा येईल, तेव्हां ह्या जगाचा अंत होईल.

या तत्त्वाचं एक मोठं भिन्न स्वरूप मागील शतकात लोकप्रिय झालं जेव्हां पूर्वसहस्रक तत्त्व शिकविलं गेलं, खास करून बाप्टिस्ट मंडळीमध्ये. त्या तत्त्वानं जाहीर केलं की ख्रिस्त रात्री चोरासारखा येई ल आणि मंडळीला वर उचलेल, म्हणजे, मंडळीतील सर्व लोकांना स्वर्गात घेऊन जाईल. त्याच वेळी किंवा त्याच्या थोडंच आधी, सात वर्षांचा एक मोठा संकटकाळ असेल. या सात वर्षांच्या काळाच्या मागून लगेचच, सध्याच्या यरुशलेम नगरातून १,००० वर्षे राज्य करण्यासाठी, ख्रिस्त सध्याच्या पृथ्वीवर प्रत्यक्षात परत येईल. या १,००० वर्षांच्या काळानंतर, जगाचा अंत होईल. या प्रकारची शिकवणूक जी सर्वस्वी चुकीची आहे, ती शक्य आहे, कारण अशी अनेक प्रकरणं आहेत, खास करून प्रकटीकरणाच्या पुस्तकात, जी स्पष्टपणे

जगाच्या अंताबद्दल बोलतात, पण जी समजायला अत्यंत अवघड आहेत. फक्त आपल्या काळातच आपल्याला बायबलमधील हे संदर्भ स्पष्टपणे कळू लागू शकतात.

# प्रकरण ३. अंताचं आकलन पुढे ढकलण्याची देवाची योजना

बायबल आपल्याला निश्चितच अशी सूचना देतं की जग खरोखर अंताच्या अगदी जवळ येईपर्यंत, बायबल आपल्याला देत असलेल्या जगाच्या अंताच्या तपशीलांबद्दलच्या कुठल्याही माहितीचं आकलन होणं शक्य नसेल. उदाहरणार्थ, दानीएलाच्या पुस्तकातील पुष्कळ पदं जगाच्या अंताबद्दल बोलतात, पण दानीएल १२:९ मध्ये देव सूचना देतो :

**तो म्हणाला, हे दानीएला, तू आपला स्वस्थ राहा; कारण अंतसमयापर्यंत ही वचने गुप्त ठेवून ती मुद्रित केली आहेत.**

दुसऱ्या शब्दांत, आपण जगाच्या अंतसमयाच्या अगदी जवळ येईपर्यंत, खऱ्या श्रद्धाळूंना सुवार्ते मधील अंतसमयाच्या बाबतीतील तपशीलांची कुठलीही ठोस माहिती समजणार नाही. देवाचा असा उद्देश होता की जगाचा अंत होण्याच्या अगदी थोडा काळ आधी, त्या प्रकारची माहिती खऱ्या श्रद्धाळूंसाठी उपलब्ध होईल, आणि मग ती माहिती ते जगाला उपलब्ध करून देतील.

अंतसमयाबद्दलची माहिती समजू न देण्यासाठी देवानं अवलंबिलेल्या पद्धतींपैकी एक पद्धत म्हणजे जवळजवळ सर्वच मंडळींना मानवनिर्मित भाषार्थशास्त्राचा अंगिकार करू देणं, म्हणजे, बायबलचा अर्थ लावण्याची मानवनिर्मित पद्धत, ज्याच्यामुळे बायबलमधील पुष्कळशी माहिती ईश्वरी तत्ववेत्त्यांच्या मनांसाठी दुष्कर केली. लक्षात घ्या, आपण ह्या दुदैवी वस्तुस्थितीची ह्या अभ्यासात याआधी नोंद घेतली.

बायबल आपल्याला स्पष्टपणे सूचना देतं की ख्रिस्त बोधकथांवाचून बोलला नाही (मार्क ४:३४). बोधकथा म्हणजे स्वर्गीय किंवा आध्यात्मिक अर्थ असलेली एक ऐहिक गोष्ट. म्हणजे, बायबल हे पूर्णपणे एक आध्यात्मिक पुस्तक आहे. ते ईश्वरी वचन आहे, व ख्रिस्त हा ईश्वरी वचनाचं सार आहे (योहान १:१४). ते देवानं लिहिलं असल्याकारणाने, नोंदले गेलेले संवाद, नोंदले गेलेले घटनावृत्त, पूर्णपणे खरे व विश्वासार्ह आहेत. पण ही ऐतिहासिक घटना खरोखर घडली हे समजणं म्हणजे वास्तविकपणे सत्याचं प्रचंड भांडार असणाऱ्या बायबलचा फक्त एक अंश समजणं आहे. अतिमहत्वाची आध्यात्मिक सत्यं शिकविण्यासाठी बायबलमधील प्रत्येक संवादाची, प्रत्येक घटनावृत्ताची, प्रत्येक शब्दाची देवाकडून काळजीपूर्वक योजना व आखणी केली गेली होती.

आध्यात्मिक सत्य शोधण्यासाठी, शास्त्रलेखाची शास्त्रलेखाशी तुलना करीत बायबलच्या सखोल अभ्यासाची आवश्यकता असते (करिंथकरांस पहिले पत्र २:१३). त्यासाठी पवित्र आत्मा परमेश्वरानं सत्यशोधकाचे आध्यात्मिक डोळे उघडण्याचीही आवश्यकता असते. जसं आपण आधीच पाहिलं आहे, अंतसमयाच्या अगदी जवळ येईपर्यंत बायबलमधील पुष्कळ सत्यं उघड करण्याचा, म्हणजे, सत्यशोधकाचे आध्यात्मिक डोळे उघडण्याचा, देवाचा हेतु नव्हता. संपूर्ण मंडळीयुगात हे आंधळेपण सुलभ करण्यासाठी, जगात सर्वत्र प्रस्थापित असलेल्या मंडळींमधील बायबलच्या शिक्षकांचे आध्यात्मिक डोळे उघडणं देवाला योग्य वाटलं नव्हतं. अशा तऱ्हेने, उदाहरणार्थ, त्यांना समजत नाही की बायबलचा पूर्णपणे चुकीच्या अर्थ लावण्याच्या एका पद्धतीनं ते बायबलचा अभ्यास करीत आहेत.

सबंध मंडळीयुगभर, देवानं बायबलमधील पुष्कळ विधानं समजण्यापासून मंडळींना कसं वंचित ठेवलं ह्याचं आणखी एक उदाहरण देता येईल. ज्यांचे आध्यात्मिक डोळे देवानं उघडले आहेत, त्यांना सूचकतेनं समजतं की बायबलच्या मूळ भाषेतील शब्द न शब्द देवाच्या मुखातून आला आहे, व म्हणूनच, तो अगदी सत्य व विश्वासार्ह आहे. अनुवादकानं अनुवादात चूक केलेली असू शकते, पण अनुवादित केल्या जात असलेल्या इब्री किंवा हेल्लेणी शब्दाबद्दल कधीही शंका घेतली जाऊ नये.

मूळ इब्री किंवा हेल्लेणी शब्दाविषयी शंका घेण्याची अडचण खास करून बायबलमधील आकड्यांच्या संबंधात त्रासदायक झाली आहे. उदाहरणार्थ, एखाद्या राजाच्या कारकीर्दीच्या कालावधीची

बायबलमध्ये एका पदात झालेली नोंद बायबलमध्ये इतर ठिकाणी दिलेल्या माहितीशी जुळविणं तत्ववेत्त्यांना जमलेलं नाही. म्हणून, त्यांनी वारंवार असा निष्कर्ष काढला आहे की ती लेखनातील चूक असू शकते, म्हणजे, कधीतरी, बायबलच्या मूळ लेखनाची प्रत काढताना, एखाद्या लेखकानं चुकून मूळ संख्येतील एखादा आकडा थोडासा बदलला असेल, व अशा तऱ्हेने, ती संख्या मूळ लिखाणात नसलेली अशी झाली, व ती चूक पुढील प्रतींमध्येही राहिली असेल. परिणामतः , ते म्हणतात की बायबलमध्ये नोंद केल्या गेलेल्या प्रत्येक शब्दावर आपण पूर्णपणे विश्वास ठेवू शकत नाही.

बायबलबाबत त्या प्रकारच्या वृत्तीचा अर्थ असा होतो की आपण बायबलमधील कशावरच खरोखर विश्वास ठेवू शकत नाही. बायबलमध्ये नोंदविलेल्या संख्यांबाबत जर तशी चूक होऊ शकते, तर मग बायबलमधील कोणत्याही शब्दाबाबत तशी चूक घडू शकते, आणि आपल्याला असा निष्कर्ष काढावा लागेल की बायबलमधील कांहीच विश्वासार्ह नाही.

तथापि, त्यांना जे शिकवायचं आहे, ते शिकविण्यासाठी ज्या पदांचा ते उपयोग करतात, त्यांना अधिकार प्राप्त व्हावा म्हणून, बायबलचे शिक्षक जाहीर करतात की बायबल खात्रीलायक आणि बिनचूक आहे. पण सबंध बायबलमधील प्रत्येक शब्दाबाबत हे खरं आहे असा त्यांचा खरोखर विश्वास नसतो. बायबल खात्रीलायक आहे असा त्यांचा खरंच विश्वास असता, तर लेखकाची चूक वगैरेंसारख्या गोष्टींबाबत ते कधीच बोलले नसते. त्यांना कळत नाही की देवानं त्याचं वचन सुरक्षित ठेवलं आहे, जेणेकरून लेखनात चूक होऊ शकणार नाही. सत्य लपविण्यासाठी, ख्रिस्त मुद्दाम दाखल्यांमध्ये बोलला, आणि देवानं मंडळीतील ई श्वरी तत्त्ववेत्त्यांना, बायबलमधील कांही शब्दांच्या बिनचूकतेबाबत प्रश्न उपस्थित करू दिले, यामुळे बायबलमध्ये नोंदविलेली कित्येक सत्यं लपून राहिली आहेत.

जोपर्यंत देवाला बायबलमधील कांही विशिष्ट सत्यं उघड करायची नसतात, तोपर्यंत तो ती लपवून कशी ठेवतो, याच्या अनेक मार्गांपैकी ही फक्त दोनच उदाहरणं आहेत. आपण ओळखलं पाहिजे की कोणीही व्यक्ति असा दावा कधीही करू शकत नाही की त्याच्या स्वतःच्या सामर्थ्यामुळे किंवा पावित्र्यामुळे किंवा नीतिमत्त्वामुळे त्याला बायबल योग्य प्रकारे समजू शकलं. आपण ओळखलं पाहिजे की फक्त देवच आपले डोळे त्या सत्यांसाठी उघडू शकतो, जी देवानं बायबलमध्ये लपवून ठेवली आहेत. आणि निःसंशयपणे, हे करण्यासाठी त्याचं स्वतःचं वेळापत्रक आहे.

आपण हे लक्षात ठेवलं पाहिजे की देवानं बायबलचं लिखाण सुमारे २,००० वर्षांपूर्वी संपविलं. पण अंतसमयापर्यंत बायबलमधील पुष्कळ सत्यं कोणालाच समजू नयेत अशी देवाची योजना होती. आणि तरीही, जवळजवळ २,००० वर्षे, बायबलचे कळकळीचे, निष्ठावान, प्रामाणिक विद्वान, जे खरोखर तारले गेले होते, त्यांना बायबल उपलब्ध होतं, आणि बायबल जास्तीतजास्त समजून घेण्याचा त्यांनी खूप प्रयत्न केला.

अशा प्रकारे, आपल्याला समजायला लागू शकतं की देवानं बायबल अत्यंत क्लिष्ट, किचकट पद्धतीनं का लिहिलं. उदाहरणार्थ, आपल्याला समजतं की बायबलचा अर्थ लावण्याची एक अत्यंत चुकीची पद्धत देवानं मंडळींना का स्वीकारू दिली. आपण अंतसमयाच्या जवळ असल्यामुळेच, आणि हे नवीन सत्य आपल्याला देण्याचा देवाचा विदित हेतु आहे, केवळ म्हणूनच, पूर्वीच्या बायबलच्या विद्यार्थ्यांना बायबलमधील जितकी सत्यं समजली, त्यापेक्षा किती तरी अधिक ती आपल्याला समजत आहेत.

### आता आपण आकलन होण्याच्या काळात आहोत

आता आपण त्या काळापर्यंत पोचलो आहोत. परिणामस्वरूप, बायबलमधील आतापर्यंत गूढ असलेली पदं आता समजू लागली आहेत. बायबलमधून जवळजवळ रोज एक सत्य बाहेर पडत आहे. याच्या परिणामस्वरूप, जगाच्या अंताच्या बाबतीत असलेल्या देवाच्या योजनेचं वाढत्या प्रमाणावर आकलन होत आहे. शास्त्रलेखाची शास्त्रलेखाशी तुलना करणं ह्या बायबलच्या तत्वाचं अनुकरण केल्यानं, व बायबलमध्ये नोंद केल्या गेलेल्या प्रत्येक उदाहरणात व प्रत्येक घटनावृत्तात व प्रत्येक ऐतिहासिक घटनेत दडलेलं

आध्यात्मिक सत्य आपण शोधलं पाहिजे हे ओळखल्यानं, बायबलच्या सर्वात जास्त प्रामाणिक सत्यशोधकाला आतापर्यंत नाकारल्या गेलेल्या सर्व प्रकारच्या सत्यांकडे देव आपले आध्यात्मिक डोळे उघडत आहे. जगाच्या समापनाच्या प्रसंगांचा बायबलमधील आकृतीबंध आता आपण शोधू शकतो. संपूर्ण बायबलमध्ये काळजीपूर्वक शोध घेण्याऱ्या खऱ्या श्रद्धाळूंचे डोळे, इतिहासाच्या ह्या काळात, देव उघडत असल्यामुळेच आपल्यात बायबलमधील हे सत्य कळण्याची अधिक क्षमता आली आहे.

बायबलमुळे आपल्याला ह्याची आठवण झाली पाहिजे की खऱ्या श्रद्धाळूंना अशा प्रकारच्या माहितीचं कधीतरी आकलन होईल असा देवाचा हेतु होता. उपदेशक ८:५–७ मधील देवाचा जाहीरनामा आठवा :

**जो आज्ञा पाळितो तो अनिष्ट पाहणार नाही; नेमिलेला काळ व न्यायसमय हे ज्ञान्याच्या मनाला अवगत होतील; प्रत्येक गोष्टीला नेमिलेला काळ व न्यायसमय असतो, कारण मनुष्याची भयंकर दुर्दशा होते; पुढे काय होणार हे त्याला ठाऊक नसते; कसे काय होणार हे त्याला कोण सांगेल?**

ह्या पदांमध्ये, देव आपल्याला असं शिकवित आहे की माणसाला स्वभावतः त्याच्या मृत्यूच्या दिवसाच्या वेळापत्रकाची किंवा जगाच्या अंतासाठी असलेल्या देवाच्या न्यायप्रक्रियेची कल्पना नाही. तथापि, खऱ्या श्रद्धाळूच्या, शहाण्या माणसाचं हृदय असणाऱ्या माणसाच्या आयुष्यात, त्याला दिवस व न्याय समजेल असा देवाचा हेतू आहे.

वस्तुस्थिती अशी आहे की खऱ्या श्रद्धाळूंना बायबलमधून काळाची पुष्कळ माहिती कळेल, पण आपल्या काळातच खऱ्या श्रद्धाळूंना ह्या सत्याची जाणीव झाली आहे. म्हणून, उदाहरणार्थ, ख्रिस्तपूर्व ११,०१३ साली झालेल्या निर्मितीपासून सुरुवात होऊन, इतिहासाच्या संपूर्ण दिनदर्शिकेचा शोध आपल्या काळातच खऱ्या श्रद्धाळूंना बायबलमधून लागला आहे.

उपदेशक ८ मध्ये मांडलं गेलेलं तत्व थेस्सलनीकाकरांस पहिले पत्र ५:२–६ मध्ये पुढे जाहीर केलं गेलं आहे, जिथं आपण वाचतो :

**कारण तुम्हाला स्वतःला पक्के माहीत आहे की, जसा रात्री चोर येतो, तसाच प्रभूचा दिवस येतो. शांति आहे, निर्भय आहे असे ते म्हणतात तेव्हां गरोदर स्त्रीला ज्याप्रमाणे अकस्मात् वेदना होतात त्याप्रमाणे त्यांचा अकस्मात् नाश होतो, आणि ते निभावणारच नाहीत. बंधुजनहो, त्या दिवसाने चोरासारखे तुम्हांस गाठावे असे तुम्ही अंधारात नाही. कारण तुम्ही सगळे प्रकाशाची प्रजा व दिवसाची प्रजा आहा. आपण रात्रीचे व अंधाराचे नाही; ह्यावरून आपण इतरांसारखी झोप घेऊ नये, तर जागे व सावध राहावे.**

ही पदं असं शिकवितात की जे लोक त्यांच्या बायबलच्या सध्याच्या ज्ञानात किंवा जीवनाच्या त्यांच्या सध्याच्या तत्वज्ञानात समाधानी आहेत, ज्यात त्यांनी न्यायदिवसाबद्दल भीति बाळगू नये ह्या कल्पनेचा समावेश होतो, त्यांच्यासाठी ख्रिस्त रात्री येणाऱ्या चोराप्रमाणे येईल. बायबल देत असलेल्या काळाच्या माहितीचं त्यांना ज्ञान नाही किंवा त्यांचा त्याच्यावर विश्वास नाही.

उलटपक्षी, जे जागे व सावध आहेत, म्हणजे, शहाणे आहेत, त्यांना देवानं एक नवीन पुनरुत्थित आत्मा दिला आहे, त्यांना ख्रिस्ताच्या परतण्याच्या स्वरूपाबद्दल व वेळेबद्दल पुष्कळ माहिती मिळेल.

हे तत्व आमोस ३:७ मधील भाषेत पुढे मांडण्यात आलं आहे, जिथं देव म्हणतो :

**प्रभु परमेश्वर आपले रहस्य आपले सेवक संदेष्टे यांस कळविल्याशिवाय खरोखर काहीच करीत नाही.**

ही तत्वं लक्षात ठेवून, आपल्याला कळतं की जगाच्या इतिहासातील समापनाच्या घटनांची पूर्व कल्पना येण्याची क्षमता आपल्यामध्ये आहे. अर्थात, ही सत्यं, ज्यांचा जगाच्या अंताशी संबंध आहे असं आपल्याला वाटतं, ती बायबलमधूनच आली असली पाहिजेत एवढंच नव्हे, तर बायबलच्या सर्वात काळजीपूर्वक परीक्षणावर ती खरी उतरली पाहिजेत.

बायबल आपल्याला स्पष्टपणे सांगतं की ख्रिस्त रात्री येणाऱ्या चोराप्रमाणे येईल (पेत्राचे दुसरे पत्र ३:१०, थेस्सलनीकाकरांस पहिले पत्र ५:२). संपूर्ण मंडळीयुगात, मंडळींनी असं शिकविलं आहे. बायबल समजून घेण्याच्या त्यांच्या सर्वोत्तम प्रयत्नांच्या आधारे, बायबलच्या देवभीरू शिक्षकांनी व ईश्वरी तत्ववेत्त्यांनी रास्तपणे असा आग्रह धरला आहे की आपल्याला आपल्या वैयक्तिक तारणाची घोर चिंता वाटली पाहिजे कारण उद्या आपण जिवंत असू ह्याची आपल्याला शाश्वती नाही आहे. तसंच, बहुतेक सर्व मंडळींनी असं शिकविलं की आपण हेही ओळखलं पाहिजे की जगाचा अंत व न्याय देण्यासाठी ख्रिस्ताचं परत येणं हे केव्हांही घडू शकतं.

तथापि, आम्ही आधीच निदर्शनास आणल्याप्रमाणे, संपूर्ण मंडळीयुगात, बायबलच्या इतिहासाच्या कालरेषेचं स्पष्ट ज्ञान नव्हतं. निर्मितीचं साल, नोहाच्या काळातील प्रलयाचं साल, अब्राहामाची सुंता झालेलं साल, ख्रिस्ताच्या बाप्तिस्म्याचा दिवस व साल वगैरे कुणीच अचूकरीत्या निश्चित करू शकलं नव्हतं.

भूतकाळातील प्रसंगांच्या वेळेच्या, तसंच ख्रिस्ताच्या परत येण्याच्या वेळेच्या कुठल्याही अचूक ज्ञानाच्या अभावाचं देवाकडून काळजीपूर्वक नियोजन केलं गेलं होतं. दानीएल १२ मध्ये हे दर्शविलं गेलं आहे, जिथं आपण वाचतो की दानीएल, ज्याला अंतसमयाच्या माहितीचं पुष्कळ आकलन दिलं गेलं होतं, त्याला **"अंतसमयापर्यंत ही वचने गुप्त ठेव व हे पुस्तक मुद्रित करून ठेव"** असं सांगण्यात आलं होतं (दानीएल १२:४).

पण आता आपण काळाच्या अंताशी पोचलो आहोत, उपदेशक ८:५–६ व आमोस ३:७ मधल्या विधानांसारख्या विधानांच्या महत्त्वपूर्णतेकडे देवानं आपले आध्यात्मिक डोळे उघडले आहेत.

म्हणूनच, आपण पूर्वी दखल घेतल्याप्रमाणे, थेस्सलनीकाकरांस पहिले पत्र ५:२–६ मध्ये देव आपल्याला शिकवितो की आपल्या काळात पुष्कळ लोक असा आग्रह धरतील की ख्रिस्त रात्री येणाऱ्या चोराप्रमाणे येईल, तेव्हां त्यांना एवढंच कळेल की त्यांच्यावर देवाचा कोप येणार आहे.

आपण आता जगाच्या अंतसमयाच्या अगदी जवळ असल्याकारणाने, ही पदं अत्यंत लक्षणीय आहेत. आपल्या काळात देवाच्या दयेने बायबलचा काळजीपूर्वक अभ्यास करून आपण इतिहासाच्या कालरेषेचा उलगडा करू शकलो आहोत. बायबलमध्ये नोंदल्या गेलेल्या भूतकालीन ऐतिहासिक प्रसंगांच्या अचूक वेळापत्रकासंबंधीची पुष्कळ माहितीच बायबलनं आपल्यासमोर उघड केली आहे एवढंच नाही, तर जगाच्या अगदी अंताच्या वेळी घडायला हव्यात अशा घटनांच्या वेळेसंबंधीची पुष्कळ माहितीही त्यानं आपल्याला दिली आहे.

हे असं असल्याचं आपल्याला आश्चर्य वाटू नये. जेव्हां देवानं नोहाच्या काळात सबंध पृथ्वीचा नाश केला, तेव्हां ही भयंकर घटना, म्हणजे प्रचंड प्रलयात जगाचा नाश, येऊ घातला होता, व ते केव्हां घडेल याचा नेमका दिवस, हे त्या काळातील जगाला समजलं होतं, याची खातरजमा त्यानं केली. नोहा हा कांही त्या प्रचंड तारवाचा केवळ रचनाकारच होता असं नाही, जे बांधलं जात असल्याची चांगली माहिती त्या काळातील जगाला असली पाहिजे, तर नोहा स्वतः **"एक नीतिमत्त्वाचा उपदेशक"** होता (पेत्राचे दुसरे पत्र २:५). प्रलय सुरु होण्याच्या सात दिवस आधी, प्रलय कधी सुरु होईल याची नेमकी तारीख देवानं नोहाला दिली (उत्पत्ति ७:४, १०, १६).

त्याचप्रमाणे, जेव्हां देव निनवेच्या दुष्ट नगराचा नाश करणार होता, तेव्हां देवानं त्या नगराला अशी धोक्याची सूचना देण्यासाठी योना संदेष्ट्याला पाठविलं की योनानं नगराला धोक्याची सूचना देण्यास सुरुवात केल्यानंतर ४० दिवसांनी नगराचा नाश होईल. (योना ३:४).

त्याचप्रमाणे, आपण समजून घेतलं पाहिजे की, जगाच्या अंताच्या नेमक्या वेळापत्रकाच्या संबंधातील माहिती आज देव देत आहे. ही माहिती फक्त बायबलमधूनच आली पाहिजे. जे बायबल १,९०० हून अधिक वर्षांपूर्वी पूर्ण केलं गेलं, त्याच्यापेक्षा आजचं बायबल कांही वेगळं नाही आहे. पण अंतसमयापर्यंत ही माहिती उघड करण्याची देवाची योजना नसल्यामुळे, जगाच्या अंतसमयाच्या तपशीलाबद्दलची ही माहिती बायबलच्या शब्दांमध्ये खोलवर दडवून ठेवली होती. म्हणून, अगदी सर्वात प्रामाणिक, मेहनती अशा बायबलच्या विद्यार्थ्यांना सुद्धा हे समजणं शक्य नव्हतं.

तथापि, अंतसमयाच्या जवळ, ही विस्तृत माहिती जगाला उपलब्ध व्हावी अशी देवाची योजना नेहमीच होती. बायबलमधील सर्व पुरावा असं दर्शवितो की सध्या आपण अंतसमयाच्या अगदी जवळ आहोत, आणि म्हणून आपल्याला अशी खात्री बाळगता येते की काळाच्या संबंधातील ही महत्त्वाची माहिती आता उपलब्ध असायला हवी, आणि खरंच, ती माहिती सर्व जगाला दिलीच पाहिजे.

बायबलमध्ये ज्या ऐतिहासिक घटना नोंदविलेल्या आहेत, त्यांच्यासंबंधातील जी सर्व माहिती बायबल देतं, ती काळजीपूर्वक तपासल्यावर, थेट पृथ्वीच्या अस्तित्त्वाच्या शेवटच्या दिवसांपर्यंतच्या, भविष्यकाळातील घटनांची वेळ आणि स्वरूप यांचं पुष्कळसं आकलन आपल्याला होऊ शकतं. बायबल जी बरीच मूलभूत सत्यं आपल्याला शिकवितं, त्यांची रूपरेषा आपण देऊ शकतो आणि ती सत्यं खालीलप्रमाणे आहेत.

१. बायबल हे एक फारच विश्लेषणात्मक पुस्तक आहे. व्यक्तिगत विश्लेषण किंवा तार्किक कारणमीमांसा करायला उत्तेजन मिळावं अशा पद्धतीनं ते लिहिलेलं नाही (पेत्राचे दुसरे पत्र १:२०). ते एखाद्या अभियांत्रिकी पुस्तकासारखं लिहिलेलं आहे, ज्यात सत्य हे एक निर्विवाद वस्तुस्थिती म्हणून मांडलेलं असतं.

२. बायबलमध्ये नोंदविलेली प्रत्येक संख्या बिनचूक असते. जरी एखादी संख्या समजून घेण्यास अवघड असली, तरी ती चूक आहे असं कधीच मानता कामा नये.

३. ऐतिहासिक घटनांच्या घडण्यामध्ये एक मोठी अचूकता आहे. उदाहरणार्थ, इस्राएल मिसरमध्ये बरोबर ४३० वर्षे होते. मिसरपासून कनानापर्यंतचा प्रवास करतांना, इस्राएल बरोबर ४० वर्षे रानावनात होते.

४. जरी नेहमी नसेल तरी, बऱ्याचदा, बायबलमधील कांही संख्यांचा उपयोग देव आध्यात्मिक सत्य समजाविण्यासाठी करतो. मत्तय १८:२१–२२ मध्ये, येशू ख्रिस्त संख्यांच्या महत्त्वाबद्दल निर्देश करतो. जेव्हां पेत्रानं येशूला विचारलं की त्यानं त्याच्या भावाला किती वेळा क्षमा करावी, तेव्हां येशूनं त्याच्या उत्तराचा खुलासा करण्यासाठी संख्या वापरल्या. पद २२ मध्ये तो म्हणतो :

**. . . सात वेळां असे मी तुला म्हणत नाही, तर साताच्या सत्तर वेळां.**

आपण नेहमीच एकमेकांना क्षमा करायची असल्यामुळे, आपल्याला कळू शकतं की येशू आध्यात्मिक सत्यं चित्रित करण्यासाठी संख्या वापरतो. या संख्या एकट्या असू शकतात किंवा एका मोठ्या संख्येचा भाग असू शकतात. एकमेकांपासून कित्येक वर्षांच्या अंतरानं घडलेल्या समांतर घटना जोडण्यासाठी आणि त्यांची संगति लावण्यासाठी याचा उपयोग होतो. या संख्यांपैकी बहुतेक संख्यांची यादी खालीलप्रमाणे :

२ – ज्यांना सुवार्ता आणण्याचं काम नेमून दिलं आहे

३ – देवाचा हेतु

४ – आध्यात्मिकरीत्या देवाच्या दृष्टिक्षेपात असलेली सर्वात दूरची कालमर्यादा किंवा अंतर

५ – प्रायश्चित्त, जे न्याय तसंच तारण या दोन्हींवर जोर देतं

७ – देवाच्या उद्देशाची परिपूर्ण पूर्तता

१० – जे कांही दृष्टिक्षेपात असेल त्याची समाप्ति

११ – निर्मितीच्या नंतर ११,००० वर्षांनी ख्रिस्ताचं पहिल्यांदा येणं

१२ – जे कांही दृष्टिक्षेपात असेल त्याचं पूर्णत्व

१३ – जगाचा अंत, ज्याचा तपशील निर्मितीच्या नंतर बरोबर १३,००० वर्षांनी सुरु झाला

१७ – स्वर्ग

२३ – देवाचा कोप किंवा न्याय

३७ – देवाचा कोप किंवा न्याय

४० – कसोटी घेणं

४३ – देवाचा कोप किंवा न्याय

एक मोठी संख्या, जिचे लहान संख्यांमध्ये अवयव पाडता येतात, तिच्या द्वारे आपल्याला आध्यात्मिक सत्य कसं सापडतं, याचं एक उदाहरण योहान २१ मध्ये दिलेलं आहे. तिथं बायबल १५३ मासे पकडण्याची नोंद करतं. जाळं फाटलं नाही. सर्व मासे सुरक्षितरीत्या किनाऱ्यावर आणले गेले, आणि किनारा स्वर्गाचं प्रतिनिधित्व करतो, आणि यासाठी तारवाचा वापर केला गेला नाही, जे स्थानिक सभेचं उदाहरण असतं. आध्यात्मिकरीत्या, हे मासे सर्व खऱ्या श्रद्धाळूंचं, निवडलेल्यांचं प्रतिनिधित्व करतात, जे मंडळीयुगाच्या समाप्तीनंतर, नरकापासून तारले जातील, आणि नरकाचं उदाहरण म्हणजे समुद्र. १५३ या आकड्याचे अवयव पडतात, जे ३ X ३ X १७ = १५३ यावरून दिसतं. आध्यात्मिकरीत्या, या संख्या असं दर्शवितात की देवानं ज्या सर्वांना देवाच्या कोपापासून तारलं आहे, त्यांना स्वर्गात (म्हणजे १७ ही संख्या) आणण्याच्या देवाच्या हेतूचं (म्हणजे ३ ही संख्या) वर्णन १५३ ही संख्या करते. अशा प्रकारे, या ऐतिहासिक घटनेत दडलेली आध्यात्मिक सत्यं दिसायला १५३ ही संख्या आपल्याला मदत करते.

५. कधीकधी बायबल अशा एखाद्या संख्येकडे आपलं लक्ष वेधतं जी एका भविष्यकालीन घटनेचं भाकीत करत असते. उदाहरणार्थ, दानीएल १२:१२ मध्ये, देव एका आशीर्वादित व्यक्तीबद्दल बोलतो जो प्रतीक्षा करील आणि १,३३५ दिवसांची अखेर पाहील. आपल्याला दिसतं की हे येशूच्या येण्याचं भाकीत करत आहे, ज्याचं या पृथ्वीसाठीच्या आध्यात्मिक प्रायश्चित्ताचं कार्य इसवी सन २९ मध्ये, २६ सप्टेंबर रोजी सुरु झालं, जेव्हां त्याला देवाचा कोकरा म्हणून अधिकृतरीत्या घोषित केलं गेलं. ते २२ मे, ३३ पर्यंत, म्हणजे पेण्टेकॉस्टच्या दिवसापर्यंत चालू राहिलं, जेव्हां पवित्र आत्म्याचा वर्षाव झाला आणि मंडळीयुगाची अधिकृत सुरुवात झाली. या दोन घटनांमधील काळ बरोबर १,३३५ दिवसांचा होता, जसं दानीएल १२:१२ मध्ये भाकीत केलं गेलं होतं.

६. हे स्पष्टपणे समजून घेतलं पाहिजे की बायबलमधील कोणत्याही सत्याचं खरं आकलन तेव्हांच होऊ शकतं, जेव्हां पवित्र आत्मा असं ठरवितो की ते सत्य आपल्याला समजण्याची वेळ आली आहे. कोणतंही सत्य समजण्याआधी, देवानं आपली मनं आणि आध्यात्मिक डोळे उघडावे लागतात. म्हणून, या आध्यात्मिक दृष्टीसाठीची याचना ही बायबलमधील सत्य शोधणाऱ्या कोणाही व्यक्तीची सततची प्रार्थना असली पाहिजे. या जगाच्या इतिहासाच्या समाप्तीच्या वेळेच्या घटनांची वेळ आणि स्वरूपाचं आकलन यांना सुद्धा हे थेट लागू होतं.

७. कलस्सैकरांस पत्र २:१६–१७ मध्ये, देव आपल्याला माहिती देतो की सणाचे दिवस पुढे होणाऱ्या गोष्टींच्या छाया आहेत. या पदात जाहीर केलं आहे :

**तर मग खाण्यापिण्याविषयी, तसेच सण, अमावास्या किंवा शब्बाथ पाळण्याविषयी कोणाला तुमचा निर्णय करू देऊ नका; ह्या बाबी पुढे होणाऱ्या गोष्टींच्या छाया आहेत; शरीर तर ख्रिस्ताचे आहे.**

म्हणून, आपण अपेक्षा करू शकतो, आणि आपल्याला तसं दिसतं सुद्धा, की देवाच्या सुवार्ता योजनेच्या उलगडण्यातील प्रत्येक महत्त्वाचा टप्पा सणाच्या दिवशी घडतो. उदाहरणार्थ, ज्या दिवशी वल्हांडणाचा सण पाळला जायचा होता, त्या दिवशी ख्रिस्ताला वधस्तंभावर चढविलं गेलं. पेण्टेकॉस्टचा दिवस म्हणजे मंडळीयुगाच्या सुरुवातीला, जेव्हां पवित्र आत्म्याचा वर्षाव झाला, तो दिवस. आपल्याला दिसेल की हे तत्त्व अगदी थेट पृथ्वीच्या अस्तित्त्वाच्या शेवटच्या दिवसापर्यंत लागू होतं, जो मांडवांच्या सणाचा शेवटचा दिवस असेल.

आपल्या बायबलच्या अभ्यासात, आपण जर ही सात तत्वं लक्षात ठेवली, तर बायबलमधून सत्य शिकण्याच्या आपल्या प्रयत्नात आपल्याला पुष्कळ मदत मिळेल.

७ क्रमांकाचा हा मुद्दा, जो बायबलमधील सणांच्या तारखा व देवाच्या इतिहासाच्या कालरेषेच्या उलगड्यामधील महत्वपूर्ण क्षण, ह्यांच्यामधील संबंधाबद्दल बोलतो, त्याच्या महत्वामुळे, ह्या मुद्द्यावर आणखी जोर दिल्यास बरं पडेल. असं केल्यानं, ह्या ऐतिहासिक क्षणांमध्ये बऱ्याचदा असलेल्या मोठ्या अचूकतेचाही आपल्याला शोध लागेल. नंतर आपल्याला कळेल की ही अचूकता पुढे जगाच्या अंताच्या अगदी शेवटच्या दिवसापर्यंत आहे.

**काळाचे महत्त्वाचे टप्पे सणांच्या दिवसाशी जोडलेले आहेत**

जसं आपण याआधी पाहिलं, जे सण जुन्या करारातील इस्राएलानं पाळायचे होते, त्यांच्या दिवसांशी काळाच्या उलगडण्यातील कित्येक महत्त्वाचे टप्पे अचूकपणे बांधले गेले होते. बायबलमधील सणांची दिनदर्शिका एका शुद्ध प्रतिपदेपासून दुसऱ्या शुद्ध प्रतिपदेपर्यंतच्या काळावर आधारित होती, ज्यामुळे बायबलमधील महिना २९ किंवा ३० दिवसांचा असायचा. बायबलमध्ये असलेल्या काळाच्या माहितीचं काळजीपूर्वक विश्लेषण केल्यावर आपल्याला कळतं की, वसंत ऋतूतील दिवस व रात्र ज्या दिवशी समान असतात, म्हणजे २१ किंवा २२ मार्च, त्या दिवसाच्या जास्तीत जास्त जवळ, पण १४ दिवसांहून अधिक लवकर नाही, असा प्रत्येक वर्षाचा पहिला महिना सुरु व्हायचा.

जसं आपण पाहिलं आहे, देवानं कित्येक महत्त्वाचे सण स्थापन केले, जे देवाच्या तारणयोजनेच्या महत्त्वाच्या पैलूंशी निगडित होते. ते "**पुढे होणाऱ्या गोष्टींची छाया होते**." हे महत्त्वाचे सणाचे दिवस खालीलप्रमाणे आहेत :

१. वल्हांडण, पहिल्या महिन्याचा १४ वा दिवस.
२. पेण्टेकॉस्ट, ज्याला कापणीचा सण असं पण म्हटलं जातं, वल्हांडणाबरोबरच असणाऱ्या सातव्या दिवसाच्या शब्बाथानंतर किंवा वल्हांडणानंतरच्या पहिल्या शब्बाथानंतर, ५० दिवसांनी.
३. सातव्या महिन्याचा पहिला दिवस एक खास सणाचा दिवस होता ज्याला ईश्वरी तत्त्ववेत्ते कर्ण्यांचा सण म्हणतात. त्याला योबेलचा सण म्हणणं जास्त योग्य होईल. त्या दिवशी जे कर्णे वाजविले गेले, ते बायबलमधील चांदीचे कर्णे नव्हते. त्या दिवशी, मेंढ्याचं शिंग वाजविलं जाई. बायबलच्या बिनचूक भाषांतरात त्याला योबेलचा दिवस (गणना २९:१) किंवा योबेलचा स्मरणदिवस (लेवीय २३:२४) असं म्हटलं आहे.

४. दर पन्नासावं वर्ष हे योबेलचं वर्ष होतं, जे ह्यावर जोर देतं की सुवार्ता (स्वातंत्र्य) सर्व जगात जाहीर केली गेली जायची होती. योबेलच्या वर्षांची सुरवात खिस्तपूर्व १४०७ साली झाली जेव्हां इस्राएलानं कनानाच्या भूमीत प्रवेश केला, व त्यानंतर ५० वर्षांच्या अंतरानं त्यांचं पालन केलं गेलं पाहिजे होतं. (लेवीय २५:८–१३). अशा तऱ्हेने, खिस्तपूर्व ७ साल, खिस्ताच्या जन्माचं साल, हे योबेलचं वर्ष होतं. आणि इ.स. १९९४ साल, जे खिस्तपूर्व ७ सालाच्या नंतर २,००० वर्षांनी आलं, तेही योबेलचं वर्ष होतं.
५. सातव्या महिन्याच्या दहाव्या दिवसाला प्रायश्चित्ताचा दिवस म्हटलं गेलं. त्यालाही योबेलचा दिवस म्हटलं गेलं (लेवीय २५:९), आणि ते म्हणजे ज्या सर्वांना येशू तारण्यास आला त्यांच्या पापांसाठी प्रायश्चित्ताची तरतूद करण्याच्या महान प्रसंगाकडे पाहणं होतं.
६. सातव्या महिन्याच्या १५ व्या दिवसापासून २२ व्या दिवसापर्यंत मांडवांचा सण होता, जो संग्रहाच्या सणाच्या दिवशीच होता.

लक्षणीयरीत्या, ह्यापैकी प्रत्येक सणाच्या दिवसाची वेळ ही देवाच्या तारणयोजनेच्या उलगड्याच्या अतिशय महत्वपूर्ण टप्प्यांशी निगडीत होती. काळाच्या थेट अंतापर्यंतची इतिहासाची कालरेषा विकसित करण्यासाठी आपल्याला मदत करणाऱ्या बायबलमधील सर्व माहितीचा जेव्हां आपण मेळ बसवितो, तेव्हां आपल्याला खालील गोष्टी सापडतात :

१. बायबलमधील बरीचशी माहिती ह्या वस्तुस्थितीकडे निर्देश करते की, येशू, जो योबेलचं निव्वळ सार आहे, त्याचा जन्म खिस्तपूर्व ७ साली २ ऑक्टोबर रोजी झाला. खिस्तपूर्व ७ हे साल योबेलचं साल आहे. खिस्तपूर्व ७ साली, २ ऑक्टोबर हा प्रायश्चित्ताचा दिवस होता, ज्या दिवशी योबेलचं मेंढ्याचं शिंग वाजविलं गेलं पाहिजे होतं. अशा तऱ्हेने, प्रायश्चित्ताचा दिवस व खिस्तपूर्व ७ साल ही दोन्ही योबेलशी निगडीत होती. लक्षात ठेवा, योबेलच्या केंद्रस्थानी ही वस्तुस्थिती होती की सुवार्ता संपूर्ण जगात प्रकाशित केली जायला पाहिजे होती. आणि सुवार्ता संपूर्ण जगात प्रकाशित केली जाऊ शकेल ह्याची सर्व व्यवस्था लावण्यासाठी येशू ह्या पृथ्वीवर आला. अशा तऱ्हेने, येशू, जो योबेलचं निव्वळ सार आहे, त्याच्या जन्माची वेळ व योबेलच्या केंद्रस्थानी असलेला दिवस व साल ह्यामधील लक्षणीय दुवा आपल्याला दिसतो.
२. ज्या दिवशी येशूनं मसीहा म्हणून अधिकृतरीत्या काम सुरू केलं तो देवाच्या तारणयोजनेतील पुढील महत्वाचा क्षण होता. त्या दिवशी त्याला जगापुढे देवाचा कोकरा म्हणून घोषित केलं गेलं, जो जगाची पापं हरण करण्यासाठी आला होता. आपल्या आधुनिक दिनदर्शिकेप्रमाणे, तो दिवस २६ सप्टेंबर, इ.स. २९ होता. बायबलच्या दिनदर्शिकेप्रमाणे, तो सातव्या महिन्याचा पहिला दिवस आहे, जो योबेलच्या सणाचा दिवस आहे (ज्याला ईश्वरी तत्ववेत्त्यांनी चुकीनं कर्ण्याचा सण म्हटलं आहे). येशूच्या सेवेच्या अधिकृत सुरुवातीच्या घोषणेचं, म्हणजे आपल्या योबेलचं, योबेलच्या सणाशी असलेलं सुंदर साम्य आपल्याला निश्चितच दिसतं.
३. येशूनं, बळी दिला जाणारा देवाचा कोकरा म्हणून, अक्षरशः देवाच्या कायद्याच्या मागणीनुसार अशा पद्धतीनं दंड सहन केला, जो, ज्या लोकांना तारण्यास येशू आला, त्या लोकांना दिल्या जाऊ शकणाऱ्या शिक्षेच्या तोलामोलाचा होता, जेव्हां त्यानं त्यांच्या पापांचा दंड भरला. ही प्रचंड शिक्षा गुरूवारी संध्याकाळी गेथशेमानेच्या बागेत सुरू झाली व शुक्रवारच्या सूर्यास्ताच्या थोडाच वेळ आधीपर्यंत सुरू राहिली. ही भयंकर घटना बरोबर त्याचवेळी घडली, ज्या वेळी वल्हांडणाच्या सणाचं पालन केलं जावं अशी बायबलनं आज्ञा दिली होती. बायबलच्या दिनदर्शिकेनुसार, तो शुक्रवार, पहिल्या महिन्याचा चौदावा दिवस होता. आधुनिक दिनदर्शिकेनुसार, तो १ एप्रिल, इ.स. ३३ होता.
४. इ.स. ३३ साली, बायबलच्या दिनदर्शिकेनुसार पेन्टेकॉस्टचा सण आपल्या आधुनिक दिनदर्शिकेप्रमाणे रविवारी, २२ मे रोजी, पाळला जाण्याची आवश्यकता होती. ह्या दिवशी हंगामातील प्रथमफळांची कापणी केली गेली पाहिजे होती. २२ मे, इ.स. ३३ ह्याच दिवशी, पवित्र आत्म्याचा वर्षाव करण्यात आला व मंडळीयुगाची प्रथमफळं देवाच्या राज्यात

आणण्यात आली. आठवा, प्रेषितांची कृत्ये २:४१ मध्ये आपण वाचतो की त्या दिवशी सुमारे ३,००० व्यक्ती तारल्या गेल्या.

५. संपूर्ण मंडळीयुगात, जे इ.स. ३३ पासून १९८८ पर्यंत सुरू होतं, प्रत्येक पेन्टेकॉस्टच्या दिवसानं ह्यावर जोर दिला की प्रथमफळं आणली जात राहिली पाहिजेत. म्हणूनच, १९८८ सालच्या पेन्टेकॉस्टच्या आधल्या दिवशी मंडळीयुग संपलं असेल. तो दिवस २१ मे, १९८८ होता. अशा तऱ्हेने, मंडळीयुग त्या दिवसापर्यंत बरोबर संपूर्ण १,९५५ वर्षे सुरू होतं.

६. आपण हा अभ्यास जसा चालू ठेवू, तसंतसं आपल्याला कळेल की मंडळीयुग २१ मे, १९८८ (इ.स.) साली संपलं. जेव्हां देवानं बायबल ज्याला "मोठा संकटकाळ" म्हणतं त्या काळासाठी मंडळी व जगाची तयारी करण्यास सुरवात केली, त्याच्याशी ही तारीख तंतोतंत जुळते. आपल्याला हे सुद्धा समजेल की ८,४०० दिवसांच्या ह्या संकटकाळाच्या पहिल्या २,३०० दिवसांदरम्यान, तत्वतः कुणीही तारलं जाऊ शकणार नाही.

७. पण मग, आपल्याला ह्या अभ्यासात कळणार असल्याप्रमाणे, मोठ्या संकटकाळाच्या सुरवातीनंतर २,३०० दिवसांनी देवाची तारणयोजना सुरू झाली. तो इतिहासातील ७ सप्टेंबर, १९९४ (इ.स.) हा दिवस होता. त्याच तारखेला देवानं पुन्हा त्याच्या पवित्र आत्म्याचा वर्षाव केला, जेणेकरून पुढील १७ वर्षे, संपूर्ण जगभर, प्रचंड जनसमुदाय तारला जाईल.[५] खरंच, जेव्हां हे घडलं तेव्हां कुणालाही ह्या विलक्षण कृतीची जाणीव झाली नाही. पण बायबल आपल्याला आश्वासन देतं की तसं नक्कीच घडलं. बायबलच्या दिनदर्शिकेनुसार, ७ सप्टेंबर हा सातव्या महिन्याचा पहिला दिवस होता, जेव्हां योबेलचा सण पाळला जायचा होता (आठवा, ह्याला चुकीनं कर्ण्यांचा सण म्हटलं गेलं आहे). ते वर्ष, १९९४, जेव्हां ही भव्यदिव्य घटना घडली, हे योबेलचं वर्ष होतं, अगदी तसंच, जेव्हां येशूचा जन्म झाला त्या खिस्तपूर्व ७ सालाप्रमाणेच. पुन्हा आपल्याला देवाच्या तारणयोजनेच्या उलगड्याची वेळ व बायबलमधील विधिनियमांच्या सणांचे दिवस ह्यामधील दुवा दिसतो.

**तारणाच्या महत्त्वाच्या घटनांची बिनचूकता**

बायबलचा काळजीपूर्वक अभ्यास केल्यावर आपल्याला कळतं की जगासाठीच्या देवाच्या तारणयोजनेतील महत्त्वाच्या टप्प्यांचं उलगडणं हे कांही योगायोगानं किंवा अनियंत्रितपणे अजिबात घडत नसतं. देवाच्या कायद्याच्या पुस्तकात, म्हणजे बायबलमध्ये, उघड केलेल्या एका काळजीपूर्वक योजिलेल्या कार्यक्रमानुसार, प्रत्येक घटना घडली. याची कित्येक उदाहरणं खालीलप्रमाणे आहेत :

१. इस्राएल मिसरमध्ये, अगदी दिवसांच्या अचूकतेनं, बरोबर ४३० वर्षे होते (निर्गम १२:४०—४१). तो कालखंड खिस्तपूर्व १८७७ ते खिस्तपूर्व १४४७ असा होता.

२. खिस्तपूर्व १४४७ मध्ये, जेव्हां इस्राएल मिसरमधून निघाले, तेव्हां ते, अगदी दिवसांच्या अचूकतेनं, ४० वर्षांनी यार्देन नदीशी येऊन पोहोचले , जी पार करून ते कनानाच्या देशात गेले.

---

५ यहेज्केल ३९:२९ मध्ये, आपण वाचतो, **"मी आपले मुख त्यापासून लपविणार नाही; कारण मी आपल्या आत्म्याची इस्राएल घराण्यावर वृष्टि केली आहे, असे प्रभु परमेश्वर म्हणतो." "मी आपले मुख त्यापासून लपविणार नाही"** ह्या शब्दप्रयोगाचा संबंध देवाच्या अंतिम तारणकार्यक्रमाशी आहे, जो मोठ्या संकटाच्या शेवटच्या भागात येतो. हे सत्य आहे हे आपल्याला माहीत आहे कारण ज्या १,४८० वर्षांच्या कालखंडात इस्राएलानं देवाच्या राज्याचं प्रतिनिधित्व केलं, तसंच मंडळीयुगाच्या १,९५५ वर्षांच्या कालखंडात जेव्हां सर्व मंडळींनी देवाच्या राज्याचं प्रतिनिधित्व केलं, त्या दोन्ही कालखंडातील देवाचा तारणकार्यक्रम, देव त्यांच्यापासून दूर जाऊन समाप्त झाला. मोठ्या संकटाच्या शेवटच्या भागातील, शेवटच्या संग्रहाच्या दरम्यानची, एकच अशी वेळ असेल, जेव्हां देव त्यांच्यापासून आपले मुख पुन्हा कधीही लपविणार नाही. योएल २:२८—३२ पण पाहा, जिथं पवित्र आत्म्याच्या वृष्टीबद्दल देव बोलतो. ही पदं प्रेषितांची कृत्ये २:१७—२१ मध्ये उद्धृत केली आहेत. योएल २ मध्ये, केंद्रबिंदु मोठ्या संक्टकाळात पवित्र आत्म्याची वृष्टि होण्यावर आहे. प्रेषितांची कृत्ये २ मध्ये, पवित्र आत्म्याची वृष्टि होण्याचा केंद्रबिंदु इसवी सन ३३ मधील पेण्टेकॉस्ट आणि मोठं संकट यांच्यावर आहे.

३. दानीएल १२:१२ मध्ये भाकीत केल्याप्रमाणे, मसीहा म्हणून ख्रिस्ताचं कार्य बरोबर १,३३५ दिवस चाललं. त्यानं त्याचं कार्य अधिकृतरीत्या, २६ सप्टेंबर, इसवी सन २९ रोजी सुरु केलं, जेव्हां त्याला देवाचा कोकरा म्हणून घोषित केलं गेलं (योहान १:२९). बरोबर १,३३५ दिवसांनंतर, २२ मे, इसवी सन ३३ रोजी, पवित्र आत्मा ओतला गेला आणि मंडळीयुगाची अधिकृत सुरुवात झाली.

४. मंडळीयुग, अगदी दिवसांच्या अचूकतेनं, बरोबर १,९५५ वर्षे चाललं, अशा अर्थानं की, त्याची सुरुवात झाली २२ मे, इसवी सन ३३ च्या पेण्टेकॉस्टच्या दिवशी, आणि त्याची समाप्ति झाली २१ मे, इसवी सन १९८८ रोजी, पेण्टेकॉस्टच्या आदल्या दिवशी.

५. ख्रिस्तपूर्व ११,०१३ मध्ये सृष्टीची निर्मिती झाल्यापासून ते मंडळीयुगाच्या अंतापर्यंत, जेव्हां तारण आणि न्यायनिवाडा यांच्या संबंधातील देवाच्या शेवटच्या कामाची सुरुवात झाली, तोपर्यंत, अगदी वर्षांच्या बिनचूकतेनं, बरोबर १३,००० वर्षे होती. हे इसवी सन १९८८ मध्ये सुरु झालं असं आपल्याला कळेल.

६. ख्रिस्तपूर्व ४९९० मध्ये आलेल्या नोहाच्या काळातील प्रलयानं जेव्हां पृथ्वीवरील सगळ्याचा विनाश केला, तेव्हांपासून इसवी सन २०११ मध्ये देव या सध्याच्या विश्वाचा नाश करील आणि त्यांची नवीन स्वर्ग व नवीन पृथ्वी अशा रूपात पुनर्निर्मिती करील असं आपण शिकू, तोपर्यंत, बरोबर ७,००० वर्षे होतात.

७. जसं दानीएल ८:१४ मध्ये भाकीत केलं होतं, त्याप्रमाणे आपण शिकू की २१ मे, १९८८ रोजी मंडळीयुगाचा अंत झाला, त्या दिवसाशी मोठ्या संकटकाळाची सुरवात तंतोतंत जुळते; आणि तिथपासून पवित्र आत्म्याचा वर्षाव होईपर्यंत बरोबर २,३०० दिवस होते. ७ सप्टेंबर, १९९४ रोजी झालेला पवित्र आत्म्याचा वर्षाव ही खरे श्रद्धाळू झालेल्या प्रचंड जनसमुदायाच्या शेवटच्या १७ वर्षांच्या विलक्षण कापणीच्या सुरवातीचा दिवस आहे.

जगात सुवार्तेचा उलगडा होण्याची देवानं पूर्वव्यवस्था केली होती असं दाखविणारे हे काही अगदी अचूक कालावधी आहेत.

**आध्यात्मिक सत्य समजाविण्यासाठी देवानं मंदिराचा वापर केला**

आपण लक्षात ठेवलं पाहिजे की देवाच्या कोपाचं उदाहरण देण्यासाठी तसंच देवाची दया व प्रेमाचं उदाहरण देण्यासाठीसुद्धा, कधीकधी बायबल एखादा ऐतिहासिक प्रसंग सादर करतं. उदाहरणार्थ, नोहाच्या काळात जगावर आलेल्या भयानक निवाड्याचं वर्णन बायबल करतं. त्यानं मानवजातीचा नाश करण्यासाठी प्रलयाच्या पाण्याचा वापर केला. तथापि, पेत्राचे पहिले पत्र ३:२० मध्ये, ह्या प्रलयाबद्दल बोलताना, देव असं दर्शवितो की **"आठ जण प्रलयातून वाचले."** त्याचप्रमाणे, तारण दर्शविण्यासाठी इस्राएल तांबड्या समुद्रातून सुखरूप पार पडले. तथापि, दुष्टांवरील देवाचा न्याय दाखविण्यासाठी मिसरच्या सैन्याचा तांबड्या समुद्रात नाश झाला. अशा प्रकारे, ह्या उदाहरणांमध्ये, एकाच प्रसंगातून देव त्याचा कोप व त्याची दया दर्शवित आहे.

अशाच प्रकारे, देवाचा न्याय तसंच देवाचं तारण दर्शविण्यासाठी देवानं शलमोनानं बांधलेल्या भव्य मंदिराचा वापर केला. शिलो येथील मांडवाप्रमाणे, हे मंदिर, मंडळीयुगादरम्यान झालेल्या देवाच्या राज्याच्या बांधणीचं उदाहरण होतं. तथापि, शिलो येथील मंदिर व यरुशलेम येथील शलमोनाचं मंदिर ह्या दोन्हींचा, इस्राएल व यहूदाच्या दुष्टपणामुळे, देवानं कालांतरानं नाश केला. त्याचप्रमाणे, आपल्या काळात, देवानं आपल्या काळातील मंडळींवर त्याचा निवाडा आणला आहे. मांडव व मंदिर ह्या मंडळींचं उदाहरण होतं. आजच्या काळातील एकाही मंडळीचा आता देवाच्या तारणयोजनेत समावेश नाही आहे. संपूर्ण मंडळीयुगाचं उदाहरण असलेलं मंदिर आता अस्तित्वात नाही आहे. चिऱ्यावर एकही चिरा राहिलेला नाही (मत्तय २४:१–३).

पण आपल्या काळात अंमलात येत असलेल्या देवाच्या अद्‌भुत तारणयोजनेचं उदाहरण व दाखला देण्यासाठीही देव शलमोनाचं मंदिर वापरतो. बायबलमध्ये मंदिराच्या समर्पणाचं वर्णन करताना तो तसं करतो. ह्या समर्पणाशी संबंधित घडलेल्या सर्व घटना बायबलच्या दिनदर्शिकेनुसार सातव्या महिन्यात घडल्या (१ राजे ८:२). सातव्या महिन्याचा उल्लेख बायबल वर्ष अखेर असा करतं (निर्गम २३:१६, ३४:२२). जिथवर जगाच्या इतिहासाचा प्रश्न आहे, तिथं, आपल्या काळात, आपण त्या वर्षाच्या अखेरीस आहोत[६]. अशा तऱ्हेने, आपल्याला हे समजलं पाहिजे की शलमोनाच्या मंदिराच्या समर्पणाशी संबंधित सर्व घटना आपल्या काळात घडणाऱ्या सुवार्तेतील घटनांकडे, शेवटच्या कापणीच्या काळाकडे बोट दाखवितात किंवा त्यांचं उदाहरण देतात.

**मंदिराच्या समर्पणाची माहिती काळाची महत्वपूर्ण माहिती देते**

शलमोनाच्या मंदिराच्या समर्पणाच्या संबंधात, जगाचा अंत आपल्या अपेक्षेपेक्षा एक दिवस उशिरा होईल हे दाखविण्यासाठी देवानं एक रसभरित मार्ग वापरला. असं करून, देव आपल्याला जगाच्या अंताच्या वेळेची अचूकताही दाखवित आहे. ही माहिती मिळविण्यासाठी देव "शेवटचा दिवस" ही शब्दरचना कशी वापरतो हे आपण आधी पाहिलं पाहिजे.

जेव्हां आपण "शेवटचा दिवस" ह्या शब्दरचनेची तपासणी करतो, तेव्हां आपल्याला दिसतं की बायबलमध्ये ती केवळ आठ ठिकाणी नोंदविली गेली आहे. ह्यापैकी चार ठिकाणांची नोंद योहान ६ मध्ये आहे, जिथं देव शेवटच्या दिवशी सर्व खऱ्या श्रद्धाळूंना त्यांची पुनरुत्थित शरीरं देण्याबद्दल बोलतो (योहान ६:३९, ४०, ४४, ५४). "शेवटचा दिवस" ही शब्दरचना योहान ११:२४ मध्ये सुद्धा सापडते. तिथं आपण वाचतो की आपला भाऊ लाजर ह्याच्या थडग्याशेजारी उभी असलेली मार्था पवित्र आत्म्याच्या प्रेरणेखाली जाहीर करतेः

> **. . . तो शेवटल्या दिवशी पुनरुत्थानसमयी पुन्हा उठेल हे मला ठाऊक आहे.**

ह्या शब्दरचनेची योहान १२:४८ मध्येही नोंद आहे, जिथं ख्रिस्त जाहीर करतो :

> **जो माझा अव्हेर करितो व माझ्या वचनांचा स्वीकार करीत नाही त्याचा न्याय करणारे कोणी आहे; जे वचन मी सांगितले, तेच शेवटल्या दिवशी त्याचा न्याय करील.**

देवानं वापरलेल्या "शेवटचा दिवस" ह्या शब्दरचनेची उरलेली दोन उदाहरणं, मांडवांच्या सणाच्या शेवटच्या दिवसाशी अगदी लक्षणीयरीत्या संबंधित आहेत. योहान ७:३७ व नहेम्या ८:१८ मध्ये त्यांची नोंद आहे.

मांडवांचा सण संग्रहाच्या सणाच्या दिवशीच होता. ह्या सणांचा संबंध निश्चितपणे जगाच्या अंताशी जोडला गेला आहे. म्हणून, "शेवटचा दिवस" हे शब्द देव मांडवांच्या सणाच्या संबंधात वापरतो ह्याचं आपल्याला आश्चर्य वाटत नाही. म्हणजे, मांडवांच्या सणाच्या शेवटच्या दिवसावरून आपल्याला जगाच्या अंताच्या शेवटच्या दिवसाची वेळ दिसली पाहिजे.

बायबलच्या विधिनियमांच्या दिनदर्शिकेमध्ये, मांडवांचा सण व संग्रहाचा सण हे एकाच वेळी येणारे सण, सातव्या महिन्याच्या १५ व्या दिवशी सुरू होऊन सात दिवस चालायला पाहिजे होते. ह्या सात दिवसांनंतर येणाऱ्या पुढच्या दिवसाला, ज्याला बायबल आठवा दिवस म्हणतं, "पवित्र मेळा" (लेवीय २३:३६) व "परमविश्रामदिन" (लेवीय २३:३९) असंही म्हटलं गेलं. अशा रीतीने, मांडवांच्या सणात खरंतर आठ

---

६ हे लक्षणीय आहे की हनोखला न मरता, वयाच्या ३६५ व्या वर्षी स्वर्गात नेलं गेल्याबद्दल बायबल सांगतं (उत्पत्ति ५:२३–२४). नक्कीच हा योगायोग नाही की हवेत वर उचललं जाण्याचं पहिलं उदाहरण एका खऱ्या श्रद्धाळूच्या बाबतीत वयाच्या अशा वर्षी घडलं, जो आकडा पृथ्वीच्या इतिहासाच्या एक वर्षाशी (३६५ दिवस) जुळतो.

दिवसांचा समावेश होतो, ज्याची सुरवात सातव्या महिन्याच्या १५ व्या दिवशी झाली व २२ व्या दिवशी शेवट झाला, व हा शेवटचा दिवस परमविश्रामदिन म्हणून पाळला गेला पाहिजे होता.

तथापि, देवाचा आपल्याला हे दाखविण्याचा हेतू होता की जेव्हां आपण ह्या दिवसांचा जगाच्या अंताशी संबंध लावतो, तेव्हां आठवा दिवस दोन दिवसांचा समजला जावा, जेणेकरून आठव्या दिवसात बायबलमधील सातव्या महिन्याच्या २३ व्या दिवसाचाही समावेश होईल.

शलमोनाच्या मंदिराच्या समर्पणाशी संबंधित बायबलमधील माहितीत देवानं हे सत्य विकसित केलं आहे, जे जगाच्या अंतसमयी घडत असलेल्या घटनांचं उल्लेखनीय उदाहरण असल्याचं दाखविता येई ल. २ इतिहासमध्ये, देव शलमोनाच्या मंदिराच्या समर्पणाचं वर्णन करतो. देवानं केलेल्या, समर्पणाशी संबंधित अशा, कांही विधानांकडे आपण पाहिलं पाहिजे. ती खालीलप्रमाणे आहेत :

१. काळ सातव्या महिन्यात होता (२ इतिहास ७:१०).

२. वेदीचं समर्पण सात दिवस होतं (२ इतिहास ७:९).

३. मग त्यांनी सात दिवस मांडवांचा सण (बायबलचा सण) पाळला (२ इतिहास ७:८–९). अशा रीतीने, १४ दिवस गेले होते (१ राजे ८:६५).

४. मांडवांचा सण सात दिवस साजरा केल्यानंतर आठवा दिवस आला, जेव्हां त्यांनी पवित्र मेळा भरवला (२ इतिहास ७:८–९).

आठवा दिवस शब्बाथ म्हणून पाळला जाणार होता (लेवीय २३:३९), जेव्हां कुठलंही काम केलं जाणार नव्हतं, व प्रवास मर्यादित राहणार होता. प्रेषितांची कृत्ये १:१२ प्रमाणे, जैतुनाचा डोंगर व यरुशलेम ह्यांच्यातील दीड मैलांपेक्षा कमी असलेल्या अंतराचाच प्रवास करण्याची त्यांना परवानगी होती. लक्षणीयरीत्या, १ राजे ८:६६ मध्ये आपण वाचतो :

> **आठव्या दिवशी त्याने लोकांची रवानगी केली; ते सर्व राजाचे अभीष्ट चिंतून आपआपल्या डेऱ्यास गेले; आपला सेवक दावीद व आपले लोक इस्राएल याजवर जो प्रसाद परमेश्वराने केला त्यामुळे त्यांना आनंद वाटला व त्यांची मने हर्षभरित झाली.**

**आठवा दिवस, २१ ऑक्टोबर, २०११**

आपण नोंद केल्याप्रमाणे, हा आठवा दिवस सामान्यतः सातव्या महिन्याचा २२ वा दिवस होता व तो शब्बाथ म्हणून पाळला गेला पाहिजे होता. संपूर्ण इस्राएलातून लोक आले होते (१ राजे ८:६५). शब्बाथ म्हणून पाळल्या जाणार असलेल्या एका दिवसात त्यांच्याकडून हलण्याची व प्रवास करण्याची अपेक्षा कशी केली जाऊ शकते? आठवा दिवस आणखी एक दिवस चालू राहील असं दर्शवून देवानं हा प्रश्न सोडविला. तो अतिरिक्त दिवस सातव्या महिन्याचा २३ वा दिवस होता. २ इतिहास ७:१० मध्ये आपण वाचतो :

> **राजाने सातव्या महिन्याच्या तेविसाव्या दिवशी लोकांस आपआपल्या डेऱ्यांकडे जावयास निरोप दिला; परमेश्वराने दाविदावर, शलमोनावर व आपल्या इस्राएल प्रजेवर जी कृपा केली होती तीमुळे ते आनंदित, हर्षतचित्त झाले होते.**

जवळजवळ १ राजे ८:६६ (वर उद्धृत केलेलं) सारखी असणारी ह्या पदाची भाषा कृपया लक्षात घ्या. आठवा, १ राजे ८:६६ मध्ये आठव्या दिवसाचा उल्लेख होता, जो महिन्याचा २२ वा दिवस होता, तर २ इतिहास ७:१० त्या महिन्याच्या २३ व्या दिवसाचा संदर्भ देतं.

जेव्हां आपल्याला कळतं की मंदिराचं समर्पण व मांडवांच्या सणाचं (बायबलच्या सणाचं) पालन व जगाच्या अंतसमयी देवाच्या न्याययोजनेची पूर्तता, ह्यांमध्ये घनिष्ठ संबंध आहे, तेव्हां हा उलगडा अतिशय महत्वपूर्ण होतो. त्याचा अर्थ असा होतो की इ.स. २०११ मध्ये, मांडवांच्या सणाचा (बायबलच्या सणाचा) आठवा दिवस खरं म्हणजे दोन दिवसांचा समजला गेला पाहिजे. जरी आठवा दिवस (सातव्या महिन्याचा २२ वा दिवस) २० ऑक्टोबर आहे, तरी वास्तविकपणे, २ इतिहास ७:१० मध्ये त्यांनी पाळल्याप्रमाणे तो सातव्या महिन्याच्या २३ व्या दिवशी पाळला गेला पाहिजे, जो २१ ऑक्टोबर २०११ आहे. अशा तऱ्हेने, आपल्याला कळलं पाहिजे की २१ ऑक्टोबर, २०११ ह्या पृथ्वीच्या अस्तित्वाचा शेवटचा दिवस असेल.

**मांडवांच्या सणावर आणखी एक नजर**

जेव्हां आपण शलमोनाच्या मंदिराच्या समर्पणाची तपासणी केली, तेव्हां आपल्याला कळलं की मांडवांचा सण हा समर्पणाच्या कार्यामधील एक अविभाज्य भाग होता. आपल्याला हेही कळलं की जगाच्या अंताची वेळ समजण्यातही तो आपली मदत करते. पण त्याला मांडवांचा सण का म्हटलं गेलं?

आपल्याला समजेल की ह्या सणाशी संबंधित "मांडव" असा अनुवादित केला गेलेला इब्री शब्द हा अधिक सामान्यपणे "खोली" असा अनुवाद केला गेलेला इब्री शब्द आहे. तसंच, आपल्याला समजेल की "खोली" हा शब्द, मिसरमधून कनानाच्या देशात जाताना पूर्ण ४० वर्षे इस्राएल रानात असताना मांडवांत पसरलेल्या ढगाचं व आगीचं  उदाहरण आहे. तसंच, आपल्याला समजेल की ढग व अग्नीनं देवाच्या आज्ञांचं प्रतिनिधित्व केलं व पर्यायानं खोलीनं देवाच्या आज्ञांचं प्रतिनिधित्व केलं. म्हणून, वास्तविकपणे मांडवांचा सण हा देवाच्या कायद्याचा सण किंवा बायबलचा सण आहे. देवाच्या कायद्याच्या पुस्तकाच्या, बायबलच्या गौरवानं जो देवाचा गौरव होतो, त्यावर मांडवांचा सण (बायबलचा सण) जोर देतो.

देवानं "मांडवांचा सण" ह्या शब्दरचनेत मांडलेल्या मांडव ह्या शब्दासाठी असलेला इब्री शब्द *"सुक्काह"* असा आहे, ज्याचा अनुवाद सुद्धा "खोली" असा होतो. आपल्याला हा शब्द समजण्यासाठी मदत करणारा बायबलमधील परिच्छेद यशया ४:५–६ आहे. तिथं आपण वाचतो:

> **आणि परमेश्वर सीयोन डोंगराच्या प्रत्येक स्थानावर व त्याच्या सणांमेळ्यावर दिवसास धूममय मेघ व रात्रीस प्रज्वलित अग्नीचा प्रकाश निर्माण करील; कारण त्याच्या सर्व वैभवावर छत्र होईल; आणि दिवसास ऊन लागू नये, सावली व्हावी; आणि वादळ व पाऊस यांपासून रक्षण होण्यासाठी निवारा व आश्रय असावा म्हणून मंडप घालण्यात आला.**

ह्या पदात "छत्र" असा अनुवाद करण्यात आलेल्या इब्री शब्दाचा अनुवाद "निवारा" असा केल्यास अधिक योग्य होईल. **"मंडप घालण्यात आला"** असा अनुवाद ज्या शब्दरचनेचा केला आहे, तिचा अनुवाद **"खोली बांधली गेली"** असा केल्यास अधिक योग्य ठरेल. अशा तऱ्हेने, ह्या पदांचा अनुवाद असा केल्यास अधिक योग्य होईल :

> **आणि परमेश्वर सीयोन डोंगराच्या प्रत्येक स्थानावर व त्याच्या सणामेळ्यावर दिवसास धूममय मेघ व रात्रीस प्रज्वलित अग्नीचा प्रकाश निर्माण करील; कारण त्याच्या सर्व वैभवावर निवारा होई ल; आणि दिवसास ऊन लागू नये, सावली व्हावी; आणि वादळ व पाऊस यांपासून रक्षण होण्यासाठी निवारा व आश्रय असावा म्हणून खोली बांधण्यात आली.**

ही पदं खालीलप्रमाणे शिकवितातः

१. तारले गेल्यावर, देवाच्या ज्या राज्याचे आपण नागरिक झालेले असतो, त्याच्या प्रत्येक पैलूचा संदर्भ **"सीयोन डोंगराच्या प्रत्येक स्थानावर"** या शब्दप्रयोगातून मिळतो.

२. **"त्याच्या सणामेळ्यावर"** हा एकवचनी शब्द आहे, जो तारल्या गेलेल्या सर्वांचा अंतर्भाव असलेल्या एका महान सार्वकालिक मेळ्याबद्दल बोलतो.

३. **"धूममय मेघ व रात्रीस प्रज्वलित अग्नीचा प्रकाश"** हे देवाचा कायदा, बायबलचा संदर्भ देतं, जे मानवजातीला आध्यात्मिक दिशा देतं.

४. **"कारण त्याच्या सर्व वैभवावर छत्र होईल"** हे देवाच्या राज्याच्या वैभवाचा संदर्भ देतं, ज्यावर छत्र म्हणून दिवसा मेघ व रात्री अग्नि असतो.

५. **"आणि दिवसास ऊन लागू नये, सावली व्हावी; आणि वादळ व पाऊस यांपासून रक्षण होण्यासाठी निवारा व आश्रय (लपण्यासाठी जागा) असावा म्हणून मंडप (खोली) घालण्यात आला."** मेघ व अग्नि, म्हणजे, ईश्वरी वचन ही एक खोली आहे जी निवारा देते व देवाच्या कोपापासून, वादळ व पाऊस ह्यापासून लपण्याची जागा देते.

ह्याआधी आपण शिकलो की मेघ व अग्नीच्या स्तंभाचा ईश्वरी वचनाशी संबंध आहे. आपण पाहात असताना आपल्याला हे दिसू शकतं कारण इस्राएल जेव्हां ४० वर्षे ओसाड प्रदेशात होते, तेव्हां मेघ व अग्नीचा स्तंभ त्यांना दिशा दाखवित होते, ह्याबद्दल सांगण्यासारखं बायबलकडे पुष्कळ कांही आहे. उदाहरणार्थ, गणना ९:२१–२३ मध्ये आपण वाचतो :

> **कधीकधी मेघ केवळ संध्याकाळपासून सकाळपर्यंत राहत असे आणि सकाळी तो हालला म्हणजे ते कूच करीत; दिवसा किंवा रात्री केव्हांहि मेघ वरती गेला की ते कूच करीत. मेघ निवासमंडपावर छाया करून दोन दिवस, एक महिना किंवा त्याहून अधिक काळ जरी राहिला तरी ते तळ देऊन राहत आणि कूच करीत नसत. परमेश्वराच्याच आज्ञेप्रमाणे ते तळ हालवीत; परमेश्वराने मोशेच्या द्वारे त्यांना आज्ञा केली त्याप्रमाणे ते परमेश्वराचा नियम पाळीत.**

गणना ९:१५–२३ मध्ये, देव अगदी स्पष्टपणे दिवसा असणाऱ्या मेघाचा व रात्री असणाऱ्या अग्नीचा देवाच्या आज्ञांशी संबंध जोडीत आहे. आणि अर्थातच, देवाच्या आज्ञा म्हणजे बायबल.

अर्थात आपण हे समजून घेतलं पाहिजे की जर आपण कधीच तारले गेलो नाही, तर देवाच्या कायद्यामुळे आपल्याला त्याच्या कोपाचा नरकदंड मिळेल. तथापि, आपण जर देवाच्या निवडलेल्यांपैकी एक असलो (आणि आपल्याला आपला नवीन पुनरुत्थित आत्मा मिळाला असेल, तर आपण निवडलेल्यांपैकी एक आहो, हे आपल्याला कळू शकतं), तर मग आपल्या पापांसाठीच्या कायमच्या नरकदंडाखाली आपण नसतो. म्हणजे, आता कायदा आपल्याला शिक्षा देऊ शकत नाही. त्याऐवजी, तो कायदा म्हणजे आपण ख्रिस्ताच्या ठायी सर्वकाळ सुरक्षित आहोत ह्याचं देव आपल्याला देत असलेलं आश्वासन आहे. देवाच्या कोपापासून देवाचा कायदा आपल्याला लपवितो. आणि, आपण संपूर्णपणे देवाच्या गौरवासाठी कसं जगायचं ह्याबद्दलचं सर्व मार्गदर्शन आपल्याला देवाचा कायदा, बायबलमधून मिळतं.

अशा प्रकारे, आपण शिकलो आहोत की मांडवांच्या सणाच्या केंद्रस्थानी फक्त बायबल आहे, ज्याद्वारे देव त्याचा अमर्यादपणे महान असलेला गौरव उघड करतो. तर, "मांडवांच्या सणाला" "बायबलचा सण" असं म्हणणं अधिक अचूक ठरेल. बायबलचा सण संग्रहाच्या सणाच्या दिवशीच पाळला जायचा. वर्षाची शेवटची कापणी होई तेव्हांच संग्रहाचा सण येत असे. आध्यात्मिकरीत्या, ह्याचा निर्देश या सत्याकडे आहे की बायबलच्या सणामुळे बायबलचा गौरव होतो. जगाच्या अंताच्या थोडंच आधी जेव्हां देव तारल्या जाणाऱ्या लोकांची एक शेवटची मोठी कापणी करतो तेव्हां बायबलचं गौरवशाली स्वरूप केंद्रस्थानी असण्याचं आणखी प्रात्यक्षिक मिळतं.

रोमकरांस पत्र ९:२८ मध्ये शेवटच्या संग्रहाचं भाकित केलं गेलं आहे. तिथं आपण वाचतो :

**कारण प्रभु आपले वचन (हेल्लेणी, लोगोस) आटोपते घेऊन व समाप्त करून पृथ्वीवर ते सिद्धीस नेईल.**

हेल्लेणी शब्द "लोगोस" ह्याचा सामान्यतः "वचन" असा अनुवाद होतो. म्हणून, हे पद सध्याच्या छोट्याशा काळाचा संदर्भ देतं, जो म्हणजे, बायबलमधून आपण शिकणार असल्याप्रमाणे, पृथ्वीच्या इतिहासाची शेवटची १७ वर्षे आहेत. ह्या १७ वर्षांच्या महत्वपूर्णतेची गुरुकिल्ली म्हणजे देवाचं गौरवशाली वचन (लोगोस) ज्या द्वारे देव सध्या कुणाही माणसाला मोजता येणार नाही एवढा प्रचंड जनसमुदाय तारत आहे (प्रकटीकरण ७:९). सध्या जगाला मिळत असलेला शेवटचा शुभवर्तमानाचा उपदेश अडखळणार नाही किंवा ठेचकाळणार नाही. कुठल्याही दोषांशिवाय किंवा अनिश्चिततेशिवाय त्याची सार्वकालिक पूर्तता होईल, जेव्हां काही काळातच ख्रिस्त परत येईल व संपूर्ण जगातील सर्व खऱ्या श्रद्धाळूंना, निवडलेल्यांना नवीन आकाशात व नवीन पृथ्वीवर त्याच्याबरोबर सर्वकाळ राहण्यासाठी हवेत वर उचलेल.

## प्रकरण ४. आपण जगाच्या अंताच्या वेळापत्रकासाठीचा आपला शोध सुरू करू

आता आपण बायबलमधून आपण शिकत असलेल्या मूलभूत सत्यांची रूपरेषा मांडू, जी आपल्याला इतिहासाच्या शेवटच्या कालरेषेच्या अचूक आकलनाकडे मार्गदर्शन करते.

गेल्या संपूर्ण २,००० वर्षांमध्ये, जेव्हां सबंध बायबल उपलब्ध आहे, निस्सीम, निष्ठावान खऱ्या श्रद्धाळूंनी या पृथ्वीच्या इतिहासाच्या भावी काळाच्या उलगड्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यासाठी बायबलमध्ये कळकळीनं शोध घेतला आहे. त्या सर्वांना एका सत्याची जाणीव होती, ते म्हणजे, अशी एक वेळ येईल जेव्हां ह्या जगाचा इतिहास संपुष्टात येईल. पृथ्वीचा प्रामाणिक न्यायाधीश म्हणून येशू परत येईल व सर्व खऱ्या श्रद्धाळूंना नवीन आकाश व नवीन पृथ्वीवर जाण्यासाठी हवेत वर उचललं जाईल, जिथं ते सर्व काळ खिस्ताबरोबर राज्य करतील, त्यावेळीच जगाचा नाश घडेल.

तथापि, अशी वेळ येण्यापूर्वी, काहीशा मोठ्या संकटाचा कालावधि असेल. सामान्यतः, खिस्ताच्या ठायी असणाऱ्या श्रद्धाळूंचा अतोनात शारीरिक छळ असा ह्याचा चुकीचा अर्थ काढण्यात आला. वास्तवात, हा केवळ आध्यात्मिकरीत्या आकलन होऊ शकणारा काळ आहे.

बायबलमधील मत्तय २४ व मार्क १३ ह्यांसारख्या प्रकरणांचा खास करून अत्यंत काळजीपूर्वक अभ्यास केला गेला कारण खिस्ताच्या परत येण्याच्या अगदी थोडं आधी येणाऱ्या अशा संकटकाळावर ती प्रकाश टाकत असल्यासारखी दिसतात. हे खरं आहे की, गतकाळाची सांगड इतिहासाच्या अंताशी घालणाऱ्या बायबलाधिष्ठित सांगाड्याची बांधणी करू लागण्यात आपली मदत करण्यासाठी, देव आपल्याला सर्वोत्तम दिशादर्शक ह्या दोन प्रकरणांमध्ये देतो. मार्क १३:२८ मध्ये तो दिशादर्शक आहे, जिथं देव जाहीर करतो :

> **आता अंजिराच्या झाडाचा दाखला घ्या; त्याची डहाळी कोमल झाली आणि तिला पाने फुटू लागली म्हणजे उन्हाळा जवळच आला आहे हे तुम्हाला कळते.**

हे पद १४ मे, १९४८ म्हणजे सुमारे ६० वर्षांपूर्वीपर्यंत समजायला लागू शकलं नाही. त्या वेळीच बायबलमधील अंजिराचं झाड, इस्राएलाचं राष्ट्र पुन्हा जगातील देशांमध्ये तग धरू शकेल असं राष्ट्र झालं. हा जवळजवळ एक चमत्कारच होता, कारण इ.स. ७० साली, जेव्हां यरुशलेम शहर व मंदिरासहित इस्राएलाचा रोमकरांकडून संपूर्ण नाश झाला, तेव्हांपासून इस्राएल हे त्याची स्वतःची भूमि असलेलं जगातील राष्ट्र नव्हतं. तथापि, जवळजवळ चमत्कारानं, १४ मे, १९४८ रोजी ते पुन्हा स्वतःची भूमि असलेलं राष्ट्र बनलं.

ताबडतोब पुष्कळशा खिस्ती लोकांनी ह्या नाट्यमय प्रसंगाचा संबंध रास्तपणे मार्क १३:२८ मधील अंजिराच्या झाडाच्या भाकिताशी जोडला. देवानं अंजिराचं झाड हे इस्राएलाचं उदाहरण म्हणून दिलं, व पानं फुटू लागलेल्या अंजिराच्या झाडाचा संबंध, इस्राएल पुन्हा राष्ट्र बनण्याशी आहे, हे त्यांना बरोबर कळलं[७].

जेव्हां अंजिराच्या झाडाला पानं फुटतील, तेव्हां मार्क १३ व मत्तय २४ मध्ये नोंदले गेलेले प्रसंग घडतील, असा आग्रह हे पद धरीत असल्यामुळे, आपण हे ओळखलं पाहिजे की देवानं आपल्याला असा असामान्य दिशादर्शक दिला आहे की जगाचा अंत अगदी जवळ आला आहे. ह्याचं कारण असं की मत्तय २४ व मार्क १३ चं काळजीपूर्वक वाचन असं दर्शवितं की ह्या घटनांचा संबंध मोठ्या संकटकाळाच्या समयाशी आहेत (मत्तय २४:२१), ज्यानंतर खिस्त परत येईल (मत्तय २४:२९—३१).

---

७ उदाहरणार्थ, इस्राएलाचं उदाहरण म्हणजे अंजिराचं झाड, ज्याला खिस्तानं शाप दिला की त्याला पुन्हा कधीही फळं येणार नाहीत (मार्क ११:१२ ते २१).

देव आपल्याला देत असलेला आणखी एक दिशादर्शक प्रकटीकरण ७:९–१४ मध्ये सापडतो. तिथं देव कुणाही माणसाला मोजता येणार नाही एवढा प्रचंड जनसमुदाय त्या मोठ्या संकटकाळातून बाहेर पडण्याबद्दल बोलतो, ("त्या" ह्या उपपदाचा अनुवाद केला गेला नाही, पण मूळ हेल्लेणीत ते आहे). तसंच, लूक २१:२२ मध्ये, जे सुद्धा मोठ्या संकटकाळाबद्दल बोलत आहे, देव ह्या संकटकाळाचा उल्लेख सूडाचा काळ असा करतो. दुष्टांना देवानं शिक्षा देणं म्हणजे सूडाचा काळ आहे. मोठ्या संकटकाळादरम्यान, देवानं जगातील लोकांची व सर्व स्थानिक मंडळींची देवाच्या न्यायप्रक्रियेच्या पूर्ततेसाठी तयारी करण्यास सुरवात केली आहे.

आपल्याला मदत करणारं पुढील पद मत्तय २४:२२ हे आहे, जिथं आपण वाचतो :

> **आणि ते दिवस कमी केले नसते तर कोणाहि मनुष्याचा निभाव लागला नसता; परंतु निवडलेल्यांसाठी ते कमी केले जातील.**

असं दिसतं की हे पद असं म्हणत आहे की हा मोठ्या संकटकाळाचा समय आहे जेव्हां देवाचा मानवजातीवर सूड सुरू होईल. तथापि, देवानं निवडलेले पुष्कळ लोक, ज्यांना देवानं तारण्यासाठी निवडलं (इफिसकरांस पत्र १:३–६), ते अजून तारले गेले नसल्यामुळे, संकटकाळाचा कालावधी कमी करण्यात आला आहे. दुसऱ्या शब्दांत, मोठ्या संकटकाळाचा हा कालावधी देवाच्या न्याययोजनेशी ठळकपणे संबंधित आहे, पण त्याचवेळी तारणयोजनेत होणार असलेल्या एक प्रकारच्या प्रचंड वाढीशीही त्याचा संबंध आहे. आपण ह्या कल्पनांची सुसंगति कशी लावू शकतो?

बायबलमधील ऐतिहासिक घटनांच्या उलगडण्याची तपासणी करून व कलस्सैकरांस पत्र २:१६–१७ च्या शिकवणुकींवरून, आम्ही शिकलो आहोत की त्यांचा संबंध विधिनियमांच्या सणांच्या दिवसांशी जोडला जातो. उदाहरणार्थ, योबेलचं वर्ष ह्यावर जोर देतं की मुक्ति (तारण) जगापुढे प्रकाशित केली गेली पाहिजे. वस्तुस्थिती अशी आहे की बायबलमधील सर्व पुरावे ह्या दाट शक्यतेकडे बोट दाखवितात की योबेलचं प्रत्यक्ष सार असणाऱ्या येशूचा जन्म ख्रिस्तपूर्व ७ ह्या योबेलच्या वर्षी, प्रायश्चित्ताच्या दिवशी झाला, ज्या वेळी योबेलचं मेंढ्याचं शिंग (हेल्लेणीत तेरुआ) वाजविलं गेलं (लेवीय २५:९)[८].

शिवाय, आम्हाला कळलं की २७ सप्टेंबर, इसवी सन २९ रोजी, येशूला देवाचा कोकरा म्हणून घोषित केलं गेलं, जो दिवस तिशरी १ होता (तिशरी हा सातवा महिना असतो), ज्याला योबेलचा दिवस सुद्धा म्हटलं जातं (गणना २९:१). ख्रिस्त, म्हणजे योबेल आला असल्यामुळे आणि त्याची अधिकृत घोषणा केली असल्यामुळे, सबंध जगात सुवार्ता पाठविण्यासाठीची पूर्वतयारी झाली होती. ज्या रविवारी येशूचं पुनरुत्थान झालं, त्यानंतर सात आठवड्यांनी पवित्र आत्म्याचा वर्षाव झाला आणि जगात सुवार्ता पाठविण्यास सुरुवात झाली.

असं दिसेल की जर तारणाच्या कार्यात प्रचंड वाढ झाली, तर त्याचा कसला तरी संबंध योबेलच्या वर्षाशी असेल. म्हणून, १९४८ च्या नंतरच्या काळात, दुसरं योबेलचं वर्ष कधी येईल? एका योबेलच्या वर्षा पासून दुसऱ्या योबेलच्या वर्षांपर्यंत, बरोबर ५० वर्षे असतात. खरोखरच, १९४८ नंतरचं पहिलं योबेलचं वर्ष १९९४ च आहे. योबेलचं निव्वळ सार असलेला ख्रिस्त, जेव्हां जन्मला, त्या ख्रिस्तपूर्व ७ या योबेलच्या वर्षा नंतर बरोबर २,००० वर्षांनी इसवी सन १९९४ आलं.

योबेलचा संबंध नक्कीच देवाच्या तारणयोजनेशी आहे. पण बायबल आपल्याला खात्री देतं की हे योबेलचं वर्ष मोठ्या संकटकाळात आहे, जो देवाच्या अंतिम न्यायकार्यासाठीच्या तयारीचा काळ आहे. एकाच

---

८ कांही परिच्छेदांच्या इंग्रजी भाषांतरात, "तेरुआ" या इब्री शब्दाचं भाषांतर "कर्णे" असं केलं आहे. पण लेवीय २५:९ मध्ये, प्रायश्चित्ताच्या संदर्भात, आपण वाचतो की "तेरुआ" याच शब्दाचं योग्य भाषांतर "योबेल" असं केलं आहे. अशा प्रकारे, "कर्णे वाजविण्याचा दिवस" याऐवजी "योबेलचा दिवस" हे भाषांतर अधिक योग्य आहे.

वेळी घडणाऱ्या या विरुद्ध घटना एकाच वेळी कशा घडू शकतात आणि त्यांचा संबंध १९९४ या वर्षाशी कसा आहे?

दानीएल ८ मधील भाकीताची यात खूप मदत होते. मत्तय २४ मध्ये, जिथं आपल्याला या मोठ्या संकटाबद्दल कळतं, तिथं देव आपल्याला दानीएलाच्या पुस्तकात आणखी माहिती पाहण्याचा निर्देश देतो. मत्तय २४:१५–१६ जाहीर करतात :

> **दानीएल संदेष्ट्याच्या द्वारे सांगितलेला ओसाडीचा अमंगळ पदार्थ पवित्रस्थानात उभा असलेला तुम्ही पाहाल, (वाचकाने हे ध्यानात आणावे,) तेव्हां जे यहूदीयात असतील त्यांनी डोंगरात पळून जावे.**

दानीएल प्रकरण ८ मध्ये, देव २,३०० दिवसांच्या एका कालखंडाबद्दल बोलतो, ज्याच्या दरम्यान, एक क्रूर राजा राज्य करील. नित्याचे यज्ञयाग तो बंद करायला लावील आणि ओसाडीचा अमंगळ पदार्थ येईल जेणेकरून पवित्रस्थान व सैन्य ही पायाखाली तुडविली जातील (दानीएल ८:१२–१४). आध्यात्मिकदृष्ट्या, याचा अर्थ असा होतो की खऱ्या सुवार्तेच्या जागी सैतानी सुवार्ता येईल. लक्षणीयरीत्या, २,३०० दिवसांच्या दृष्टांताच्या संबंधात देव दानीएल ८:१७ मध्ये जाहीर करतो, **"शेवटच्या काळाविषयीचा हा दृष्टांत आहे."**

आपण पाहिलं आहे की १९९४ हे योबेलचं वर्ष आहे, ज्याचा केंद्रबिंदु सुवार्ता जगभरात जाहीर केली जाण्यावर आहे. मग, ते वर्ष म्हणजे २,३०० दिवसांच्या कालखंडाचा अंत आहे काय, ज्या काळात ओसाडीचा अमंगळ पदार्थ येत आहे, आणि ज्याच्याबद्दल दानीएल ८ मध्ये सांगितलं आहे?

जर तसं असेल, आणि १९९४ च्या २,३०० दिवस आधी १९८८ हे वर्ष होतं, तर मग ते मोठं संकट सुरु होण्याचं वर्ष असेल काय? त्याचा अर्थ असा होईल की त्या काळात, मोठ्या संकटाच्या पहिल्या भागात, जवळजवळ कोणीच तारला जात नव्हता. पण त्याचा अर्थ असाही होईल की मोठ्या संकटाच्या शेवटच्या भागात, एक प्रचंड मोठा जनसमुदाय तारला जाईल, जो कोणाही मनुष्याला मोजता येणार नाही (प्रकटीकरण ७:९–१४).

जेव्हां आपण यामुळे गोंधळात पडतो, तेव्हां आपण हे लक्षात घेतलं पाहिजे की, जेव्हां सात वर्षांच्या दुष्काळापासून बचाव करण्यासाठी याकोब आणि सर्व इस्राएली आश्वासित प्रदेश, म्हणजे कनानाचा देश सोडून मिसरला जायला निघाले, तेव्हां त्यांना आलेल्या अनुभवाच्या संदर्भात, प्रेषितांची कृत्ये ७:११ मध्ये "मोठं संकट" हा शब्दप्रयोग वापरलेला आहे. आपल्याला माहीत आहे की याकोबासाठी हा भयंकर अनुभव होता. "मोठं संकट" हे शब्द ज्या हेल्लेणी शब्दांचं भाषांतर आहे, तेच हेल्लेणी शब्द मत्तय २४:२१ मध्ये वापरलेले आहेत.[९]

खूपच लक्षणीयरीत्या, आपल्याला दिसतं की ख्रिस्तपूर्व १८७७ मध्ये, याकोब त्याच्या मोठ्या संकटाच्या काळात मिसरला गेला. मत्तय २४:२१ मधील मोठ्या संकटाच्या संदर्भातील वर्ष, जे आपण तपासून पाहात आहोत, ते १९९४ हे योबेलचं वर्ष आहे. ख्रिस्तपूर्व १८७७ आणि इसवी सन १९९४ ही वर्षं, एकमेकांपासून ३,८७० वर्षे दूर आहेत. १,८७७ + १९९४ – १ = ३,८७०. (० असं वर्ष नसल्यामुळे, जुन्या करारातील दिनदर्शिकेवरून नव्या करारातील दिनदर्शिकेकडे जातांना, एक वर्ष वजा करावं लागतं.) खूप लक्षणीयरीत्या, ३,८७० = ३ x १,२९०.

---

९ "मोठं संकट" हे शब्द बायबलमध्ये फक्त चारच वेळा सापडतात. ते मत्तय २४:२१ आणि प्रकटीकरण ७:१४ मध्ये आहेत, जे आपण आधीच तपासलं आहे, आणि ते प्रेषितांची कृत्ये ७:११ व प्रकटीकरण २:२२ मध्ये पण आहेत. लूककृत शुभवर्तमान २१:२३ मध्ये, त्याच काळाबद्दल बोलतांना, देवानं दुसरे हेल्लेणी शब्द वापरले, ज्यांचं भाषांतर "मोठं संकट" असंच आहे.

१,२९० हा आकडा खूपच महत्त्वाचा असल्यासारखं दिसतं कारण अशी आणखी एक वेळ होती जेव्हां इस्राएलींना आश्वासित भूमीतून बाहेर हाकलण्यात आलं. बाबेलींनी यरुशलेम आणि मंदिर यांचा संपूर्ण नाश केला. हे खिस्तपूर्व ५८७ मध्ये घडलं, जे यहूदींच्या राष्ट्रावरील देवाच्या प्रचंड कोपाच्या एका ७० वर्षांच्या कालखंडात झालं. हा ७० वर्षांचा कालखंड खिस्तपूर्व ६०९ मध्ये सुरु झाला आणि खिस्तपूर्व ५३९ मध्ये समाप्त झाला, जेव्हां मेदी व पारसींनी बाबेलच्या नगरीचा पराभव केला. यरुशलेमेचा व मंदिराचा नाश, ही भयंकर घटना खिस्तपूर्व ५८७ मध्ये घडली. कुतूहलाची, आणि नक्कीच महत्त्वाची गोष्ट ही की जी तीन वर्षे आपण तपासत आहोत (खिस्तपूर्व १८७७, खिस्तपूर्व ५८७, आणि इसवी सन १९९४) यांच्यामध्ये १,२९० हा दुवा आहे.

खिस्तपूर्व १८७७ - खिस्तपूर्व ५८७ = १,२९० वर्षे

खिस्तपूर्व ५८७ ते इसवी सन १९९४ – १ = २,५८० वर्षे = २ X १,२९०

खिस्तपूर्व १,८७७ ते इसवी सन १९९४ – १ = ३ X १,२९०

या वरील तीन्ही वेळी जे आध्यात्मिक कार्य चालतं, त्या संदर्भात, १,२९० हा आकडा बायबलमध्ये अधोरेखित केला आहे. दानीएल १२:११ मध्ये बायबल १,२९० या आकड्याच्या भूमिकेवर जोर देतं, जिथं आपण वाचतो :

**नित्याचे बलिहवन बंद होईल व विध्वंसमूलक अमंगलाची स्थापना होईल. तेव्हांपासून एक हजार दोनशे नव्वद दिवस लोटतील.**

आपण लक्षात ठेवलं पाहिजे की कधीकधी देव एक दिवस एका वर्षाचं प्रतिनिधित्व करीत असल्याबद्दल बोलतो. उदाहरणार्थ, गणना १४:३४ मध्ये, देवानं दर्शविलं की गुप्तहेरांना कनानाचा देश शोधावयास लागलेल्या ४० दिवसांच्या हिशेबानं इस्राएल ४० वर्षे रानात राहील. अशा प्रकारे, आपल्याला कळतं की दानीएल १२:११ मधील १,२९० दिवस म्हणजे १.२९० वर्षे समजले जाऊ शकतात. याकोबाला जेव्हां आश्वासित देश सोडून मिसरला जावं लागलं तो भयानक काळ, यहूदाच्या राष्ट्राला यरुशलेममधून बाहेर काढलं गेलं ती घटना, व १९९४ ह्या योबेलच्या वर्षी भयंकर असं जे काहीतरी घडलं, या सगळ्याची देव नक्कीच सांगड घालत आहे. ती भयंकर गोष्ट काय असू शकेल?

आपल्याला हे निश्चितच माहित आहे की बायबलमध्ये कनानाचा देश देवाच्या राज्याचं उदाहरण म्हणून वापरला गेला आहे. यरुशलेम व मंदिर ही सुद्धा देवाच्या राज्याची बाह्य उदाहरणं आहेत. म्हणून, याकोब व त्याच्या कुटुंबासाठी, कनानाचा देश सोडून जाणं म्हणजे देवाचं राज्य सोडून जाण्यासारखं होतं. तसंच, यरुशलेममधून बाहेर काढलं जाणं, व मंदिराचा नाश करण्यात आला आहे हे कळणं म्हणजे देवाच्या राज्यातून बाहेर काढलं जाण्यासारखं होतं. पण १९९४ साली देवाच्या राज्याचं उदाहरण काय होतं? आपल्याला माहित आहे की संपूर्ण मंडळीयुगात, सर्व स्थानिक मंडळी देवाच्या राज्याचं उदाहरण होत्या कारण बाह्यरीत्या देवाच्या राज्याचं प्रतिनिधित्व करण्यासाठी देवानं रचना केलेल्या त्या स्वर्गीय संस्था होत्या. त्या बायबलच्या काळजीवाहक होत्या, व सुवार्ता सर्व जगात पाठविण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती.

याकोबानं अनुभविलेल्या मोठ्या संकटात (प्रेषितांची कृत्ये ७:११–१२) सात वर्षांचा दुष्काळ समाविष्ट होता, पण त्या काळादरम्यान, दोन वर्षांच्या शेवटी सर्वात वाईट काळ होता, जेव्हां याकोबाला आश्वासित प्रदेश सोडावा लागला (खिस्तपूर्व १८७७). जेव्हां याकोब व त्याच्या कुटुंबाला कनानाचा देश सोडण्याची आज्ञा दिली गेली, तेव्हां देवाचं राज्य सोडण्याची आज्ञा दिल्यासारखं ते होतं. ह्यापेक्षा अधिक आघातकारक काहीही असू शकणार नाही. त्याचा अर्थ असा होता की आश्वासित प्रदेश, कनानाचा देश, सैतानाच्या राज्यात असलेल्या अधर्मी लोकांच्या स्वाधीन केला गेला होता. म्हणूनच, प्रतीकात्मकरीत्या, ते

सैतानाला देवाच्या राज्याची सत्ता दिली गेल्यासारखं होतं. म्हणून, ख्रिस्तपूर्व १८७७ साल हे एक दुःखद व भयंकर साल होतं.

तशाच प्रकारे, इस्राएलानं अनुभविलेल्या ७० वर्षांच्या काळातील ख्रिस्तपूर्व ५८७ हे साल सर्वात भयानक काळ होता, जेव्हां देवाच्या राज्याचीच उदाहरणं असणाऱ्या यरुशलेम व मंदिराचा नाश करण्यात आला. त्या वर्षी, देवाच्या आज्ञेनुसार, मंदिर व यरुशलेमेचा बाबेलच्या राजानं नाश केला, जो सैतानाचं उदाहरण होता (यशया १४). पुन्हा, ते पृथ्वीवरील देवाचं राज्य संपुष्टात आल्यासारखं होतं.

ह्या दोन ऐतिहासिक घटना म्हणजे इ.स. १९९४ ह्या योबेलच्या वर्षी जे घडलं त्याची उदाहरणं होत्या. १,९५५ वर्षांपर्यंत, सर्व जगातील मंडळी देवाच्या राज्याचं प्रतीक होत्या, जसा याकोबाच्या काळात कनानाचा देश होता, व इस्राएलाच्या काळात यहूदीया, इस्राएलाचा देश, यरुशलेम व मंदिर होते.

आपल्याला समजेल की १९९४ च्या काही काळ आधी, देवाच्या राज्याचं प्रतिनिधित्व करण्यासाठी देवानं मंडळींचा वापर करणं संपविलं होतं. म्हणून, १९९४ हे योबेलचं अद्‌भुत वर्ष मंडळींसाठी एक भयानक वर्ष होतं. जगात सर्वत्र, देव पुन्हा असंख्य लोकांना तारत होता, पण मंडळी सैतानाच्या आध्यात्मिक सत्तेखाली राहिल्या. खरोखर, देवाच्या राज्याचं प्रतिनिधित्व करण्यासाठी देवानं मंडळींचा वापर करणं कायमचं बंद केलं होतं. ख्रिस्तपूर्व १८७७ साली, जेव्हां कनानाचा देश पूर्णपणे अधर्मी लोकांच्या सत्तेखाली आला, व ख्रिस्तपूर्व ५८७ साली जेव्हां यहूदीयाचा देश बाबेलच्या राजाच्या सत्तेखाली आला, तेव्हां जशी परिस्थिती होती, अगदी तशीच ती इसवी सन १९९४ मध्ये होती.

ख्रिस्तपूर्व १८७७ सालानं याकोबानं अनुभविलेल्या संकटकाळाची दोन भागात विभागणी केली, जशी इस्राएलानं अनुभविलेल्या ७० वर्षांच्या संकटकाळाची ख्रिस्तपूर्व ५८७ सालानं दोन भागात विभागणी केली. त्याचप्रमाणे, आपल्या काळातील संकटकाळाची १९९४ सालानं दोन भागात विभागणी केली, जेव्हां असं निश्चित झालं की देवाच्या राज्याचं प्रतिनिधित्व करण्यासाठी देवानं मंडळींचा वापर करणं कायमचं थांबविलं होतं.

सात व सत्तर वर्षांच्या संकटकाळाचे हे दोन कालावधी आपल्या काळातील संकटकाळाचा नमुना असल्यामुळे, हा सध्याच्या संकटाचा कालावधीसुद्धा सात ह्या संख्येशी जुळणारा असेल अशी आपण अपेक्षा करू शकतो. आपल्याला आधीच समजलं आहे की मोठ्या संकटकाळाचा पहिला भाग दानीएल ८ मधील २,३०० दिवसांशी जुळत असल्यासारखा दिसतो. याकोबाच्या संकटकाळाचा अनुभव सात वर्षांचा असल्याकारणाने, व यहूदीयाच्या संकटकाळाचा अनुभव ७० वर्षांचा असल्याकारणाने, आपण अशी अपेक्षा करू शकतो की सध्याच्या मोठ्या संकटकाळाच्या एकूण कालावधीतही सात ह्या संख्येला महत्व असेल. ते ७,००० दिवस असू शकेल किंवा ७ X १२ X १००, जे ८,४०० दिवसांएवढे होतात. आध्यात्मिकरीत्या, १०० ही संख्या “परिपूर्ती” दर्शविते व १२ ही संख्या “पूर्णत्व” दर्शविते. कालांतरानं आपल्याला कळेल की मोठ्या संकटकाळाचा कालावधी ८,४०० दिवसांचा (२३ वर्षांचा) आहे, बायबलमधील पुष्कळशा अधिक माहितीचा ह्याला भक्कम पुरावा आहे. आश्चर्यकारकरीत्या, २३ वर्षांमध्ये बरोबर ८,४०० दिवस आहेत, व २३ ही संख्या अगदी वारंवार देवाच्या कोपाशी जुळते.

शिवाय, सात वर्षे, ७० वर्षे, आणि हे ८,४०० दिवस यांची दोन भागांत विभागणी करण्यात साधर्म्य असल्याचं आपण पाहू . जसं आपण शिकलो आहोत, याकोबाच्या संकटाचा सात वर्षांचा काळ दोन भागात विभागला गेला. कनानाचा देश सोडून जाण्याचा आघातकारी अनुभव सात वर्षांतील पहिल्या दोन वर्षांच्या अखेरीस आला (उत्पत्ति ४५:६–८). म्हणून, पहिला भाग सबंध कालखंडाच्या दोन सप्तमांश, किंवा २८.६% होता. त्याचप्रमाणे, यहूदाचं संकट ख्रिस्तपूर्व ६०९ मध्ये सुरु झालं, जेव्हां राजा योशीया मेला, आणि ते संकट ख्रिस्तपूर्व ५३९ पर्यंत चालू राहिलं, जेव्हां मेदी आणि पारसींनी बाबेलवर विजय मिळविला. हा ७० वर्षांचा काळ दोन भागात विभागला गेला, आणि त्याचा पहिला भाग २२ वर्षांचा होता. २२ म्हणजे ७० वर्षांचे ३१.४% होतात.

लक्षात घ्या, याकोबाचं संकट आणि यहूदाचं संकट हे आपल्या सध्याच्या संकटाचे नमुने आहेत. म्हणून, आपल्या काळातील संकटाचा पहिला भाग सुद्धा, सबंध संकटकाळाच्या २८.६% किंवा ३१.४% यांच्या जवळपास असण्याची अपेक्षा आपण करू शकतो. खरंच, आपल्याला दिसतं की २,३०० दिवस म्हणजे ८,४०० दिवसांचे २७.४% होतात. २७.४% हा आकडा, २८.६% आणि ३१.४% या आकड्यांच्या जवळ असल्यावरून आपल्याला यातील साधर्म्य दिसतं. पुढे आपल्याला बायबलमधील कित्येक सत्यं कळतील जी आपल्याला दाखवितात की मोठ्या संकटाच्या ८,४०० दिवसांचा पहिला भाग २,३०० दिवसांचा करणं हे अगदी बिनचूक आहे.

अशा प्रकारे, आपल्याला कळतं की ८,४०० दिवसांत ७ हा आकडा येतो (७ x १२ x १००). तो पण दोन भागात विभागलेला दिसतो, आणि पहिला भाग सबंध काळाच्या ३०% आहे. आणि २३ वर्षे, या आकड्याचा संबंध बायबलमध्ये पुष्कळदा देवाच्या कोपाशी असतो, तो कालखंड बरोबर ८,४०० दिवसांचा असल्यामुळे, मोठा संकटकाळ बरोबर ८,४०० दिवसांचा असेल असा विश्वास ठेवण्यास आपल्याला प्रबळ प्रोत्साहन मिळतं.

पेत्राचे पहिले पत्र ४:१७ मध्ये आपण वाचतो :

**कारण देवाच्या घरापासून न्यायनिवाड्यास आरंभ होण्याची वेळ आली आहे; आणि तो आरंभ प्रथम आपल्यापासून झाला, तर देवाच्या सुवार्तेचा अवमान करणाऱ्यांचा शेवट काय होईल?**

देवाच्या येऊ घातलेल्या निवाड्याच्या पूर्वतयारीच्या काळाबद्दल, या पदात, देव बोलत आहे, आणि त्याची सुरुवात मंडळींमध्ये होईल. म्हणून,  ८,४०० दिवसांचा (२३ वर्षांचा) काळ कदाचित तोच काळ असू शकेल.

ह्या मोठ्या संकटकाळाच्या पहिल्या भागाशी संबंध असणाऱ्या २,३०० दिवसांचा संबंध प्रकटीकरण ८:१ शी सुद्धा असू शकतो, जिथं आपण वाचतो :

**त्याने सातवा शिक्का फोडल्यावर स्वर्गात सुमारे अर्धा तासपर्यंत निवांत झाले.**

सुमारे "अर्ध्या तासाची" वेळ म्हणजे ती वेळ होती जेव्हां जगात सर्वत्र, व सर्व मंडळींमध्ये, जवळजवळ कुणीही तारलं जात नव्हतं. आपल्याला हे कळू शकतं कारण लूक १५:१० मध्ये आपण वाचतो :

**त्याप्रमाणे, पश्चात्ताप करणाऱ्या एका पापी माणसाबद्दल देवाच्या दूतांसमोर आनंद होतो, हे मी तुम्हाला सांगतो.**

जेव्हां लोक तारले जात नसतात, तेव्हां स्वर्गात शांतता असते कारण तेव्हां आनंद नसतो.

अशा तऱ्हेने, आपल्याला समजत आहे की मंडळीयुगाच्या शेवटास, ८,४०० दिवसांचा (२३ वर्षांचा) एक कालावधी आहे ज्याची सुरवात २,३०० दिवसांनी होते, जेव्हां सर्व जगाची, व खास करून मंडळींची न्यायदिवसासाठी तयारी केली जात आहे.

म्हणूनच आपण वाचतो, उदाहरणादाखल, प्रकटीकरण १३:७–८ मध्ये, आपण एका श्वापदाबद्दल (सैतानाबद्दल) वाचतो जो समुद्रातून (देवाच्या कोपातून) बाहेर येतो, व जो देवदूतांवर विजय मिळवितो (त्यांना मंडळीतून बाहेर काढतो), व जगावर राज्यही करतो.

तथापि, आपण आधीच दखल घेतल्याप्रमाणे, १९९४ हे साल योबेलचं वर्ष होतं, जेव्हां पवित्र आत्म्याचा वर्षाव झाला (यहेज्केल ३९:२५–२९; योएल २:२८–३२), व जगभर शुभवर्तमानाच्या उपदेशाचा

एक शेवटचा महान कालावधि येणार होता. आपल्याला असा विश्वास ठेवायला आवडेल की ह्याचा अर्थ असा होतो की देवाकडून पुन्हा मंडळींचा वापर होऊ लागेल. तथापि, आपण शिकत असल्याप्रमाणे, जगात सर्वत्र अस्तित्वात आलेल्या स्थानिक मंडळींचं, मंदिर हे उदाहरण होतं, व देव असं आश्वासन देतो की अशी वेळ येईल जेव्हां मंदिराचा नाश केला जाईल व चिऱ्यावर एकही चिरा राहणार नाही (मत्तय २४:१–३). आपण असं कुठंही वाचत नाही की मत्तय २४ मध्ये ज्याबद्दल बोललं गेलं आहे ते मंदिर नाश पावल्यानंतर पुन्हा बांधलं गेलं. म्हणजे, देव पुन्हा कधीही कुठल्याही मंडळीचा जगात सुवार्ता आणण्यासाठी वापर करणार नाही.

मोठा संकटकाळ संपूर्ण ८,४०० दिवसांचा आहे, जी बरोबर पूर्ण २३ वर्षे आहेत. ह्याचा अर्थ असा होतो की योबेलच्या वर्षी, म्हणजे १९९४ सालापासून देवानं जगात सुवार्ता पाठविण्यासाठी कुठल्यातरी अन्य मार्गाचा वापर केला. त्यानं आता स्थानिक सभांचा वापर करणं सोडून दिलं होतं. म्हणजे, कसंही करून, १९९४ साल हे जगात सुवार्तेस नवीन व्याप्ती देणारं अद्भुत वर्ष असताना, स्थानिक मंडळींसाठी मात्र ते भयंकर वर्ष होतं. हे असं असण्याचं कारण म्हणजे मंडळी ८,४०० दिवसांच्या मोठ्या संकटकाळाच्या अंतापर्यंत देवाच्या कोपाखाली रहायच्या आहेत.

**मंडळीयुगाच्या अंताची तारीख**

आतापर्यंत आपण तपासलेल्या माहितीमधून आपल्याला आश्वासन मिळतं की १९९४ हे योबेलचं वर्ष म्हणजे २,३०० दिवसांच्या कालावधीचा शेवट होता, ज्यादरम्यान जगात जवळजवळ कुठंही कुणीही तारलं जात नव्हतं. मंडळीयुगाच्या अंताची तारीख शोधण्यात त्या वस्तुस्थितीची आपल्याला मदत होते, जी २३ वर्षांच्या (८,४०० दिवसांच्या) मोठ्या संकटकाळाच्या सुरवातीशी तंतोतंत जुळली पाहिजे.

२,३०० दिवसांचा काळ म्हणजे सहा वर्षांपेक्षा थोडा अधिक महिन्यांचा काळ आहे. म्हणून, मंडळीयुगाचा अंत १९९४ सालाच्या सहा वर्षे आधी झाला असला पाहिजे. अशा प्रकारे, तो १९८८ साली झाला असला पाहिजे.

१९८८ सालात मंडळीयुगाच्या अंताचा अचूक दिवस शोधण्यासाठी, आपण हे लक्षात ठेवलं पाहिजे की मंडळीयुगाची सांगड सप्ताहांच्या सणाच्या दिवसाशी घातली गेली होती, ज्याला पेन्टेकॉस्टचा दिवसही म्हणतात. वल्हांडणाच्या सणानंतर येणाऱ्या पहिल्या शनिवारानंतर (सातव्या दिवसाचा शब्बाथ) सात आठवड्यांनी येणाऱ्या रविवारी तो पाळला जाई. त्याच दिवशी प्रथमफळं मंदिरात आणली जात. ह्यामध्ये सर्व जगातून कापणी आणण्याची अपेक्षा केली जाई, म्हणजे खऱ्या श्रद्धाळूंची पहिली कापणी जी देवाच्या राज्यात आणली गेली. मंडळीयुगाच्या सुरवातीची अधिकृत तारीख इ.स. ३३ सालातील पेन्टेकॉस्टचा दिवस ही आहे. आपल्या दिनदर्शिकेशी जुळविल्यास तो दिवस २२ मे, इ.स. ३३ हा होता.

पेन्टेकॉस्टचा दिवस दर वर्षी आल्यामुळे, आध्यात्मिकरीत्या, त्याचा निर्देश प्रथमफळं आणखी एक वर्ष आणत राहण्याकडे होतो. तथापि, इ.स. १९८८ साली, पेन्टेकॉस्टशी निगडीत असलेल्या प्रथमफळं आणण्याच्या कार्याचा अंत झाला. १९८८ साली पेन्टेकॉस्ट २२ मे रोजी आल्यामुळे, मंडळीयुगाचा शेवटचा दिवस २२ मेच्या आधला दिवस असला पाहिजे, जो २१ मे हा होता. कुतूहलाची गोष्ट ही, की ह्याचा अर्थ असा होतो की २२ मे इ.स.३३ साली अधिकृतरीत्या सुरू झालेलं मंडळीयुग इ.स. ३३ पासून १९८८ पर्यंत चालू राहिलं, जो काळ दिवसाच्या अचूकतेनं, पूर्ण १,९५५ वर्षांचा होतो. देवाच्या इतिहासाच्या कालरेषेच्या अचूकतेचा हा आणखी एक निदर्शक आहे.

अशा प्रकारे, २१ मे, १९८८ ही मंडळीयुगाची अधिकृत समाप्ति व मोठ्या संकटकाळाची अधिकृत सुरुवात होती. मग मोठ्या संकटाच्या पहिल्या भागाचे २,३०० दिवस ७ सप्टेंबर, १९९४ रोजी संपले असले पाहिजेत. लक्षणीयरीत्या, बायबलमधील सणांच्या दिनदर्शिकेनुसार, ७ सप्टेंबर, १९९४ म्हणजे तिशरी १ हा दिवस होता, ज्याला बायबलमध्ये योबेलचा सण असं पण म्हटलं जातं. आठवा, "योबेल" या शब्दाचा पूर्ण संबंध जगात सुवार्ता पाठविण्याशी असतो.

त्या २,३०० दिवसांच्या मागून, मोठ्या संकटाच्या २३ वर्षांच्या (८,४०० दिवसांच्या) कालखंडापैकी ६,१०० दिवस (८,४०० – २,३०० = ६,१००) उरतात. म्हणून, हे ६,१०० दिवस २१ मे, २०११ रोजी संपतील.

याआधी आपण शिकलो की मांडवांच्या सणाच्या (म्हणजे बायबलच्या सणाच्या) पालनावरून जसं दिसतं, त्याप्रमाणे पृथ्वीच्या अस्तित्त्वाचा शेवटचा दिवस २१ ऑक्टोबर, २०११ असेल. अशा प्रकारे, मोठ्या संकटाच्या नंतर एक शेवटचा १५३ दिवसांचा कालखंड असायला पाहिजे, आणि जसं आपल्याला दिसेल, तो न्यायदिवस असेल, जेव्हां तारल्या न गेलेल्यांना शिक्षा देण्याचं काम देव पूर्ण करतो.

देवदयेनं, थेट जगाच्या अंतापर्यंतची बायबलाधिष्ठित कालरेषा आम्ही चाचणीच्या स्वरूपात शोधू शकलो आहोत. या कालरेषेच्या अचूकतेचे कित्येक पुरावे बायबल कसं देतं, ते आता आम्ही दाखविणार आहोत.

या प्रयत्नांमध्ये ज्या एका मूलभूत नियमाची मदत झाली आहे, तो कलस्सैकरांस पत्र २:१६–१७ मध्ये मांडलेला आहे, जिथं देव जाहीर करतो :

> **तर मग खाण्यापिण्याविषयी, तसेच सण, अमावास्या किंवा शब्बाथ पाळण्याविषयी कोणाला तुमचा निर्णय करू देऊ नका; ह्या बाबी पुढे होणाऱ्या गोष्टींच्या छाया आहेत; शरीर तर ख्रिस्ताचे आहे."**

या खूपच प्रकाश पाडणाऱ्या पदांमध्ये, देव ते तत्त्व जाहीर करतो की निरनिराळे सण साजरे करण्याच्या वेळा, येणाऱ्या गोष्टींच्या वेळेकडे निर्देश करतात व त्यांच्याशी संबंधित असतात. म्हणून, आपल्याला ताबडतोब कळतं की येशू , जो देवाचा कोकरा होता, त्याला बायबलमधील दिनदर्शिकेच्या पहिल्या महिन्याच्या १४ व्या दिवशी (निशान १४), जो वल्हांडणाचा दिवस होता, त्या दिवशी वधस्तंभावर का चढविलं गेलं. आपल्याला हे सुद्धा समजू शकतं की पवित्र आत्मा का ओतला गेला आणि मंडळीयुग त्यानंतर सुमारे सात आठवड्यांनी का सुरु झालं, ज्या दिवशी इस्राएल पेण्टेकॉस्टचा सण साजरा करीत होते.

बायबलमधील आणखी एक भाकीत, ज्याची मदत होते व जे आपण या अभ्यासात पूर्वी शिकलो, ते म्हणजे मार्क १३:२८–२९, ज्यात देव आपल्याला आज्ञा देतो :

> **आता अंजिराच्या झाडाचा दाखला घ्या; त्याची डहाळी कोमल झाली आणि तिला पाने फुटू लागली म्हणजे उन्हाळा जवळच आला आहे हे तुम्हाला कळते; त्याप्रमाणेच ह्या गोष्टी घडत असलेल्या तुम्हाला दिसतील तेव्हां तो जवळ, अगदी दाराशी येऊन ठेपला आहे असे समजा.**

बायबलमध्ये इस्राएलाच्या देशाचं उदाहरण वारंवार अंजिराचं झाड असं दिलं गेलं आहे. जवळजवळ २,००० वर्षे भूमीशिवाय किंवा राष्ट्रीय ओळखीशिवाय अस्तित्वात असलेलं इस्राएल चमत्कारानं पुन्हा जगात टिकाव धरू शकेल असं एक राष्ट्र झालं. ही विस्मयजनक घटना म्हणजे मार्क १३ मधील ह्या भाकिताच्या पूर्ततेचं उदाहरण असल्याचं पुष्कळशा बायबलच्या शिक्षकांनी रास्तपणे ओळखलं आहे. ही घटना १४ मे १९४८ साली घडली असल्यामुळे, आपल्याला ही पदं असं शिकवितात की मार्क १३ मध्ये संक्षिप्तपणे वर्णन केल्या गेलेल्या सर्व घटना लवकरच १९४८ नंतरच्या वर्षांमध्ये घडणार होत्या.

जगाच्या अंताकडे नेणाऱ्या कालरेषेचा शोध घेण्यात आपली मदत करणारा आणखी एक दिशादर्शक म्हणजे १९९४ साल हे योबेलचं साल होतं ही वस्तुस्थिती. पूर्वी आपण शिकलो होतो की योबेलचं निव्वळ सार असणाऱ्या येशूचा जन्म ख्रिस्तपूर्व ७ साली झाला, जे योबेलचं वर्ष होतं. आठवा, योबेलचं महत्व हे होतं की मुक्ति (तारण) संपूर्ण जगात प्रकाशित केलं जायचं होतं.

मार्क १३ चा व मत्तय २४ व लूक १७ व लूक २१ चा अगदी काळजीपूर्वक अभ्यास असं दर्शवितो की जेव्हां देव जगाचा इतिहास समाप्त करील, तेव्हां खालील घटना घडतील.

१. अशी एक वेळ येईल जेव्हां संपूर्ण जगातील सर्व मंडळी, ज्या देवाच्या मंदिराचं उदाहरण होत्या, त्यांचा अंत होईल. **"येथे चिऱ्यावर असा एकहि चिरा राहणार नाही"** (मत्तय २४:२). त्यांच्यावर सैतान विजय मिळवील ज्याला **"ओसाडीचा अमंगळ पदार्थ"** म्हटलं गेलं आहे (मत्तय २४:१५). [१०]

२. हा मोठ्या संकटकाळाचा कालावधी असेल जेव्हां खऱ्या श्रद्धाळूंना बाहेर काढलं जाईल व त्यांना त्यांच्या मंडळी सोडण्याची आज्ञा दिली जाईल. त्यापैकी पुष्कळ मंडळींमध्ये जसा सैतान चिन्हं व अद्भुतं घेऊन येईल, तसा मंडळींमधील मोठ्या स्वधर्मत्यागाचा हा काळ असेल (मत्तय २४:२४).

३. ख्रिस्तपूर्व १८७७ साली, जेव्हां याकोबाला आश्वासित देश, कनान सोडून मिसरमध्ये राहण्यास जाणाची देवानं आज्ञा दिली, तेव्हां याकोबानं अनुभविलेला सात वर्षांचा संकटकाळ म्हणजे ह्या संकटकाळाचं उदाहरण होता.

४. यहूदानं देवाच्या कोपाखाली सहन केलेला, ख्रिस्तपूर्व ६०९ ते ख्रिस्तपूर्व ५३९ हा ७० वर्षांचा कालावधीसुद्धा त्याचं उदाहरण होता. ख्रिस्तपूर्व ६०९ मध्ये, जेव्हां योशीया, शेवटचा नीतिमान राजा मारला गेला, तेव्हांपासून ते ख्रिस्तपूर्व ५३९ पर्यंत, जेव्हां बाबेलचा मेदी व पारसींकडून पाडाव करण्यात आला, व त्यायोगे यहूदी बंदींना यरुशलेमेमध्ये परतता आलं, असा हा ७० वर्षांचा कालावधी होता. इस्राएलानं अनुभविलेल्या ह्या भयानक काळाच्या मध्यावर, ख्रिस्तपूर्व ५८७ साली, यरुशलेम व शलमोनाच्या वैभवशाली मंदिराचा बाबेलींकडून संपूर्ण नाश करण्यात आला.

५. आपण ह्याचीही नोंद, थोड्या कमी प्रमाणात घेऊ शकू की, शिलो येथील मांडव व कराराचा कोश पलिष्ट्यांनी हस्तगत करून, ते त्यांच्या राज्यात घेऊन गेले, तेव्हाचा तो सात महिन्यांचा काळही त्याचं उदाहरण होता. हे ख्रिस्तपूर्व १०६८ –१०६७ ह्या दरम्यान घडलं.

अशा तऱ्हेने, मत्तय २४ मध्ये आपण ज्या मोठ्या संकटकाळाबद्दल वाचतो त्याच्याशी ७ ह्या संख्येचा घनिष्ठ संबंध असल्यासारखा दिसला.

आपण शिकलो की २३ ह्या संख्येचा मोठ्या संकटकाळाशी संबंध असण्याची दाट शक्यता आहे. देवाचा कोप दर्शविण्यासाठी बायबलमध्ये त्याचा पुन्हा पुन्हा वापर केला गेला आहे, व मोठा संकटकाळ म्हणजे निश्चितच असा काळ आहे जेव्हां देव मंडळी व जगाची देवाच्या कोपासाठी तयारी करीत आहे, जो ह्या कालावधीनंतर लगेचच येईल. जेव्हां आपल्याला कळलं की ८,४०० दिवस म्हणजे बरोबर पूर्ण २३ वर्षे होतात, तेव्हां ७ व २३ ह्या दोन्ही संख्या अधिकच समर्पक झाल्या. ८,४०० ही संख्या ७ x १२ x १०० एवढी होते, व त्यायोगे, ७ व २३ ह्या संख्यांना, मोठ्या संकटकाळाच्या ८,४०० दिवसांच्या, म्हणजे २३ वर्षांच्या कालावधीमध्ये महत्व मिळवून देते.

आपण शोधलं की ८,४०० दिवसांचा हा संकटकाळ दोन भागांमध्ये विभागला गेला. प्रकटीकरण ८:१ मधून आपण जे शिकलो त्यानुसार, पहिल्या भागादरम्यान, जगात कुठंही जवळजवळ कुणीही तारलं जात नव्हतं. आपण त्या पहिल्या भागाचा संबंध दानीएल ८:१३–१४ मधील २,३०० संध्याकाळ व सकाळींशी जोडला.

---

१० *मंडळीयुगाचा अंत व त्यानंतर* आणि *गहू व निदण* या मोफत पुस्तकांची तुम्ही मागणी करू शकता, ज्यांच्यात मंडळीयुगाच्या अंतासंबंधीची बायबलाधिष्ठित अधिक माहिती दिली आहे.

आपण शोधलं की मोठ्या संकटकाळाच्या दुसऱ्या भागादरम्यान, कुणाही माणसाला मोजता येणार नाही एवढा प्रचंड जनसमुदाय जगात सर्वत्र तारला जात होता (प्रकटीकरण ७:९—१४). हे पूर्णपणे मंडळींच्या बाहेर घडणार होतं, ज्या देवाच्या कोपाखाली राहणार आहेत.

आपण हेही शोधलं की मांडवांचा सण (बायबलचा सण), जो येणाऱ्या गोष्टींची छाया असली पाहिजे, त्याचा अगदी शेवटच्या दिवसाशी संबंध होता. शेवटच्या दिवसाचा संबंध जगाच्या अंताशी असायला हवा असल्यामुळे, बायबलमधील मांडवांच्या सणाचा संबंधही जगाच्या अंताशी असला पाहिजे.

माहितीचा आणखी एक अवघड तुकडा ध्यानात ठेवला पाहिजे, व तो म्हणजे मार्क १३:२४—२६ मधील जाहीरनामा, जिथं आपण वाचतो :

> **परंतु ही संकटे येऊन गेल्यावर त्या दिवसांत सूर्य अंधकारमय होईल, आणि चंद्र प्रकाश देणार नाही; आकाशातून तारे गळून पडतील व आकाशातील बळे डळमळतील.तेव्हां मनुष्याचा पुत्र मोठ्या पराक्रमाने व वैभवाने मेघारूढ होऊन येत असलेला दृष्टीस पडेल.**

आपण ह्या कालावधीबद्दल अजून शिकलं पाहिजे.

आतापर्यंत आपण जे सर्व कांही शिकलो, त्याचा गोषवारा घेऊन आपण असा निष्कर्ष काढू शकतो की जगाच्या अंताच्या तयारीसाठी ज्या घटना घडतील, त्या खालीलप्रमाणे असाव्यात.

१. इसवी सन ३३ मध्ये सुरु झालेलं मंडळीयुग १९४८ नंतर केव्हांतरी समाप्त होईल, जेव्हां इस्राएल पुन्हा जगातील एक टिकाऊ राष्ट्र झालं.

२. मंडळीयुग पेण्टेकॉस्टच्या वेळी सुरु झाल्यामुळे, आणि त्याचा निकटचा संबंध पेण्टेकॉस्टशी असल्यामुळे, जेव्हां हंगामाची प्रथमफळं आणली जातात, मंडळीयुगाचा अधिकृत अंत पेण्टेकॉस्टच्या आधल्या दिवशी असायला हवा, मग मंडळीयुग कोणत्याही वर्षी समाप्त होवो.

३. मोठ्या संकटकाळाच्या शेवटच्या भागाचा संबंध, प्रचंड संख्येनं लोक तारले जाण्याशी असल्यामुळे, तो शेवटचा भाग १९९४ साली सुरु व्हायला पाहिजे, जे एक योबेल वर्ष होतं.

४. मोठ्या संकटकाळाच्या पहिल्या भागाचा संबंध दानीएल ८ मधील २,३०० दिवसांशी असल्यामुळे, जेव्हां जवळजवळ कोणीच तारलं जात नव्हतं, मोठ्या संकटकाळाची सुरुवात, जी मंडळीयुगाच्या समाप्तीशी जुळत असली पाहिजे, ते १९८८ मध्ये केव्हांतरी घडलं असलं पाहिजे (२,३०० दिवस म्हणजे सहा वर्षांपेक्षा किंचित जास्त काळ).

५. मंडळीयुगाची अधिकृत समाप्ति १९८८ मधील पेण्टेकॉस्टच्या आधल्या दिवशी असायला पाहिजे असल्यामुळे, आपल्याला दिसतं की पेण्टेकॉस्टचा दिवस २२ मे होता. म्हणून, मंडळीयुगाचा अंत आणि मोठ्या संकटकाळाची सुरुवात २१ मे, १९८८ रोजी झाली असली पाहिजे.

६. मोठ्या संकटाचा पहिला भाग, ज्यादरम्यान जवळजवळ कोणीच तारला जाणार नव्हता, तो काळ २,३०० दिवसांचा असणार होता, त्यामुळे २१ मे १९८८ च्या नंतर २,३०० दिवस आपल्याला ७ मे, १९९४ शी नेतात. ही तारीख, मग, त्या लोकांची महान कापणी असली पाहिजे, जे मोठ्या संकटकाळाच्या ८,४०० दिवसांपैकी (म्हणजे पूर्ण २३ वर्षांपैकी), उरलेल्या ६,१०० दिवसांच्या काळात तारले जायचे आहेत.

७. ७ सप्टेंबर, १९९४ च्या नंतर ६,१०० दिवस २१ मे, २०११ रोजी संपतील, जो मोठ्या संकटकाळाचा अंत असेल.

८. २०११ या वर्षी, मांडवांच्या सणाचा (बायबलच्या सणाचा) शेवटचा दिवस कोणता आहे? आपण शिकलो आहोत की तो २१ ऑक्टोबर, २०११ हा असेल. अशा प्रकारे, पांच महिने, म्हणजे आपल्या दिनदर्शिकेतील १५३ दिवसांचा एक काळ असेल, जेव्हां मार्क १३:२४–२७ मधील घटना घडायला हव्यात. खरोखर, कदाचित जगाच्या अंताकडे नेणाऱ्या घटनांच्या उलगडण्याचं योग्य आकलन आपल्याला झालं आहे, असं प्रोत्साहन आपल्याला ताबडतोब मिळतं. प्रकटीकरण ९ मध्ये, देव एका पांच महिन्यांच्या काळाबद्दल बोलतो, ज्याचा संबंध सूर्य अंधकारमय होण्याशी व निवाडा चालू होण्याशी आहे. आणि २१ मे ते २१ ऑक्टोबर, हे १५३ दिवस, म्हणजे बरोबर पांच महिने.

## प्रकरण ५. इतिहासाच्या कालरेषेचं आपलं आकलन बिनचूक आहे काय?

पण आता एक मोठा प्रश्न उभा राहातो. या कालरेषेबद्दल आपल्याला किती खात्री असू शकते? हा एवढा भीतिदायक विषय आहे, की अंतसमयाच्या वेळापत्रकाचं हे आकलन खरोखर वैध आहे की नाही याची आणखी खात्री देवानं आम्हाला द्यावी, अशी इच्छा आम्हाला नक्कीच आहे.

बायबल आणखी एका विस्मयकारक घटनेची नोंद करतं जी देवाच्या तारणयोजनेचा केंद्रबिंदु आहे. ती घटना म्हणजे आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताचा मृत्यु आणि पुनरुत्थान. ख्रिस्ताला पुन्हा उठविलं गेलं हा याचा पुरावा आहे की निवडलेल्यांच्या पापांचा दंड त्यानं पूर्णपणे भरला होता, आणि यामुळे जर आपल्याला पूर्ण खात्री मिळणार नसेल, तर सबंध तारणकार्यक्रमाबाबतच आपल्याला संशय राहील.

आपल्याला ती खात्री मिळावी, म्हणून आपण प्रेषितांची कृत्ये १:१–३ वाचू या :

**थियफिल, महाराज, येशूने जे प्रेषित निवडले होते, त्यांना पवित्र आत्म्याच्याद्वारे आज्ञा केल्यानंतर तो वर घेतला गेला, त्या दिवसापर्यंत त्याने जे जे करावयास व शिकवावयास आरंभिले होते त्या सर्वांविषयी मी पहिला ग्रंथ केला. मरण सोसल्यानंतरहि त्याने त्यांना पुष्कळ प्रमाणांनी आपण जिवंत आहों असे दाखविले. चाळीस दिवसपर्यंत तो त्यांना दर्शन देत असे व देवाच्या राज्याच्या गोष्टी सांगत असे.**

आणि करिंथकरांस पहिले पत्र १५:३–८ मध्ये देव म्हणतो :

**कारण मला जे सांगण्यात आले ते मी तुम्हांस सांगून टाकले, त्यापैकी मुख्य हे की, शास्त्राप्रमाणे ख्रिस्त तुमच्याआमच्या पापांबद्दल मरण पावला; तो पुरला गेला; शास्त्राप्रमाणे तिसऱ्या दिवशी त्याला पुन्हा उठविण्यात आले; आणि तो केफाला, मग बारा जणांना दिसला; त्यानंतर तो एकदम पांचशेपेक्षा अधिक बंधूंना दिसला; त्यांतील बहुतेक आज हयात आहेत; त्यानंतर तो याकोबाला, मग सर्व प्रेषितांना दिसला; आणि जणू काय अकाली जन्मलेला जो मी, त्या मलाहि सर्वांच्या शेवटी दिसला.**

बायबल स्पष्टपणे शिकवितं की ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाची वस्तुस्थिती संशयातीत असावी असा देवाचा हेतु होता. ही विलक्षण गोष्ट नाकारण्याला जो कोणी चिकटून राहातो, तो केवळ त्याच्या स्वतःच्या नजरेत शहाणा आहे, आणि त्याला वाटतं की त्याला देवापेक्षा अधिक माहिती आहे.

आश्चर्यकारकरीत्या, जगाच्या इतिहासाच्या अंतसमयीच्या घटनांच्या वेळेसाठी देव आपले डोळे जसे उघडतो, तसा देव आपल्याला अनेक पुरावे देतो ज्यांच्यावरून आपल्याला खात्री होते की पृथ्वीच्या इतिहासाच्या अंतसमयीच्या घटनांची वेळ आपल्याला बरोबर समजली आहे.

आतापर्यंत जगाच्या समापनाच्या घटनांच्या वेळेची आपण काहीशी चाचणीवजा रूपरेषा मांडली आहे. त्या घटना खूप महत्वाच्या असल्यामुळे आपण पुन्हा एकदा त्यांचा सारांश पाहू. आपण खालील तारखांवर आलो आहोत :

१. येशूला इ.स. ३३ च्या पहिल्या महिन्याच्या १४ व्या दिवशी वधस्तंभावर चढविण्यात आलं. बायबलच्या दिनदर्शिकेमधील तो १४ निशान, इ.स. ३३ हा दिवस होता, व आपल्या आधुनिक दिनदर्शिकेमधील १ एप्रिल, इ.स. ३३ हा होता.
२. नंतरच्या पेन्टेकॉस्टच्या दिवशी, म्हणजे २२ मे, इ.स. ३३ रोजी मंडळीयुग अधिकृतरीत्या सुरू झालं.

३. १९८८ च्या पेन्टेकॉस्टच्या आदल्या दिवशी, म्हणजे २१ मे, १९८८ रोजी, मंडळीयुग संपलं व ८,४०० दिवसांचा मोठा संकटकाळ सुरू झाला.
४. मोठ्या संकटकाळाच्या पहिल्या २,३०० दिवसांची सुरुवात २१ मे, १९८८ रोजी झाली, व अंत ७ सप्टेंबर, १९९४ रोजी झाला.
५. मोठ्या संकटकाळाचा दुसरा भाग, जो ६,१०० दिवसांचा आहे (८,४०० – २,३०० = ६,१००), त्याची सुरुवात ७ सप्टेंबर, १९९४ रोजी झाली व त्याचा अंत २१ मे, २०११ रोजी होईल.
६. पृथ्वीच्या इतिहासाचे शेवटचे पांच महिने २१ मे, २०११ रोजी सुरू होतील, व २१ ऑक्टोबर, २०११ रोजी संपतील.

आतापर्यंत आपण जगाच्या अंताकडे नेणाऱ्या महत्वाच्या क्षणांची मूलभूत रूपरेषा मांडली आहे. आपल्याला काळाच्या ह्या माहितीपर्यंत आणण्यास कारणीभूत ठरणारी बायबलमधील माहितीही आपण दाखविली आहे.

पण आता आपल्याला काळाच्या ह्या रूपरेषेमध्ये मांडलेल्या तारखांची, बायबल आपल्याला देऊ शकत असलेल्या इतर कुठल्याही माहितीच्या प्रकाशात तपासणी करायची आहे. आपल्याला समजेल की देवानं इतकी जास्त माहिती दिली आहे की आपल्याला निःशंकपणे समजू शकतं की हे अगदी अचूक वेळापत्रक आहे. आता वेळेचा हा आकृतीबंध व्यवस्थितपणे कसा एकत्र बसतो हे दाखविण्यासाठी आपण अनेक मुद्दे मांडू.

आपण मंडळीयुगाच्या कालावधीपासून सुरवात करू, जे २२ मे, इ.स. ३३ रोजी सुरू झालं, व २१ मे, १९८८ रोजी संपलं. मंडळीयुगाच्या कालावधीत २२ मे, इ.स. ३३ व २१ मे, १९८८ ह्या दोन्ही दिवसांचा समावेश होता. ह्याचा अर्थ असा होतो की ते अगदी दिवसांच्या अचूकतेनं १,९५५ वर्षे (१९८८ – ३३ = १,९५५) इतकं चाललं. "दिवसाच्या अचूकतेनं" ही शब्दरचना देवाच्या पूर्वीच्या कार्याच्या अचूकतेशी बरोबर जुळते. उदाहरणार्थ, इस्राएलाला मिसरमध्ये राहून ४३० वर्षे संपली **"त्याच दिवसापर्यंत"** ते तिथे होते (निर्गम १२:४०–४१). बायबलमध्ये दिलेल्या माहितीवरून हे दाखविता येऊ शकतं की इस्राएल मिसरमधून निघालं त्या दिवसापासून इस्राएलानं यार्देन नदी पार करण्याची तयारी करण्यासाठी तिथं पोहोचेपर्यंत, दिवसाच्या अचूकतेनं ४० वर्षे लागली.

त्याचप्रमाणे, ख्रिस्त बोधकथांद्वारे बोलल्यामुळे, आपल्याला ह्या १,९५५ वर्षांचं अद्वितीय स्वरूप दिसेल. आठवा, बोधकथा म्हणजे स्वर्गीय अर्थ असलेली एक ऐहिक गोष्ट असते. अशा प्रकारे, शब्द किंवा संख्यांना (ज्या सुद्धा शब्दच असतात), ऐहिक, शब्दशः अर्थ असू शकतो, व त्यांना आध्यात्मिक अर्थही असू शकेल. म्हणून, ३ ही संख्या, आध्यात्मिकरीत्या, वारंवार देवाच्या हेतूवर जोर देते. संख्यांचा वापर करून देव वारंवार ज्यावर जोर देतो त्याचा आध्यात्मिक अर्थ पुन्हा मांडण्यासाठी ही जागा योग्य ठरेल.

२ – ज्यांना सुवार्ता आणण्यासाठी नियुक्त केलं गेलं आहे
३ – देवाचा हेतु
४ – देवाला अभिप्रेत असलेला वेळ किंवा अंतराची सर्वात दूरवरची मर्यादा
५ – प्रायश्चित्त, जे न्याय व तारण ह्या दोन्हींवर जोर देतं
७ – देवाच्या हेतूची परिपूर्ण पूर्ती
१० – जे काही अभिप्रेत आहे त्याची परिपूर्ती
११ – निर्मितीनंतर ११,००० वर्षांनी ख्रिस्ताचं प्रथम आगमन
१२ – जे काही अभिप्रेत आहे त्याचं पूर्णत्व
१३ – जगाचा अंत, ज्याचे तपशील निर्मितीनंतर बरोबर १३,००० वर्षांनी सुरू झाले.
१७ – स्वर्ग
२३ – देवाचा कोप किंवा न्याय

३७ – देवाचा कोप किंवा न्याय
४० – कसोटी घेणं
४३ – देवाचा कोप किंवा न्याय

त्याचबरोबर, बायबलमधून आपण शिकलो आहोत की जर आध्यात्मिक महत्व असणाऱ्या एखाद्या मोठ्या संख्येचे लहान संख्यांमध्ये अवयव पाडले जाऊ शकत असतील, तर मोठ्या संख्येतील आध्यात्मिक संदेश समजण्यात आपल्याला त्याची मदत होऊ शकते. मोठी संख्या ज्या संदर्भात सापडते तो संदर्भ समजण्यात आपल्याला मदत करणारी महत्वाची आध्यात्मिक माहिती ती मोठी संख्या आपल्याला देत आहे ह्याबद्दल आपण खात्री बाळगू शकतो.

मंडळीयुगाच्या १,९५५ वर्षांमध्ये हे तत्त्व नाट्यमयरीत्या दिसतं. १,९५५ ह्या संख्येचे ५ x १७ x २३ असे अवयव पाडले जाऊ शकतात. आणि ह्या तिन्ही संख्यांचा मंडळीयुगाच्या स्वरूपाशी प्रबळ आध्यात्मिक संबंध आहे. करिंथकरांस दुसरे पत्र २:१४–१६ मध्ये आपण वाचतो :

> **जो देव आम्हांस सर्वदा ख्रिस्ताच्या ठायी जयोत्सवाने नेतो, आणि सर्व ठिकाणी आमच्या द्वारे आपल्याविषयीच्या ज्ञानाचा परिमल प्रगट करितो, त्याची स्तुति असो. तारणप्राप्ति होत असलेले आणि नाश होत असलेले अशा लोकांसंबंधाने आम्ही देवाला संतोषदायक असा ख्रिस्ताचा परिमल आहो; एकाला मृत्यूचा मरणसूचक गंध, आणि एकाला जीवनाचा जीवनसूचक गंध आहो. हे कार्य करावयास कोण लायक आहे?**

ही पदं आपल्याला असं शिकवितात की सुवार्ता तारण व मृत्यु ही दोन्ही आणते. तारणाचा संबंध स्वर्गाशी आहे (१७). मृत्यूचा संबंध देवाच्या कोपाशी आहे (२३). आठवा, ५ ह्या संख्येचा आध्यात्मिकरीत्या प्रायश्चित्ताशी संबंध आहे. म्हणून, मंडळीयुगाची १,९५५ वर्षे, ज्या काळादरम्यान सुवार्ता जगात पाठविली जायची होती, त्यांचा संबंध स्पष्टपणे सुवार्तेच्या निव्वळ स्वरूपाशी व वैशिष्ट्याशी आहे : १,९५५ = ५ x १७ x २३. अशा प्रकारे, मंडळीयुगाची १,९५५ वर्षे प्रायश्चित्त (५) ह्यावर आधारित आहेत, ज्यामुळे स्वर्ग (७) मिळतो, व ज्यामुळे देवाचा कोप (२३) मिळतो. हा योगायोग आहे का? हा योगायोग अजिबात नाही आहे. आपण आताच वर्णिलेल्या तत्वाशी तो पूर्णपणे जुळतो.

**जगाचा १३,००० वा वर्धापन दिन**

१९८८ या वर्षाबाबत आणखी एक भाष्य केलं पाहिजे. १९८८ हे वर्ष जगाच्या इतिहासाचा १३,००० वा वर्धापन दिन आहे हा योगायोग आहे काय? आपण बायबलमधून शिकलो आहोत की जग ख्रिस्तपूर्व ११,०१३ मध्ये निर्माण केलं गेलं. जर आपण १९८८ मध्ये ११,०१३ मिळविले व १ वजा केला (कारण जुन्या करारातील दिनदर्शिकेकडून नव्या करारातील दिनदर्शिकेकडे जातांना शून्य वर्ष नसतं), तर बेरीज १३,००० होते. नक्कीच, मंडळीयुगाच्या अंताचं वर्ष, ज्याचा संबंध बिनचूकपणे जगाच्या १३,००० व्या वर्धापन दिनाशी आहे, त्यातून असं दर्शविलं जात असलं पाहिजे की देव एका अचूक पूर्वनियोजित योजनेची अंमलबजावणी करत आहे.

जेव्हां आपल्याला समजतं की निर्मितीच्या वर्षापासून (ख्रिस्तपूर्व ११,०१३) ते नोहाच्या काळातील प्रलयापर्यंत (ख्रिस्तपूर्व ४९९०), जेव्हां देवाचा निवाडा सबंध जगावर आला, ती बरोबर ६,००० अधिक २३ वर्षे होतात, तेव्हां ही माहिती विशेषकरून रसभरित होते. लक्षात घ्या, २३ हा आकडा बऱ्याचदा देवाचा कोप दर्शवितो. तसंच, ख्रिस्तपूर्व ४९९० पासून ते इसवी सन ३३ पर्यंत, जेव्हां ख्रिस्तानं देवाचा निवाडा सहन केला, ती दोन्ही वर्षे धरल्यास, ती बरोबर ५,००० अधिक २३ वर्षे होतात. आता आपल्याला कळू लागलं आहे की इसवी सन २०११ हे शेवटचं वर्ष आहे, आणि ख्रिस्तपूर्व ११,०१३ पासून ते इसवी सन २०११ पर्यंत १३,००० अधिक २३ वर्षे होतात. हे सर्व योगायोग असतील काय? लक्षात घ्या, आपण चाचणीवजा स्वरूपात निष्कर्ष काढला की २०११ हे शेवटचं वर्ष असेल कारण मोठ्या संकटाचा काळ बरोबर ८,४०० दिवसांचा असेल अशी बरीच

शक्यता आहे असं आपल्याला समजलं. आणि ८,४०० दिवस म्हणजे बरोबर २३ पूर्ण वर्षे. आणि १९८८ मध्ये २३ मिळविल्यावर आपण २०११ हा जगाचा अंत असेल या निष्कर्षाप्रत आलो.

शेवटची २३ वर्षे, म्हणजे मोठा संकटकाळ, २१ मे, १९८८ रोजी सुरु झाला, जी अंतसमयीच्या जागतिक न्यायनिवाड्याच्या प्रक्रियेची सुरुवात आहे. हे लक्षणीय आहे की २१ मे, १९८८ रोजी मंडळीयुग समाप्त झालं, ज्या वेळी मोठ्या संकटकाळातील निवाडा सुरु झाला, जे पेत्रास पहिले पत्र ४:१७ मधील भाकीताबरहुकूम होतं, **"निवाड्यास आरंभ देवाच्या घरापासून होईल."** आपण अशा प्रकारे शिकलो आहोत की १९८८ हे वर्ष, तसंच २१ मे, १९८८ हा दिवस, हे दोन्ही इतिहासाच्या कालरेषेच्या विकासात लक्षणीयरीत्या व्यवस्थित बसतात.

देवाच्या कालरेषेच्या उलगडण्यातील पुढचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९९४ हे वर्ष. आपण शिकलो की ७ सप्टेंबर, १९९४ हा दिवस २१ मे, १९८८ च्या नंतर बरोबर २,३०० दिवसांनी आला. लक्षात घ्या, आपण आधीच नोंद घेतली आहे की १९९४ हे वर्ष योबेलचं वर्ष होतं. म्हणजे, ते एक असं वर्ष आहे, ज्याचा केंद्रबिंदु जगात सुवार्ता पसरविण्याच्या देवाच्या आध्यात्मिक हेतूवर आहे. आता आपल्याला कळतं की ७ सप्टेंबर, १९९४ हा बायबलच्या दिनदर्शिकेतील सातव्या महिन्याचा पहिला दिवस (तिशरी १) होता.

तिशरी १ हा एक सणाचा दिवस होता ज्याला **"स्मरण देण्यासाठी रणशिंगे फुंकणं"** (लेवीय २३:२४) आणि **"कर्णे वाजविण्याचा दिवस"** (गणना २९:१) म्हटलं होतं .[११] इसवी सन ३३ मध्ये जेव्हां येशूनं योबेल, किंवा मसीहा म्हणून त्याचं काम अधिकृतरीत्या सुरु केलं, तेव्हां जो बायबलमधील सणाचा दिवस होता, तोच हा आहे. त्याच दिवशी त्याला **"जगाचं पापहरण करणारा कोकरा"** म्हणून घोषित केलं गेलं (योहान १:२९). आपल्या आधुनिक दिनदर्शिकेनुसार, इसवी सन २९ मध्ये, तो दिवस २६ सप्टेंबर हा होता. आणि बायबलमधील दिनदर्शिकेनुसार, तो दिवस तिशरी १ होता, जो योबेलच्या सणाचा दिवस होता, अगदी तसाच, जसा ७ सप्टेंबर, १९९४ एक योबेलच्या सणाचा दिवस आहे.

"योबेल" ह्या शब्दाचा संबंध जगात मुक्तीची घोषणा करण्याच्या सर्व गोष्टींशी आहे (लेवीय २५:१०). म्हणूनच, प्रायश्चित्ताच्या दिवसाच्या संदर्भात, *"तेरुआह"* ह्याचा "योबेल" असा योग्य अनुवाद केला गेला आहे. ख्रिस्त हा प्रायश्चित्ताचं सार आहे, तसंच योबेलचंसुद्धा सार आहे. अशा प्रकारे, ज्याप्रमाणे योहान १:२९ मध्ये आपण वाचतो, त्यानुसार २६ सप्टेंबर, इ.स. २९ रोजी जेव्हां बाप्टिस्ट योहानाकडून त्याला **"हा पाहा देवाचा कोकरा"** असं घोषित केलं, तेव्हां ख्रिस्त हा तारणाची सुवार्ता घेऊन आलेला "योबेल" आहे अशी जगासाठी ती एक गौरवशाली घोषणा होती.

त्याचप्रकारे, १९९४ ह्या योबेलच्या वर्षी, ७ सप्टेंबर रोजी, सुवार्ता पुन्हा संपूर्ण जगात जाहीर केली जायची होती. आणि २६ सप्टेंबर, इ.स. २९ व ७ सप्टेंबर, १९९४ ह्या दोन्ही दिवशी बायबलनुसार सणाची तारीख सातव्या महिन्याचा पहिला दिवस होती. निश्चितपणे, लेवीय २५:९ मध्ये प्रायश्चित्ताच्या दिवसाच्या संदर्भात, *"तेरुआह"* चा अनुवाद रास्तपणे "योबेल" असा जरी केला गेला असला, तरी आपल्याला समजू शकतं की लेवीय २३:२४ व गणना २९:१ या पदांमध्ये, जी "*तेरुआहचं* स्मरण" व "*तेरुआहचा* दिवस" ह्याबद्दल बोलतात, आपल्याला समजू शकतं की त्याचा अनुवाद "योबेलचं स्मरण" व "योबेलचा सण" असा असला पाहिजे. म्हणून, हा सण, ज्याला ईश्वरी तत्ववेत्ते "कर्ण्यांचा सण" म्हणतात, त्याला "योबेलचा सण" असं म्हटलं गेलं पाहिजे.

---

११ लेवीय २३:२४ आणि गणना २९:१ या दोन्ही ठिकाणी, देव सातव्या महिन्याच्या पहिल्या दिवशीच्या सणाबद्दल बोलतो. या दोन्ही पदांमध्ये, *"तेरुआह"* या इब्री शब्दाचा अनुवाद "कर्णे वाजविणं" असा केला आहे. बायबलमध्ये अनेकदा, *"तेरुआह"* या शब्दाचा अनुवाद "ओरडणं" किंवा "धोक्याची सूचना" किंवा "आवाज देणं" असा केला आहे. पण त्याचा अनुवाद "कर्णे वाजविणं" असा या दोन पदांखेरीज इतरत्र कु ठेच केलेला नाही. तथापि, लेवीय २५:९ मध्ये, जे प्रायश्चित्ताच्या दिवसाबद्दल बोलतं, तिथं त्याचा अनुवाद "योबेल" असा केला आहे.

आठवा, आपण शिकलो की ७ सप्टेंबर, १९९४ रोजी, संकटकाळाच्या ८,४०० दिवसांपैकी पहिले २,३०० दिवस संपले. ७ सप्टेंबर, १९९४ रोजी संपूर्ण जगातून कुणाही माणसाला मोजता येणार नाही एवढा प्रचंड जनसमुदाय देवाच्या राज्यात येण्यास सुरुवात झाली. तो असा दिवस होता जेव्हां जगाच्या इतिहासात दुसऱ्यांदा पवित्र आत्म्याचा वर्षाव झाला. जर तो ७ सप्टेंबर, १९९४ शिवाय दुसरा कुठलाही दिवस असता, तर तिशरी १ च्या शुद्ध प्रतिपदेच्या सणाशी तो जुळला नसता, जो **"पुढे होणाऱ्या गोष्टींची छाया आहे"** (कलस्सैकरांस पत्र २:१६–१७). ही गौरवशाली घटना, ७ सप्टेंबर, १९९४ (तिशरी १, १९९४) चा सणाचा दिवस, म्हणजे तारणाच्या ६,१०० दिवसांच्या शेवटच्या कालखंडाची छाया होती व त्या दिवसानं खरोखर त्या कालावधीची सुरवात झाली.

पण १९९४ हे साल, ज्यात देवानं संपूर्ण जगात महान तारणाच्या शेवटच्या ६,१०० दिवसांची सुरवात केली, ते संपूर्ण जगातील मंडळींसाठी एक भयावह सालही होतं. पवित्र आत्म्याचा वर्षाव करण्यात आला जेणेकरून, मंडळींच्या बाहेर, म्हणजे, जगात कुठंही कुठल्याही मंडळीवर अवलंबून न राहता, कुणाही माणसाला मोजता येणार नाही एवढा प्रचंड जनसमुदाय तारला जाणार होता. त्याचवेळी, मंडळींमध्ये, न्यायप्रक्रिया चालू राहणार होती. मोठ्या संकटकाळाच्या सुरुवातीला सर्व मंडळींमध्ये प्रस्थापित करण्यात आलेला सैतान राज्य करीत राहणार होता. **"त्यांनी असत्यावर विश्वास ठेवावा म्हणून त्यांच्या ठायी भ्रांतीचे कार्य"** देव चालू ठेवणार होता (थेस्सलनीकाकरांस दुसरे पत्र २:११). देव मंडळींमध्ये असणाऱ्यांची शिक्षेसाठी तयारी करीत राहणार होता.

मंडळींसाठी ही एक प्रचंड भयावह कहाणी आहे. त्यांना स्वतःला हे समजत नाही. त्यांना वाटतं त्या प्रामाणिकपणे ख्रिस्ताची सेवा करीत आहेत. पण बायबल आपल्याला सत्य देतं. स्थानिक मंडळीच्या अधिकाराखाली तारण मिळणं पुन्हा कधीही शक्य होणार नाही.

आठवा, पूर्वी ह्या अभ्यासात, जेव्हां आपण बायबलमध्ये वर्णिलेल्या इतिहासकाळातील मोठ्या संकटकाळाचा आकृतीबंध तपासला होता, तेव्हां त्यांची भयानकरीत्या दुःखद परिस्थिती अधोरेखित केली गेली होती. ख्रिस्तपूर्व १८७९ साली, देशातील भीषण दुष्काळामुळे याकोबाला मोठ्या संकटकाळाचा अनुभव येऊ लागला (प्रेषितांची कृत्ये ७:११). त्यानंतर दोन वर्षांनी, १८७७ साली, याकोबाला त्याच्या कुटुंबकबिल्यासह मिसरमध्ये रहायला जाण्याची आज्ञा देण्यात आली. २१५ वर्षांपूर्वी, त्याचे आजोबा, कुटुंबप्रमुख, अब्राहाम ह्यांना दिला गेलेला आश्वासित प्रदेश त्यांनी सोडायचा होता. कनानाचा देश हा देवाच्या राज्याचं उदाहरण असल्याकारणाने, ती देवाचं राज्य सोडण्याची आज्ञा असल्यासारखं होतं. इ.स. १९८८ मध्ये जशी देवानं सैतानाला मंडळींवर सत्ता दिली, त्याचप्रमाणे आश्वासित प्रदेश कनान, जगातील दुष्ट लोकांना राज्य करण्यासाठी दिला गेला. तो नक्कीच मोठ्या संकटाचा काळ होता.

देव त्या संकटकाळाची सांगड मंडळींच्या संकटकाळाशी घालतो, जेव्हां १९९४ साली, हे स्पष्ट झालं की देवानं त्यांच्यातून पूर्णपणे अंग काढून घेतलं, व त्यानं त्यांची न्यायासाठी तयारी करून घेण्यास सुरवात केली. पुन्हा, जेव्हां आपण योसेफाच्या काळातील संकटकाळ सध्याच्या मोठ्या संकटकाळाशी जोडणाऱ्या संख्या तपासतो, तेव्हां आपल्याला एकमेकांत पुष्कळ अंतर असणाऱ्या ह्या घटनांच्या आध्यात्मिक स्वरूपाचं आणखी महत्व दिसतं. जेव्हां आपण १९९४ मध्ये १८७७ मिळवितो, व १ वर्ष वजा करतो, तेव्हां आपल्याला ह्या दुःखद घटनांच्या मधील वर्षे म्हणून एकूण ३,८७० ही संख्या मिळते. ३,८७० या संख्येचे ३ X १,२९० किंवा १० X ३ X ३ X ४३ असे अवयव पडतात. ४३ ही संख्या सामान्यतः न्याय दर्शविते. म्हणून, त्या दोन घटना एवढ्या वर्षांच्या संख्येनं एकत्र जोडल्या गेल्या आहेत, जी न्याय (४३) आणण्याचा देवाचा संपूर्ण (१०) हेतू (३ X ३) दर्शविते. ३ ही संख्या दुप्पट केली असता ती केवळ देवाचा हेतूच दर्शवित नाही तर तो तसं घडवील हेही दर्शविते (उत्पत्ती ४१:३२).

आपण या अभ्यासात याआधी पाहिलं की मंडळीत सध्या सैतानाची सत्ता आहे, आणि त्यांच्यावरील निवाड्याच्या या भयंकर काळाचा संबंध, इस्राएलानं ७० वर्षे जे प्रचंड संकट अनुभविलं, त्याच्याशी सुद्धा देव जोडतो. त्याची सुरुवात ख्रिस्तपूर्व ६०९ मध्ये राजा योशीयाच्या मृत्यूनं झाली आणि ते

पुढे ७० वर्षे, ख्रिस्तपूर्व ५३९ मध्ये बाबेलचा राजा मारला जाईपर्यंत, चालू राहिलं. ख्रिस्तपूर्व ५८७ हे वर्ष विशेष भीतीचं होतं. आधीच ख्रिस्तपूर्व ६०९ मध्ये, जेव्हां इस्राएलाचा शेवटचा चांगला राजा योशीया मारला गेला, तेव्हां इस्राएल अधिकाधिक अधर्मी राजांच्या सत्तेखाली जाऊ लागला, आणि हे राजे मंडळीत राज्य करणाऱ्या सैतानाचं उदाहरण होते. तथापि, ख्रिस्तपूर्व ५८७ मध्ये, यरुशलेमेचा मंदिरासहित संपूर्ण नाश झाला. बाबेलचा राजा, दुष्ट नबुखद्नेस्सर, जो बायबलमध्ये सैतानाचं उदाहरण आहे, तो इस्राएलाच्या सबंध देशाचा सत्ताधीश झाला. किती भयंकर!

ही दुःखद आणि भयंकर घटना म्हणजे आपल्या काळातील मोठ्या संकटाचा असा पण एक नमुना आहे, जो देवानं दिला आहे. त्याचा संबंध सुद्धा, सध्याच्या मोठ्या संकटाच्या १९९४ या वर्षाशी, त्यांच्या दरम्यान असलेल्या वर्षांच्या संख्येनं आहे. यरुशलेमचा नाश ख्रिस्तपूर्व ५८७ मध्ये झाला. जर आपण १९९४ मध्ये ५८७ मिळविले, आणि १ वजा केला. तर बेरीज २,५८० होते, ज्याचे अवयव २ X १,२९०, किंवा १० X ३ X २ X ४३ असे पडतात. २ हा आकडा आध्यात्मिकरीत्या सुवार्ता आणणाऱ्यांचं प्रतिनिधित्व करत असल्यामुळे, २,५८० वर्षांच्या या काळाचा आध्यात्मिक संदेश असा आहे की मंडळी, ज्यांच्याकडे जगात सुवार्ता आणण्याचं काम सोपविलेलं होतं, त्यांच्यावरील देवाचा पूर्ण (१०) हेतु (३) असा होता की त्या निवाड्याखाली (४३) येतील.

रसभरितरीत्या, आणि फारच उपयुक्तपणे, याकोब, इस्राएल, आणि आपला काळ यांची ही तीन संकटं, देव दानीएल १२:११ या पदानं जोडतो, जिथं देव जाहीर करतो :

> **नित्याचे बलिहवन बंद होईल व विध्वंसमूलक अमंगलाची स्थापना होईल. तेव्हांपासून एक हजार दोनशे नव्वद दिवस लोटतील.**

कधीकधी बायबल एक दिवसाचा उपयोग एक वर्ष दाखविण्यासाठी करत असल्यामुळे (यहेज्केल ४:६), आपल्याला माहीत आहे की आपण ही १,२९० वर्षे असल्याचं समजू शकतो. ख्रिस्तपूर्व १८७७ मधील याकोबावरील संकट, आणि ख्रिस्तपूर्व ५८७ मधील इस्राएलावरील संकट या दरम्यान १,२९० वर्षे होती. तसंच, ख्रिस्तपूर्व १८७७ मधील याकोबावरील संकट आणि इसवी सन १९९४ मधील मंडळींवरील संकट या दरम्यान, ३ X १,२९० वर्षे होती. त्याचप्रमाणे, ख्रिस्तपूर्व ५८७ मधील इस्राएलावरील संकट आणि आपल्या काळातील इसवी सन १९९४ मधील संकट या दरम्यान २ X १२९० वर्षे होती.

या घटना किती घट्टपणे एकत्र जुळतात, ते कृपया लक्षात घ्या, जे असं दर्शवितं की, खरोखरच, इतिहासाच्या कालरेषेच्या उलगडण्याच्या संबंधातील आपलं सुरुवातीचं आकलन, बायबलमधील भाषेमुळे अधिकाधिक भक्कम होत आहे.

काळातील पुढील महत्त्वाचा टप्पा जो आपण काळजीपूर्वक तपासला पाहिजे, तो आहे २१ मे, २०११, जो मोठ्या संकटाच्या ८,४०० दिवसांचा, किंवा पूर्ण २३ वर्षांचा शेवटचा दिवस आहे. लक्षात घ्या, आपण शिकलो की त्याच्या नंतर शेवटचा १५३ दिवसांचा (५ महिन्यांचा) एक कालखंड येणार आहे, ज्याचा शेवट २१ ऑक्टोबर, २०११ रोजी होईल. २१ मे आणि २१ ऑक्टोबर हे दोन्ही दिवस २०११ मध्ये येत असल्यामुळे, आणि आपण शिकत आहोत की ते वर्ष जगाच्या अस्तित्त्वाचं शेवटचं वर्ष असेल, आपण ते वर्ष फारच काळजीपूर्वक तपासायला हवं.

**एक दिवस म्हणजे हजार वर्षे**

देव आपलं लक्ष त्या वर्षाकडे मोठ्या सक्तीने वेधतो. नोहाच्या काळातील ज्या प्रलयात सबंध जगाचा नाश झाला, त्याच्याबद्दल, पेत्राचे दुसरे पत्र ३:६ मध्ये, देव बोलतो, आणि तिथं आपण वाचतो :

> **त्याच्या योगे तेव्हांच्या जगाचा पाण्याने बुडून नाश झाला.**

मग पुढील पदात, जगाच्या अंतसमयी जो भीतिदायक निवाडा होईल, त्याबद्दल देव बोलतो. पद ७ मध्ये आपण वाचतो :

> **पण आतांचे आकाश व पृथ्वी ही त्याच शब्दाने राखलेली आहेत; म्हणजे न्यायनिवाड्याचा व भक्तिहीन लोकांचा नाशाचा दिवस येईपर्यंत राखून ठेवलेली आहेत.**

या दोन पदांच्या पाठीमागून लगेचच, देव एक मोठं विचित्र विधान पेत्राचे दुसरे पत्र ३:८ मध्ये करतो, जिथं आपण वाचतो :

> **तरी प्रियजनहो, ही एक गोष्ट तुम्ही विसरू नका की, प्रभूला एक दिवस हजार वर्षांसारखा आहे आणि हजार वर्षे एका दिवसासारखी आहेत.**

देव जेव्हां म्हणतो की जे निवडलेले आहेत, आणि जे देवाचे "प्रियजन" आहेत, त्या सर्वांनी एक गोष्ट विसरू नये असं त्याला वाटतं, तेव्हां दृष्टिक्षेपात असलेली "एक गोष्ट" कोणती आहे? ती प्रचंड महत्त्वाची असली पाहिजे, आणि देव आग्रह धरतो की त्यांना हे माहीत असायला पाहिजे. या गोष्टीचा संबंध सर्वस्वी काळाशी आहे.

देव म्हणतो, "**प्रभूला एक दिवस हजार वर्षांसारखा आहे आणि हजार वर्षे एका दिवसासारखी आहेत.**" लगेचच आपल्याला दिसतं की देव या एका गोष्टीबद्दल दोनदा बोलत आहे. म्हणजे, पहिल्यांदा, तो जाहीर करतो, "**एक दिवस हजार वर्षांसारखा आहे.**" मग तो या माहितीची पुनरुक्ति करतांना असं म्हणतो की "**हजार वर्षे एका दिवसासारखी आहेत.**" एक दिवस म्हणजे हजार वर्षे, हे सर्व खऱ्या श्रद्धाळूंना माहीत असायलाच हवं, या वस्तुस्थितीचं महत्त्व यामुळे आणखी खूपच अधोरेखित होतं.

आठवा, फारोला आधी सात पुष्ट गाईंचं स्वप्न पडलं, ज्या कृश झाल्या, आणि मग धान्याच्या सात पुष्ट कणसांचं, जी बारीक झाली. या घटनेच्या संदर्भात, देवानं उत्पत्ति ४१:३२ मध्ये, एक बायबलाधिष्ठित तत्त्व मांडलं, जिथं आपण वाचतो :

> **हे स्वप्न फारोस दोनदा पडले याचे कारण हेच की हे देवाने ठरविले आहे व ते देव लवकरच घडवून आणणार.**

या पदात देवानं जो कायदा घालून दिला, तो असा की जेव्हां देव एखादं विधान दोनदा करतो, तेव्हां त्यामुळे त्याचं सत्यत्व अधोरेखित होतं. जे होणार आहे, ते होण्याची खात्री असते, आणि ते लवकरच होईल. अशा प्रकारे, एक दिवस म्हणजे एक हजार वर्षांसारखा असतो हे विधान दोनदा करून, देव आपल्याला सांगत आहे की ते फारच महत्त्वाचं आहे, आणि ते नक्कीच खरं होईल.

पण त्याचा संबंध पेत्राचे दुसरे पत्र ३ शी कसा काय लागतो, जिथं देव, नोहाच्या काळातील निवाडा आणि आपल्या काळातील निवाडा, या दोन सार्वत्रिक निवाड्यांबद्दल बोलतो? उत्पत्ति प्रकरण ७ मध्ये जे प्रलयाचं वर्णन दिलं आहे, त्याच्याकडे जेव्हां आपण काळजीपूर्वकपणे पाहातो, तेव्हां आपल्याला याचं उत्तर मिळतं. देवानं नोहाला जे प्रचंड तारू बांधण्याची आज्ञा दिली, त्या तारवाचा आपण विचार केला पाहिजे. उत्पत्ति ७:१—४ मध्ये आपण वाचतो :

> **मग परमेश्वराने नोहाला सांगितले, तू आपल्या सगळ्या कुटुंबासह तारवात चल; कारण मी पाहिले आहे की या पिढीत तूच माझ्यापुढे नीतिमान आहेस. सर्व शुद्ध पशूंपैकी नरमाद्या सातसात आणि अशुद्ध पशूंपैकी नरमाद्या दोनदोन, आणि आकाशांतील पक्ष्यांपैकी नरमाद्या सातसात बरोबर घे; अशाने भूतलावर त्यांचे बीज राहील. अजून सात दिवसांचा अवकाश आहे; मग मी चाळीस दिवस व चाळीस रात्री पृथ्वीवर पर्जन्य पाडणार, आणि मी केलेले सर्व कांही भूतलावरून नाहींसे करणार.**

आध्यात्मिकरीत्या, प्रलयाचं पाणी म्हणजे नोहाच्या काळातील सबंध जगातील दुष्ट लोकांवरील देवाच्या निवाड्याचं प्रतीक होतं. तारू हे त्या न्यायापासूनच्या बचावाचं प्रतीक होतं, म्हणून ते आपल्या तारणहाराचं, म्हणजे प्रभु येशू खिस्ताचं प्रतीक होतं, जो एकटाच आपल्याला निवाड्यापासून वाचवू शकतो. प्राणी म्हणजे सबंध सृष्टीचे प्रतिनिधि होते, जी सृष्टि नश्वरतेच्या दास्यातून मुक्ति मिळण्यासाठी खिस्ताकडे नजर लावते (रोमकरांस पत्र ८:१९–२३). हे तेव्हां होईल जेव्हां देव नवीन स्वर्ग व नवीन पृथ्वी अस्तित्त्वात आणील.

अशा प्रकारे, उत्पत्ति ७ मध्ये, देव परिणामकरीत्या असं म्हणत आहे की खिस्ताच्या सुरक्षिततेत येण्यासाठी, सबंध जगातील सर्व मनुष्यजातीकडे सात दिवसांचा वेळ असेल, आणि केवळ खिस्तच आपल्याला देवाच्या कोपापासून वाचवू शकतो. पण एक मिनिट थांबा. पेत्रास दुसरे पत्र ३ मध्ये, देवानं असा आग्रह धरला नव्हता काय की आपल्याला हे नक्की माहीत असलं पाहिजे की एक दिवस एक हजार वर्षां सारखा आहे? आपण सात दिवसांऐवजी ७,००० वर्षे घेऊ या. म्हणून, परिणामकरीत्या, देव नोहाला असं सांगत होता की सबंध जगात केव्हांही जगलेल्या सर्व मानवजातीला, जर देवाच्या कोपापासून सुटका हवी असेल, तर खिस्ताच्या सुरक्षिततेत येण्यासाठी त्यांच्याकडे ७,००० वर्षे असतील.

नोहाच्या काळातील प्रलयानंतर बरोबर ७,००० वर्षांनी कोणतं वर्ष असेल? आणि तुमचा विश्वास बसणार नाही! खूपच पूर्वी आपण शिकलो की प्रलय खिस्तपूर्व ४९९० मध्ये आला, आणि त्यानंतर ७,००० वर्षांनी आपण २०११ शी पोहोचू. लक्षात घ्या, जुन्या करारातील वर्षे आपण नव्या करारातील वर्षांमध्ये मिळवितो आणि १ वर्ष वजा करतो, कारण शून्य वर्ष नसतं.

४९९० + २०११ – १ = ७,००० वर्षे

<u>अशा प्रकारे, आपण हे समजून घेतलं पाहिजे की देव नक्कीच असं जाहीर करत आहे की देवानं निवडलेल्या सर्व लोकांना पक्कं माहीत पाहिजे की २०११ हे वर्ष जगाच्या अंताचं वर्ष असेल.</u>

**शेवटचे पांच महिने**

पण यापेक्षाही अधिक कांही तरी सांगण्यासारखं आहे. आपण शिकलो आहोत की ८,४०० दिवसांच्या मोठ्या संकटकाळाच्या मागून येणारा एक पांच महिन्यांचा काळ आहे. त्या काळात काय घडणार आहे? हे शेवटचे पांच महिने, जे २१ मे, २०११ रोजी सुरु होतील, ते देवाच्या तारणयोजनेवर तसंच त्याच्या न्यायनिवाडायोजनेवर तीव्रपणे केंद्रित असतील. आपल्याला समजून येणार आहे की त्या पांच महिन्यांच्या पहिल्या दिवशी, म्हणजे २१ मे २०११ रोजी, सर्व खऱ्या श्रद्धाळूंना सर्वकाळ खिस्तासोबत राहाण्यासाठी हवेत वर उचललं जाईल. आपल्याला असं पण समजून येईल की तो असा दिवस असेल जेव्हां तारल्या न गेलेल्यांसाठी नरकाचा निवाडा सुरु होईल.

प्रकटीकरण ९ मध्ये, बायबल अशा काळाबद्दल बोलतं, जेव्हां या पृथ्वीवर नरक सुरु होईल. त्याचा कालखंड पांच महिन्यांचा असेल (पद ५ व १०). त्या प्रकरणाची सुरुवात या शब्दांनी होते की **"अथांग डोह"** (नरकासाठीचा समानार्थी शब्द) उघडला गेला आणि भट्टीच्या धुरासारखा धूर वर चढला. त्या वेळी, ज्या लोकांना अशी खात्री होती की ते तारले गेले होते कारण ते बायबलचे शिक्षक आणि उपदेशक होते, पण जे तारले गेले नव्हते, आणि त्यांना हवेत वर उचललं गेलं नाही, ते अजून त्यांचं बायबलचं चुकीचं आकलनच शिकवित असतील त्यांचं उदाहरण म्हणजे टोळ (पद ३), आणि त्यांच्यावर अबद्दोन (विनाश) आणि अपल्लूओन (विनाशकर्ता) यांची सत्ता असेल (पद ११), आणि त्या वेळी पृथ्वीवर जिवंत असलेल्यांना ते उपद्रव करतील. तथापि, त्यांनी त्या लोकांना उपद्रव करायचा नाही ज्यांच्या कपाळांवर देवाचा शिक्का असेल.

नरकाचं सार हे की सार्वकालिक विनाशाचा दंड मिळणं, सर्वकाळासाठी नष्ट होणं. म्हणूनच, तारल्या न गेलेल्या या लोकांवर अबद्दोन आणि अपल्लूओन यांची अधिसत्ता असते (प्रकटीकरण ९:११), जी अशी नांवं आहेत जी नरकाच्या साराचं वर्णन करतात. त्या पांच महिन्यांदरम्यान, ते पृथ्वीवरील नरकात असल्यामुळे, तारल्या न गेलेल्या सर्व लोकांचा सर्वकाळासाठी नाश होईल याची खात्री आहे. ते पुन्हा कधीही, कधीही जिवंत असणार नाहीत, ते, तसंच सबंध विश्व, हे नामशेष होतील. ज्यांच्या कपाळांवर देवाचा शिक्का असेल, अशा खऱ्या श्रद्धाळूंना ते उपद्रव करू शकणार नाहीत कारण खऱ्या श्रद्धाळूंना कधीच नरकाचा अनुभव घ्यावा लागत नाही. ज्या क्षणी पृथ्वीवरील नरकाचे हे शेवटचे पांच महिने सुरु होतील, त्याच क्षणी, खऱ्या श्रद्धाळूंना हवेत वर उचललं जाईल.

प्रकटीकरण ९:४ मध्ये देव जाहीर करतो :

> **त्यांस असे सांगण्यात आले की, पृथ्वीवरील गवताला, कोणत्याहि हिरवळीला व कोणत्याहि झाडाला उपद्रव करू नये; तर ज्या माणसांच्या कपाळांवर देवाचा शिक्का नाही त्यांना मात्र उपद्रव करावा.**

या संदर्भात, गवत, हिरवळ, आणि झाडे म्हणजे खऱ्या श्रद्धाळूंचं प्रतीक आहेत. प्रकटीकरण १५ मध्ये, देव शेवटल्या पीडांवर, पृथ्वीवरील नरकाचा शेवटचा काळ, यावर जोर देतो, आणि पद १ मध्ये, तो जाहीर करतो, "**कारण त्यांच्या योगे देवाचा क्रोध पूर्ण झाला**."

पुढील पद आपल्याला असं आश्वासन देतं की त्याच वेळी सर्व श्रद्धाळू देवाबरोबर **"काचेच्या समुद्रावर"** सुरक्षित आहेत. प्रकटीकरण १५:२ मध्ये आपण वाचतो :

> **मग अग्निमिश्रित काचेच्या समुद्रासारखे काही तरी माझ्या दृष्टीस पडले; श्वापदावर, त्याच्या मूर्तीवर व त्याच्या नामसंख्येवर जय मिळविलेले लोक हातात देवाच्या वीणा घेऊन त्या काचेच्या समुद्रावर उभे राहिलेले माझ्या दृष्टीस पडले.**
>
> **"काचेचा समुद्र"** म्हणजे प्रकटीकरण ४:२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे स्वर्ग आहे. **". . . तो पाहा, स्वर्गात राजासन मांडलेले होते, आणि त्या राजासनावर कोणीएक बसलेला होता."** मग पद ६ जाहीर करते, **"राजासनापुढे स्फटिकासारखा जणू काय काचेचा समुद्र होता."**

खरे श्रद्धाळू ह्या शेवटच्या पाच महिन्यांच्या कालावधीच्या पहिल्या दिवशी हवेत वर उचलले गेले असतील, म्हणून त्यांची त्या शेवटच्या कालावधीच्या भयानक गोष्टींमधून सुटका होईल. उलटपक्षी जे हवेत वर उचलले जाणार नाहीत त्यांच्यासाठी हा पाच महिन्यांचा कालावधि म्हणजे एक मोठी भयकथा असेल, पण जे हवेत वर उचलले जातील त्यांच्यासाठी हा काळ मोठ्या आनंदाचा व अद्‌भुत असेल.

हा पाच महिन्यांचा कालावधि २१ मे, ते २१ ऑक्टोबरपर्यंत, बरोबर १५३ दिवसांचा आहे. जशी आपण १५३ माशांची तपासणी केली, तेव्हां जशी ती संख्या आध्यात्मिकरीत्या विभागली गेली, अगदी तशीच १५३ ह्या संख्येची आध्यात्मिकरीत्या ३ X ३ X १७ अशी विभागणी होते. म्हणून, आध्यात्मिकरीत्या, त्याचा अशा लोकांशी संबंध आहे ज्यांना स्वर्गात (१७) नेण्याचा देवाचा हेतू (३) होता. ३ ही संख्या दोनदा आली असल्यामुळे ती असं दर्शविते की देव नक्कीच तसं घडवील.

**आणखी अविश्वसनीय माहिती**

२१ मे, २०११ ही तारीख हवेत वर उचललं जाण्याची तारीख आहे ह्याचा आणखी पुरावा म्हणून आपल्याला एक अधिक महत्वाची वस्तुस्थिती समजली. बायबलमधील सणांच्या दिनदर्शिकेनुसार, २१ मे,

२०११ हा दुसऱ्या महिन्याचा १७ वा दिवस आहे. बरोबर ७,००० वर्षांपूर्वी, नोहानं वापरलेल्या दिनदर्शिकेनुसार, दुसऱ्या महिन्याच्या १७ व्या दिवशी, देवानं तारवाचं दार बंद केलं. उत्पत्ति ७:१ व ४ मध्ये आपण वाचतो :

> **मग परमेश्वराने नोहाला सांगितले, तू आपल्या सगळ्या कुटुंबासह तारवात चल; कारण मी पाहिले आहे की या पिढीत . . . अजून सात दिवसांचा अवकाश आहे; मग मी चाळीस दिवस व चाळीस रात्री पृथ्वीवर पर्जन्य पाडणार, आणि मी केलेले सर्व काही भूतलावरून नाहीसे करणार.**

आणि उत्पत्ति ७:१०—११ मध्ये आपण वाचतो :

> **सात दिवसांनंतर प्रलयाचे पाणी पृथ्वीवर आले. नोहाच्या वयाच्या सहाशाव्या वर्षी दुसऱ्या महिन्याच्या सतराव्या दिवशी महाजलाशयाचे सर्व झरे फुटले आणि आकाशाची दारे उघडली.**

आणि पदं १३ व १६ मध्ये आपण वाचतो :

> **याच दिवशी नोहा, आणि त्याचे पुत्र शेम, हाम व याफेथ, आणि त्यांच्याबरोबर नोहाची बायको व त्याच्या तिघी सुना ही तारवात गेल्या; . . . देवाने नोहाला आज्ञा केल्याप्रमाणे सर्व देहधारी प्राण्यांपैकी एकएक नरमादी आत गेली; मग परमेश्वराने त्याला आत बंद केले.**

नोहाच्या काळातील दिनदर्शिका, नंतरच्या बायबलच्या दिनदर्शिकेपेक्षा अशा बाबतीत थोडी वेगळी होती की तिच्यात एका महिन्यात ३० दिवस होते, तर बायबलच्या नंतरच्या दिनदर्शिकेत एका महिन्यात साडे एकोणतीस दिवस होते, कारण ती चंद्राच्या कलांवर आधारित होती. पण लक्षणीयरीत्या, देवानं दुसऱ्या महिन्याच्या १७ व्या दिवशी तारवाचं दार बंद होण्याच्या वेळेची २१ मे, २०११ रोजी तारवाचं दार बंद होण्याच्या वेळेशी सांगड घातली, जो बायबलमधील सणांच्या दिनदर्शिकेतील दुसऱ्या महिन्याचा १७ वा दिवस आहे. ह्यानं तारवातील खऱ्या श्रद्धाळूंना तारवाच्या बाहेर नामशेष झालेल्या सर्व तारल्या न गेलेल्यांपासून कायमचं वेगळं केलं. ज्या तारखेला सर्व खरे श्रद्धाळू हवेत वर उचलले जायचे आहेत, तेव्हां मागे राहणाऱ्यांना पुन्हा कधीही तारण मिळण्याची कुठलीही शक्यता नाही ह्या वस्तुस्थितीचं हे चिन्ह आहे. अशा प्रकारे, आपल्याला कळू शकतं की हे जणू काही नोहाच्या काळातील सार्वत्रिक नाशादरम्यान, तसंच आपल्या काळातील सार्व त्रिक नाशादरम्यान, तारणाची आणखी कुठलीही शक्यता ज्या तारखांपासून संपली, त्या तारखांमध्ये, दिवसाच्या अचूकतेनं, बरोबर ७,००० वर्षांचं अंतर असल्यासारखं आहे. हा योगायोग असू शकेल काय?

**प्रायश्चित्तापासून हवेत वर उचललं जाण्यापर्यंत : ७२२,५०० दिवस**

देव आपल्याला काळाच्या माहितीचा आणखी एक रसभरित व महत्वाचा तुकडा देतो जो हवेत वर उचललं जाण्याची तारीख म्हणून २१ मे, २०११ च्या अचूकतेचं आणखी प्रात्यक्षिक देतो. प्रभु येशू ज्या लोकांना तारण्यास आला, त्यांच्या पापांसाठी त्याला १ एप्रिल, इ.स. ३३ रोजी, वधस्तंभावर चढविलं गेलं. त्यानंतर बरोबर ७२२,५०० दिवसांनी (तो दिवस धरून), हवेत वर उचललं जाणं (२१ मे, २०११ रोजी) घडेल. ही संख्या अतिशय महत्वाच्या संख्यांमध्ये विभागली जाते :

(५ x १० x १७) x (५ x १० x १७) = ७२२,५००

ह्या संख्यांचे आध्यात्मिक अर्थ आपण शिकलो आहोत. प्रायश्चित्ताचं कार्य (५) सर्व निवडलेले स्वर्गात (१७) सुखरूप पोचल्यावर पूर्ण (१०) होईल. १० x ५ x १७ ह्या तीन संख्याची पुनरावृत्ती होऊन ही अद्‌भुत वस्तुस्थिती दुप्पट होते. उत्पत्ती ४१:३२ प्रमाणे **"देवाने ठरविले आहे व ते देव लवकरच घडवून आणणार"** ह्यावर हे जोर देते.

जेव्हां ख्रिस्ताला वधस्तंभावर चढविण्यात आलं, तेव्हां येशूबरोबर सर्वकाळ स्वर्गात राहण्यासाठी वर उचललं जाणाऱ्यांच्या पापांचा पूर्ण दंड त्यानं भरला असल्यामुळे, देवानं २१ मे, २०११ रोजी हवेत वर

उचललं जाण्याच्या वेळेची सांगड स्वर्गात जाणं शक्य केलं जाण्याच्या वेळेशी (प्रायश्चित्ताशी) कशी घातली आहे हे आपण पाहू शकतो का?

आपल्या अभ्यासात ह्या टप्प्यावर, आपण क्षणभर थांबलं पाहिजे व ह्या आधीच्या परिच्छेदांमध्ये आताच आपण जे शिकलो त्यावर विचार केला पाहिजे.

आपल्याला पक्की खात्री आहे की ख्रिस्ताला वधस्तंभावर चढविण्याची घटना इसवी सन ३३ मध्ये वल्हांडणाच्या सणादिवशी घडली, जो शुक्रवार होता, आणि बायबलमधील सणांच्या दिनदर्शिकेतील पहिल्या महिन्याचा १४ वा दिवस होता. आपल्याला याची पण चांगली खात्री आहे की हा दिवस आपल्या आधुनिक दिनदर्शिकेनुसार, १ एप्रिल, इसवी सन ३३ होता. ख्रिस्त ज्या सर्व लोकांना तारण्यास आला, त्यांच्या पापांसाठी त्याला शिक्षा दिली गेली, तो दिवस तोच होता. त्यांच्या पापांचा दंड त्यानं भरल्यामुळे, त्याच्यासोबत सर्वकाळ राज्य करण्यासाठी स्वर्गात जाण्याची खात्री त्यांना मिळाली.

बायबलमध्ये आपल्याला दिल्या गेलेल्या बऱ्याच माहितीवरून आपल्याला कळलं आहे की, येशूनं त्याच्या वधस्तंभावर भरलेल्या दंडामुळे जे सर्व लोक तारले गेले, त्यांना जेव्हां २१ मे, २०११ रोजी हवेत वर उचललं जाईल, तेव्हां त्यांना कळून येईल की त्यांच्या तारणाची पूर्तता झाली आहे. म्हणून, हे अगदी स्पष्ट आहे की १ एप्रिल, इसवी सन ३३, आणि २१ मे २०११, या तारखांमध्ये आध्यात्मिकरीत्या, अगदी जवळचा संबंध आहे.

पण आपल्याला असंही कळतं की या दोन तारखा, ज्या एकमेकींपासून जवळजवळ २,००० वर्षे दूर आहेत, त्यांच्यामधील अंतराचे शब्दशः दिवस, तसंच त्या दिवसांच्या महान संख्येचं आध्यात्मिक महत्त्व, यांच्यायोगे या दोन तारखा नाट्यमयरीत्या, एकमेकींशी जोडल्या गेलेल्या आहेत.

७२२,५०० या संख्येकडे पुन्हा एकदा पाहा. १०, ५, आणि १७ या आध्यात्मिकरीत्या महत्त्वाच्या संख्यांच्या एका नेमक्या जोडीमध्ये, या संख्येचे अवयव पडतात हे अत्यंत अविश्वसनीय आहे ना? ज्या देवानं हे महान विश्व आणि त्यातील बिनचूक भौतिक कायदे निर्माण केले, फक्त तोच ही इतिहासाची कालरेषा इतक्या बिनचूक व विलक्षण पद्धतीनं आखू शकला असेल. तेव्हां, क्षमा करा! हे कालसंबंध योगायोगानं असतील याची शक्यता किती असेल? याचं उत्तर असंच असायला हवं की कोणत्याही परिस्थितीत, यातील कांहीही योगायोगामुळे असू शकणार नाही.

**आणखी पुरावे**

आम्हाला इतर पुरावे सुद्धा मिळत राहात आहेत, जे दाखवितात की अंताच्या वेळेसंबंधीच्या बिनचूक माहितीप्रत आम्ही पोहोचलो आहोत. जसं आपण पाहिलं आहे, जेव्हां हवेत वर उचललं जाणं घडेल आणि दरवाजा बंद होईल, तो दिवस बायबलमधील दिनदर्शिकेच्या दुसऱ्या महिन्यातील १७ वा दिवस असेल असं ठरवून देव २१ मे, २०११ ही तारीख पक्की करून टाकतो. लक्षणीयरीत्या, १७ हा आकडा, हवेत वर उचललं जाण्याच्या वस्तुस्थितीशी व्यवस्थित जुळतो कारण आध्यात्मिकरीत्या, १७ हा आकडा स्वर्ग दर्शवितो. शिवाय, २ हा आकडा (दुसरा महिना) आध्यात्मिकरीत्या, त्या लोकांशी संबंधित आहे, ज्यांच्याकडे सुवार्ता आणण्याचं काम सोपविलेलं आहे. त्यांना दुसऱ्या महिन्याच्या १७ व्या दिवशी हवेत वर उचललं जाईल हे अद्भुत आहे की नाही? तो योगायोग असेल काय?

आपण हे पण शिकलो आहोत की पृथ्वीच्या अस्तित्त्वाचा शेवटचा दिवस, म्हणजे २१ ऑक्टोबर, २०११, हा बायबलमधील दिनदर्शिकेतील सातव्या महिन्याचा २३ वा दिवस असेल. २३ हा आकडा सामान्यतः देवाचा कोप ओतला जाणं दर्शवितो. ७ हा आकडा (सातवा महिना) देवाच्या हेतूंची परिपूर्ण पूर्तता दर्शवितो. तारल्या न गेलेल्यांना दिल्या जाणाऱ्या देवाच्या शिक्षेची पूर्तता सातव्या महिन्यात २३ व्या दिवशी होईल, आणि २३ या आकड्याचा पूर्ण संबंध देवाच्या कोपाशी असतो, जो तारल्या न गेलेल्यांवरील देवाचा परिपूर्ण कोप दर्शवितो, हा पण योगायोग असेल काय?

जेव्हां आपण या शेवटच्या पांच महिन्यांच्या कालखंडाची तपासणी देवाच्या कोपाच्या भूमिकेतून करतो, तेव्हां जगाच्या अंताच्या कालरेषेची अचूकता आणखी अधोरेखित होते. जेव्हां देवानं येशूला शिक्षा दिली, जेव्हां तो निवडलेल्यांच्या पापांचा दंड भरत होता, तेव्हां त्यामुळे आपलं लक्ष या वस्तुस्थितीकडे वेधलं जातं की निवडल्या न गेलेल्यांच्या पापांसाठीची कांही शिक्षा अजून व्हायला हवी. या दोन शिक्षांमध्ये १,९७८ वर्षांचा संबंध आहे, जो वधस्तंभाची वेळ (इसवी सन ३३) पासून अंतसमयापर्यंतचा (इसवी सन २०११) कालावधि आहे.

२०११ – ३३ = १,९७८
१९७८ = २ X २३ X ४३

२ हा आकडा सुवार्ता आणणाऱ्यांचं प्रतीक असतो.
२३ हा आकडा कोप दर्शवितो.
४३ हा आकडा निवाडा दर्शवितो.

अशा प्रकारे, १,९७८ या आकड्याद्वारे देव यावर जोर देत आहे की निवाडा त्या लोकांच्यावर येईल, ज्यांना सुवार्ता आणण्यासाठी (२) नेमलं होतं आणि ज्यांच्यावर अजून देवाच्या कोप (२३ व ४३)लागू आहे.

**प्रचंड जनसमुदाय तारला जात असताना देवाची न्यायप्रक्रिया चालू आहे**

जेव्हां आपण मोठा संकटकाळ, हवेत वर उचललं जाणं, व पृथ्वीच्या अस्तित्वाच्या शेवटच्या दिवसाची तारीख यांची काळजीपूर्वक तपासणी करतो, तेव्हां आपल्याला आणखी एक रसभरित वस्तुस्थिती सापडते. आपण शिकलो आहोत की ८,४०० दिवसांच्या मोठ्या संकटकाळाच्या कालावधीच्या शेवटच्या ६,१०० दिवसांदरम्यान, कुणाही माणसाला मोजता येणार नाही एवढ्या प्रचंड जनसमुदायाला देवाच्या राज्यात आणण्यासाठी, देवाकडून मंडळींच्या बाहेर असणाऱ्या खऱ्या श्रद्धाळूंचा वापर केला जात आहे. त्याच वेळी, मंडळींमधील सर्व सदस्यांची शेवटच्या पाच महिन्यांच्या कालावधीत प्रवेश करण्यासाठी तयारी केली जात आहे, जेव्हां त्यांना देव शेवटची शिक्षा देईल. पण त्याच वेळी, जे लोक आधीच्या ६,१०० दिवसांदरम्यान तारले गेले होते, ते सर्व त्या लोकांबरोबर ह्या शेवटच्या १५३ दिवसांदरम्यान, स्वर्गात सुरक्षित असतील, जे संपूर्ण काळात तारले गेले आहेत. हे ६,१०० दिवस, शेवटच्या १५३ दिवसात मिळविले असता, ६,२५३ एवढे होतात. ६,२५३ ही संख्या, १३ X १३ X ३७ ह्या महत्वाच्या संख्यांमध्ये विभागली जाते.

१३ ही संख्या म्हणजे जगाचा अंत
३७ ही संख्या म्हणजे देवाचा न्याय

आठवा, नोहा बरोबर ३७० दिवस तारवात होता. हेही आठवा, सन्हेरीब ह्याच्या अधिपत्याखालील १८५,००० सैनिकांच्या अश्शूरी सैन्याचा एका रात्रीत देवाकडून नाश करण्यात आला (२ राजे १९:३५), व १८५,००० = १,००० X ५ X ३७. म्हणून, ३७ ह्या संख्येचा देवाच्या न्यायामुळे होणाऱ्या नाशाशी कसा संबंध आहे, ते आपल्याला कळू शकतं.

६,२५३ ह्या संख्येद्वारे देव आपल्याला असं आश्वासन देत आहे की प्रचंड जनसमुदायाला त्या कालावधीदरम्यान तारणाचा अनुभव येत असतानाच, देवाची न्यायप्रक्रिया (३७) जगाच्या अंतसमयी (१३) पूर्ण होईल. पुन्हा, १३ ह्या संख्येचं दोनदा येणं कृपया लक्षात घ्या.

ह्या अभ्यासात पूर्वी, निव्वळ बायबलमधील माहितीवरून आपण इतिहासाच्या अंताची अंतिम वेळ काहीशा चाचणीवजा पद्धतीनं प्रस्थापित केली. तथापि, नंतर, बायबलच्या अधिक माहितीचा काळजीपूर्वक उपयोग करीत आपल्याला असं समजलं आहे की कालरेषा फारच अचूक होती. पुराव्यांवर पुरावे अधोरेखित

केले गेले आहेत. सध्या मांडली गेलेली कालरेषेतील कुठलीही तारीख जर चुकीची असेल, तर ह्यापैकी पुष्कळ पुरावे अवैध होतील. निश्चितपणे बायबलमधून आपल्याला कळलेल्या कुठल्याही तारखा जर चुकीच्या असत्या, तर पुष्कळसे पुरावे आता कळले नसते. **आपण नक्कीच खात्री बाळगू शकतो की २१ मे, २०११ रोजी हवेत वर उचललं जाणं घडेल, जगाच्या इतिहासाचा शेवटचा दिवस २१ ऑक्टोबर, २०११ हा आहे.**

पण ही काही केवळ बौद्धिक किंवा तात्विक वास्तवं नाहीत. ही अशी सत्यं आहेत जी अगदी वैयक्तिकरीत्या ह्या पृथ्वीवर सध्या रहात असलेल्या प्रत्येक व्यक्तीला लागू पडतात (जवळजवळ सात अब्ज लोक). ह्या भयंकर न्यायदिवसातून सुटका करून घेणं शक्य आहे का?

# प्रकरण ६. माझ्यासाठी आशा आहे का?

बायबल स्पष्टपणे म्हणतं की प्रभु येशू ख्रिस्त रात्री येणाऱ्या चोराप्रमाणे येईल (पेत्राचे दुसरे पत्र ३:१०; थेस्सलनीकाकरांस पहिले पत्र ५:२). आपण शिकलो आहोत की संपूर्ण मंडळीयुगादरम्यान असा समज असणार होता. अशा तऱ्हेने, बायबलचे विद्यार्थी व ईश्वरी तत्ववेत्त्यांनी ख्रिस्ताच्या परत येण्याच्या वेळेची चिंता करावयाची नव्हती. त्यांनी संपूर्ण जगात सुवार्ता पाठविण्यावर लक्ष केंद्रित करावयाचं होतं (प्रेषितांची कृत्ये १:६–८).

तथापि, आपण शिकलो आहोत की जगाच्या अंताच्या अगदी जवळ, खऱ्या श्रद्धाळूंना इतिहासाच्या कालरेषेबद्दल पुष्कळ माहिती मिळेल (उपदेशक ८:५–६); थेस्सलनीकाकरांस पहिले पत्र ५:३–५; प्रकटीकरण ३:३).

आपण इतिहासाच्या त्या भयानक काळात आहोत, व म्हणून, बायबलाधिष्ठित अशा मोठ्या अचूकतेनं आपण नक्कीच जगाच्या अंताचा दिवस, महिना, व साल निश्चित करू शकलो आहोत.

काळाचा अंत इतका जवळ असल्यामुळे, आपल्याला खूप चिंता वाटली पाहिजे. **माझ्यासाठी आशा आहे का?** खरोखर, आज जिवंत असलेल्या कुणासाठीही मोठी आशा आहे. ते तसं आहे कारण देव नक्कीच आपल्याला आश्वासन देतो की इतिहासाच्या ह्या काळात, कुणाही माणसाला मोजता येणार नाही एवढा प्रचंड जनसमुदाय तारला जात आहे (प्रकटीकरण ७:९–१४). म्हणून, आपण देवाच्या तारणयोजनेवर थोडक्यात चर्चा केली पाहिजे. [१२]

मार्क १:१४ब–१५ मध्ये, मानवजातीला देवानं दिलेली आज्ञा येशू जाहीर करतो :

> **. . . येशू देवाची सुवार्ता गाजवीत गाजवीत गालीलात आला व म्हणाला, काळाची पूर्णता झाली आहे व देवाचे राज्य जवळ आले आहे; पश्चात्ताप करा व सुवार्तेवर विश्वास ठेवा.**

हे पद आज्ञा देत असल्याप्रमाणे सुवार्तेवर विश्वास ठेवणं म्हणजे सुवार्ता देवाच्या मुखातून आली आहे हे ओळखणं. म्हणूनच, ती अगदी सत्य, अगदी महत्वपूर्ण, व अगदी अधिकारयुक्त आहे. तो देवाचा कायदा, बायबल आहे, जो प्रत्येक व्यक्तीनं पाळला पाहिजे. म्हणूनच, सुवार्तेवर विश्वास ठेवणाऱ्या व्यक्तीनं त्याला बायबल जेवढं समजतं त्याप्रमाणे शक्य तेवढं आज्ञापालन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

प्रत्येक माणसात स्वभावतः काहीतरी आध्यात्मिक कार्य करण्याची काही प्रमाणात क्षमता असते, ज्यात बायबलवर विश्वास ठेवणं व त्याचं आज्ञापालन करणं याचा समावेश आहे. ह्याचं कारण असं आहे की देवाचा कायदा त्याच्या हृदयावर लिहिला गेला आहे (रोमकरांस पत्र २:१४–१५), व देवानं त्याला सदसद्विवेकबुद्धी दिली आहे जेणेकरून त्याला सदाचरणाची जाणीव असते. शरीर व आत्मा ह्या दोन्ही बाबतीत जरी तो अध्यात्मिकरीत्या मृत असला, ज्यामुळे तो स्वतःहून आध्यात्मिक जीवन मिळविण्याची शक्यता नाही, तरी काही प्रमाणात देवाचे कायदे पाळण्याची त्याच्यात क्षमता असते. प्रत्येक मनुष्य काही प्रमाणात पश्चात्ताप करतो, किंवा त्याच्या पापांपासून परावृत्त होतो. म्हणूनच, तो सभ्य, नीतिमान आयुष्य जगू शकतो. स्वभावतः , तो अध्यात्मिकरीत्या मृत असतो कारण तो आदामाचा, आपल्या पहिल्या पूर्वजाचा वंशज

---

१२ देवाच्या तारणयोजनेच्या आणखी सखोल अभ्यासासाठी, तुम्ही फॅमिली रेडिओला फोन करावा किंवा पत्र लिहावं आणि *मला आशा आहे की देव मला तारील* या मोफत पुस्तकाची मागणी करावी. पत्ता आहे : फॅमिली रेडिओ, ओकलॅण्ड, कॅलिफोर्निया ९४६२१. किंवा तुम्ही १-८००-५४३-१४९५ या क्रमांकावर फोन करावा. आमचा ईमेलसाठीचा पत्ता आहे : familyradio@familyradio.org

आहे. जेव्हां आदामानं एदेनाच्या बागेत पाप केलं, तेव्हां तत्त्वतः, संपूर्ण मानवजातीनं पाप केलं कारण आपण सर्व आदामाच्या पोटात होतो (करिंथकरांस पहिले पत्र १५:२२).

तथापि, तारलं जाण्याची, म्हणजे, त्याच्या शरीर किंवा आत्म्यामध्ये सार्वकालिक जीवन मिळविण्याची, क्षमता त्याच्याकडे अजिबात नसते. हे असं असण्याचं कारण हे की सुवार्ता असं दर्शविते की पापासाठी ज्या दंडाची मागणी देवाचा कायदा करतो, तो हा की पाप्याला लज्जास्पद मृत्यूची शिक्षा मिळावी. अशा प्रकारे, ज्या प्रत्येक व्यक्तीला त्याच्या पापांसाठी लज्जास्पद मृत्यूची शिक्षा फर्मावली गेली आहे, तो पुन्हा कधीही जिवंत असणार नाही, आणि सार्वकालिक जीवनाचं अद्भुत वतन त्यानं गमाविलेलं असतं. म्हणूनच, आपल्या वतीनं ही शिक्षा भोगण्यासाठी एक बदली मनुष्य आपल्यापैकी प्रत्येकानं शोधायला हवा.

पश्चात्ताप करा व सुवार्तेवर विश्वास ठेवा (पाप करणं थाबविणं व बायबलचं आज्ञापालन करणं), ही मार्क १:१५ मधील आज्ञा, सुमारे २,००० वर्षांपूर्वी दिली गेली होती. ती जाहीर करते की **"काळाची पूर्णता झाली आहे."** ज्या सर्व लोकांना तारण्यास येशू आला, त्यांना देवाच्या कायद्याच्या मागणीनुसार जो दंड भरावा लागेल, तो त्यांच्या वतीनं भरण्यासाठी, त्या वेळीच मसीहा येशू आला होता.

आज, "काळाची पूर्णता झाली आहे" हा शब्दप्रयोग देवाच्या तारणयोजनेला आणखी जास्त लागू आहे कारण आपण देवाच्या तारणयोजनेच्या अंतिम पूर्ततेपासून फारच थोडा काळ दूर आहोत. जसे आपण जगासाठीच्या त्याच्या या उदात्त तारणयोजनेचा अभ्यास करतो, तसं आपल्याला कळतं की जगात मूलतः तीन प्रकारचे लोक असतात. ते खालीलप्रमाणे :

१. असे लोक ज्यांनी त्यांच्या सबंध आयुष्यात बायबलमधील कोणतेच शब्द ऐकलेले नाहीत.

२. असे लोक ज्यांनी बायबलच्या शिकवणुकी ऐकल्या आहेत, पण जे बायबलची थट्टा करतात किंवा उपहास करतात, किंवा बायबलकडे स्वतःच्या पूर्वगर्भित कल्पना घेऊन येतात.

३. असे लोक ज्यांचा विश्वास असतो की बायबल म्हणजे ईश्वरी वचन आहे आणि जे कळकळीनं आणि विनम्रपणे, सर्वस्वी बायबलाधिष्ठित सत्यानुसार तारणाची इच्छा करतात.

**ज्यांनी कधीच ऐकलेलं नाही ते**

जगाच्या सबंध इतिहासात, असे लोक आहेत जे जगले आणि मेले, पण बायबलमधील एकही शब्द त्यांनी ऐकला नाही किंवा वाचला नाही. आणि "विश्वास वार्तेने, व वार्ता ख्रिस्ताच्या वचनाच्या द्वारे येते" (रोमकरांस पत्र १०:१७), त्यामुळे आपण असा विश्वास ठेवला पाहिजे की या लोकांच्यापैकी कोणालाच देवानं तारलं जाण्यासाठी निवडलं नव्हतं. म्हणून, त्यांच्या जीवनकालादरम्यान केव्हांही त्यांना ईश्वरी वचनाच्या श्रवणाखाली ठेवण्याची देवाला गरज नव्हती.

**ज्यांनी ऐकलेलं आहे पण जे उपहास करतात ते**

जेव्हां देवानं पश्चात्ताप करण्याची आणि सुवार्तेवर विश्वास ठेवण्याची आज्ञा दिली (मार्क १:१५), तेव्हांपासून देवाचा असा हेतु होता की जगात शक्य तितके जास्त लोक सुवार्तेच्या श्रवणाखाली यावेत. म्हणूनच, सुमारे २,००० वर्षांपूर्वी, येशूनं अशी आज्ञा दिली की सर्व खऱ्या श्रद्धाळूंनी सर्व जगात सुवार्ता पाठवायची आहे. (मत्तय २८:१९–२०).

जे पुष्कळ लोक बायबलशी थोडे बहुत परिचित झाले होते, आणि जसा त्यांनी बायबलमधील सत्यं समजून घेण्याचा प्रयत्न केला, तसा त्यांचा प्रतिसाद, दुःखदरीत्या, उपहास आणि थट्टा करणं, किंवा बायबलचे नियम पाळण्याऐवजी स्वतःचे नियम पाळणं अशा प्रकारचा होता. ज्या लोकांनी बायबलची थट्टा

केली, त्यांची खात्री पटली होती की बायबलमध्ये चुका आणि विरोधाभास होते, आणि म्हणून, त्याचं पालन करण्याची त्यांना कोणतीही इच्छा किंवा गरज नव्हती. जे लोक बायबलकडे, अर्थ लावण्यासाठी त्यांची स्वतःची मनुष्यनिर्मित पद्धत घेऊन आले, किंवा ज्यांनी अंतिम अधिकारी म्हणून त्यांचा विश्वास बायबलऐवजी त्यांच्या मंडळीवर किंवा संप्रदायावर ठेवला होता, ते लोक अशा धर्मोपदेशांचे आज्ञाधारक झाले जे बायबलशी प्रामाणिक नव्हते.

बायबल असं शिकवितं की तारल्या न गेलेल्या व्यक्ती कांही प्रमाणात देवाच्या कायद्यांचं पालन करू शकतात. हे सत्य कांही लोकांच्या खोट्या आशेचं स्पष्टीकरण देतं. उदाहरणार्थ, हे त्या लोकांच्या बाबतीत खरं आहे जे अशा मंडळींचे सदस्य आहेत ज्या कॅलव्हिनिझमचे पाच मुद्दे शिकवितात, जे एक ऐतिहासिक तत्वप्रणाली असलेल्या डॉर्टच्या कायद्यामधून मिळाले आहेत.[१३] पहिला मुद्दा असा आहे की आपण ह्यावर विश्वास ठेवायचा आहे की तारले जाण्यापूर्वी आपण पूर्णपणे भ्रष्ट असतो. ह्या मंडळींमधील सदस्य सभ्य, नीतिपूर्ण जीवन जगत असल्यामुळे, व त्यांच्या मंडळींच्या नियमांचं पालन करीत असल्यामुळे, त्यांना माहित असतं की ते पूर्णपणे भ्रष्ट असू शकत नाहीत. त्यांना त्यांच्या कबुलीजबाबानं शिकविलेलं असतं की संपूर्ण भ्रष्टता ही तारल्या न गेलेल्याची आध्यात्मिक स्थिती आहे. म्हणून, त्यांचा पाण्यातील बाप्तिस्मा झाला आहे व ते त्यांच्या मंडळीचे प्रामाणिक सदस्य आहेत ह्या वस्तुस्थितीसहित त्यांची धर्मनिष्ठ जीवनशैली व त्यांच्या मंडळीच्या प्रती असलेली निष्ठा, त्यांच्यासमोर नक्कीच सिद्ध करते की ते पूर्णपणे भ्रष्ट नाही आहेत, म्हणून, देवानं त्यांना तारलं असलं पाहिजे. त्यांना हे कळत नाही की संपूर्ण बायबलच्या आज्ञांचं पालन करण्याची तीव्र इच्छा असणं हा तारणाचा पुरावा आहे. अशा तऱ्हेने, बायबलला सोडून काढलेल्या ईश्वरी तत्ववेत्तीय निष्कर्षावर विश्वास ठेवल्यामुळे ते तारल्या न गेलेल्या स्थितीच्या सापळ्यात अडकतात.

आपण आणखी एका उदाहरणाची नोंद घेऊ या. इतर पुष्कळ मंडळींमध्ये, तारणहार म्हणून येशूचा वैयक्तिक स्वीकार व पाण्यातील बाप्तिस्मा म्हणजे तारणाची गुरुकिल्ली आहे असं शिकविलं जातं. ह्या मंडळींमध्ये, ह्या वरील क्रिया, तसंच त्या मंडळीच्या नियमांशी निष्ठा, व सभ्य व नीतिमान जीवन जगणं, यातून त्यांना तारणाचं भरपूर आश्वासन मिळत असल्यासारखं दिसतं. तथापि, बायबलमधील प्रत्येक गोष्टीशी प्रामाणिक असण्याची तीव्र, सततची इच्छा असणं हा तारणाचा पुरावा आहे असं ज्यात आहे, त्या बायबलमध्ये दिलेल्या तारणाच्या अचूक कार्यक्रमाऐवजी, हा ईश्वरी तत्ववेत्त्यांनी आखलेला तारणाचा कार्य क्रम आहे.

परिणामतः, आपल्या काळातील मंडळी, ज्या असा दावा करतात की, अचूक ईश्वरी वचनाच्या, म्हणजे बायबलच्या शिकवणुकींचं काळजीपूर्वक अनुकरण त्या मंडळी करतात, त्यांच्यामध्ये असे सभ्य, नीतिमान लोक भरलेले असतात, जे अगदी संपूर्ण धर्मश्रद्धेचे सदस्य असतात. ह्या प्रियजनांना कल्पना नाही आहे की ते अजूनही देवाच्या कोपाखाली आहेत, तसंच, त्यांची मंडळी खरोखर बायबलशी प्रामाणिक आहे की नाही हे निश्चित करण्यासाठी त्यांच्या मंडळीच्या शिकवणुकी काळजीपूर्वकपणे पडताळून पाहण्याची कोणतीही गरज त्यांना वाटत नाही.

थेस्सलनीकाकरांस पहिले पत्र ५ः२–४ मधील धोक्याच्या सूचनेची त्यांना भीति वाटली पाहिजे. ह्याचं कारण असं की मंडळींमध्ये असलेल्या जवळजवळ सर्व जणांना असा विश्वास आहे की ते ख्रिस्ताबरोबर सुरक्षित आहेत, व म्हणून, ते ह्यावर विश्वास ठेवण्यामध्ये समाधान मानतात की तो रात्री येणाऱ्या चोराप्रमाणे येईल. थेस्सलनीकाकरांस पहिले पत्र ५ः२–४ जाहीर करतात ः

> **कारण तुम्हाला स्वतःला पक्के माहीत आहे की, जसा रात्री चोर येतो, तसाच प्रभूचा दिवस येतो. शांति आहे, निर्भय आहे असे ते म्हणतात तेव्हां गरोदर स्त्रीला ज्याप्रमाणे अकस्मात् वेदना होतात**

१३ जॉन कॅल्विन, एक श्रेष्ठ ईश्वरी तत्त्ववेत्ता, जो सुमारे ४०० वर्षांपूर्वी जगला, त्याच्या ईश्वरी तत्त्वज्ञानविषयक निष्कर्षांचं बव्हंशी अनुसरण ज्या सनातनी प्रेस्बिटेरियन मंडळी व सुधारक मंडळी करतात, त्यांनी ग्राह्य मानलेले धर्मोपदेशक निष्कर्ष म्हणजे डॉर्टचे कायदे, किंवा तत्त्वप्रणाली.

**त्याप्रमाणे त्यांचा अकस्मात्  नाश होतो, आणि ते निभावणारच नाहीत. बंधुजनहो, त्या दिवसाने चोरासारखे तुम्हांस गाठावे असे तुम्ही अंधारात नाही.**

अकस्मात नाश म्हणजे केवळ न्यायदिवसाचा संदर्भ असू शकतो, जो जवळजवळ येऊन पोहोचलाच आहे. तारल्या न गेलेल्या कुणावरही येणारा देवाचा संपूर्ण कोप ह्या प्रियजनांना अजूनही लागू आहे, हे किती भयानक आहे.

पुष्कळशा वेळा, हे लोक सभ्य, नीतिमान लोक आहेत, जे अतिशय धर्मनिष्ठ व एखाद्या मंडळीचे निष्ठावान सदस्य आहेत. तथापि, त्यांच्या मंडळीनी शिकविलेल्या पूर्वगर्भित, चुकीच्या तत्वप्रणाल्या घेऊन बायबलकडे आल्यामुळे, परिणामतः, ते ईश्वरी वचन ऐकत नाही आहेत. संपूर्ण बायबलची शिकवणूक ऐकण्याऐवजी ते त्यांच्या मंडळीच्या चुकीच्या तत्वप्रणाल्या ऐकत आहेत व त्यांचं पालन करण्याची इच्छा बाळगून आहेत.  ते पुष्कळदा बायबल वाचतात, व मग, स्वतःच्या मनात, नकळत, त्यांच्या स्वतःच्या पूर्वगर्भित कल्पनांशी बायबलमधील सत्यांचा मारून मुटकून मेळ बसविण्याचा प्रयत्न करतात.

बायबल अशा प्रकारच्या वर्तणुकीचे पुष्कळ संदर्भ देतं. ते आपल्याला सतत सावध करतं की अशा प्रकारे देवाच्या वचनाचा तिरस्कार करणाऱ्यांवर, त्यांच्या अशा वर्तणुकीचा परिपाक म्हणून, त्याचा संपूर्ण कोप होईल. देव त्यांना तारण्याची शक्यता आहे असं कोणतंही प्रोत्साहन किंवा आशा ह्या व्यक्तींना मिळत नाही. खरंतर, त्यांना स्वतःला अशा आशेची गरज वाटत नाही. त्यांना वाटतं की ते आधीच तारले गेले आहेत, किंवा त्यांच्या स्वतः करण्याच्या तारणयोजनेनुसार, त्यांना वाटतं की त्यांना पाहिजे तेव्हां ते तारले जाऊ शकतात.

कुतुहलात्मक व भयंकर वस्तुस्थिती ही आहे की देव अशा प्रकारचं आध्यात्मिक बंड ओळखतो व सामान्यतः तो ह्या लोकांना त्यांच्या बंडात राहू देतो. उदाहरणार्थ, आपण वाचतो की येशू उपदेश करण्यासाठी नासरेथ येथे आला, व मार्क ६:५—६ मध्ये बायबल म्हणतं :

**थोड्याशाच रोग्यांवर हात ठेवून त्याने त्यांस बरे केले, ह्याशिवाय दुसरे कोणतेहि महत्कृत्य त्याला तेथे करता आले नाही. त्यांच्या अविश्वासामुळे त्याला आश्चर्य वाटले. मग तो शिक्षण देत देत गावोगाव फिरला.**

जरी नासरेथमधील या लोकांना त्याच्यावर विश्वास ठेवायला लावण्याचं सामर्थ्य देवाकडे नक्कीच होतं, तरी तो यावर नक्कीच जोर देतो की ज्या लोकांना सबंध ईश्वरी वचनाचं पालन करण्याची इच्छा नाही, ते लोक प्रचंड मोठया अध्यात्मिक धोक्यात असतात. उदाहरणार्थ, या प्रकारच्या लोकांना देवाचा जो सर्व सामान्य प्रतिसाद असतो, तो यिर्मया २६:४—६ मध्ये स्पष्टपणे जाहीर केला आहे, जिथं आपण वाचतो :

**त्यांस सांग की परमेश्वर असे म्हणतो, तुम्ही माझे ऐकणार नाही, मी तुम्हांपुढे ठेविलेल्या नियमाप्रमाणे तुम्ही चालणार नाही, माझे सेवक जे संदेष्टे त्यांस मी मोठ्या निकडीने तुम्हांकडे पाठविले असतां त्यांचे तुम्ही ऐकले नाही. त्यांची वचने आता तुम्ही ऐकणार नाही; तर मी हे मंदिर शिलोसारखे करीन, आणि हे नगर पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांना शापमूलक करीन.**

**बायबलचं आज्ञापालन करायचं असतं असा ज्यांचा नम्र विश्वास असतो ते**

बायबल तिसऱ्या एका प्रकारच्या लोकांबद्दल बोलतं, आणि ते म्हणजे असे लोक जे बायबल ऐकतात आणि त्याचं पालन करण्याची कळकळीची इच्छा त्यांना असते. त्यांचा विश्वास असतो की बायबल, जी सुवार्ता आहे, तो देवाचा कायदा आहे, जो त्यांना उद्देशून आहे. त्यांना समजतं की ते लज्जास्पद पापी आहेत आणि देवाबरोबर खूप अडचणीत आहेत. ते ओळखतात की बायबलमधील प्रत्येक शब्द देवाच्या मुखातून आलेला आहे, आणि म्हणून, त्यांनी त्याच्याकडे काळजीपूर्वक लक्ष दिलं पाहिजे. ते ही वस्तुस्थिती ओळखतात की फक्त देवच त्यांना तारू शकतो, आणि जरी त्यांना त्यांच्या पापांमुळे सार्वकालिक मृत्यूची शिक्षा दिली गेली पाहिजे, तरी त्यांना अशी आशा असते की कदाचित देवाला त्यांची दया येईल (लूक

१८:१३). बायबलमधील जे सर्व कांही त्यांना समजतं, त्याचं पालन करण्याचा प्रयत्न ते करतात, आणि त्यांना पूर्णपणे माहीत असतं की त्यांच्या आज्ञापालनाच्या कृतींचा तारणाला कोणताही हातभार लागत नाही किंवा त्यामुळे अशी कोणतीही खात्री त्यांना मिळत नाही की देव त्यांना तारील. ते कदाचित शिकतील की देव यावेळी मोठ्या जनसमुदायाला तारत आहे, आणि देव दयाळू असल्यामुळे, कदाचित ते सुद्धा तारले जाऊ शकतील.

आणि म्हणून, ते देवाकडे दयेची याचना करतात, हे माहीत असल्यामुळे की जर ते तारले जातील, तर ती केवळ देवाची दयाच असेल, जिला ते पात्र नसतात. दरम्यान, जसे ते धीरानं देवाची प्रतीक्षा करतात (विलापगीत ३:२६), तसे ते बायबलमधून जितकं शिकता येईल तितकं शिकण्याचा प्रयत्न करतात, जेणेकरून देवाच्या कायद्याचं जितकं जास्तीत जास्त पालन करता येईल तितकं ते करतील.

लोकांच्या या तिसऱ्या गटाची वृत्ति दुसऱ्या गटाच्या लोकांपेक्षा इतकी वेगळी का असते ते आपल्याला समजू शकत नाही. अशी शक्यता आहे की त्यांना तारण्याची तयारी म्हणून, देव त्यांना आकर्षित करत आहे. असं असू शकेल, की तो केवळ या वस्तुस्थितीचा परिपाक आहे की देवाचा कायदा त्यांच्या हृदयांवर लिहिलेला आहे, आणि त्यांची सदसद्विवेकबुद्धि त्यांना पापाच्या परिणामांपासून सावध करत असते. बायबलप्रती अशी आज्ञापालनाची त्यांची वृत्ति का असते हे महत्त्वाचं सत्य नाही. महत्त्वाचं सत्य हे की बायबलप्रती अशी आज्ञापालनाची त्यांची वृत्ति आहे.

आपण लक्षात ठेवलं पाहिजे की कोणीही, केव्हांही, जो देवाच्या कायद्यांचं पालन करतो, तेव्हां तो आध्यात्मिक काम करत असतो. पण ते काम कधीच त्याच्या तारणाला हातभार लावू शकत नाही (इफिसकरांस पत्र २:८–९). तारण फक्त निवडलेल्यांनाच मिळेल, आणि निवडण्याचा मामला सर्वस्वी देवाचा मामला आहे. म्हणूनच देव बायबलच्या श्रवणाखाली असलेल्या एखाद्या तान्ह्या मुलाला किंवा मानसिकदृष्ट्या सर्वस्वी असमर्थ व्यक्तीला तारू शकतो.

देवाच्या गूढ विधिलिखितामध्ये, तो निवडलेल्यांना अध्यात्मिक कान देतो, जे ईश्वरी वचनाचं प्रत्यक्ष श्रवण करणाऱ्यांपैकी असतात. मत्तय ११:१५ मध्ये आपण वाचतो :

**ज्याला कान आहेत तो ऐको.**

अशा प्रकारे, आपल्याला कळू शकतं की देव, तारणाच्या त्याच्या या गूढ मामल्यामध्ये, लोकांच्याबद्दल दोन परस्परविरोधी दृष्टिकोणांमधून बोलतो. एका बाजूला, तो अशा लोकांच्याबद्दल बोलतो, जे सुवार्तेच्या प्रत्यक्ष श्रवणाखाली असतात, आणि ज्यांच्याकडे ईश्वरी वचन समजून घेण्याचं किंचितसं जरी सामर्थ्य असेल, तरी ते बायबलचं आज्ञापालन करण्याचा प्रयत्न करतील. त्यांच्या आज्ञापालनात, ते देवाच्या दयेसाठी प्रार्थना करत असतात; ते देवाची धीरानं प्रतीक्षा करत असतात, आणि अशी आशा करत असतात की कदाचित ते पण तारले जातील. त्यांच्या आज्ञापालनाच्या इच्छेमध्ये, ते निदान अशा वातावरणात असतात (म्हणजे बायबल) ज्यात देवाची तशी इच्छा असेल, तर तो त्यांना तारेल.

उलटपक्षी, जे लोक ईश्वरी वचनाच्या प्रत्यक्ष श्रवणाखाली असतात, पण जे ईश्वरी वचनाचं पालन करण्याची विनम्र इच्छा ठेवून वचन ऐकणार नाहीत, अशा लोकांना देव पुष्कळ सावधगिरीच्या सूचना देतो. त्यांच्या कृतींमुळे, ते परिणामकरीत्या असं दर्शवीत आहेत की ते ईश्वरी वचनाचा तिरस्कार करतात. देव वारंवार सावध करतो की अशा कृती जर चालू राहिल्या, तर त्यांचा शेवट पूर्ण लज्जास्पद शिक्षेत, शापात, वतन गमाविण्यात, आणि मृत्यूत होईल, जे सर्व पापाच्या विरोधातील देवाच्या कोपाचा भाग असतात.

ही गर्वाची, अहंकाराची, स्वाभिमानाची किंवा स्वतःबद्दल चांगलं मत असण्याची वेळ नाही. ही अध्यात्मिक श्रेष्ठतेची किंवा अध्यात्मिक उद्धटपणाची वेळ नाही. ही अशी वेळ आहे जेव्हां आपण बायबलचा आपल्या आयुष्यांवरील पूर्ण अधिकार सर्वस्वी मान्य केला पाहिजे, आणि म्हणून, देव आज आपल्यापैकी प्रत्येकाला जे सांगत आहे, त्याच्याकडे आपण काळजीपूर्वकपणे लक्ष दिलं पहिजे.

ही अशी वेळ आहे जेव्हां प्रत्येकानं त्याच्या पापाची लज्जा, आणि त्याच्या पापांमुळे तो देवाच्या कोपाच्या पूर्ण मापाला लायक असल्याची खात्री, पूर्णपणे ओळखली पाहिजे. विनम्रपणे देवाकडे त्याच्या दयेची याचना करण्याची ही वेळ आहे, ज्या दयेला आपण पात्र नाही आहोत. ही अशी वेळ आहे, जेव्हां आपल्यापैकी प्रत्येकानं ओळखलं पाहिजे की देव दयाळू आहे. त्याची अविश्वसनीय दया आपल्या लायकीपेक्षा किंवा आपल्या कल्पनेपेक्षा, खूपच जास्त आहे.

आज, त्याच्या महान आणि अद्‌भुत दयेमध्ये, देव लोकांच्या मोठ्या समुदायाला तारत आहे. म्हणून, हे शक्य आहे की जसा आपल्यापैकी कोणीही दयेची याचना करतो तसे, जर आपण आधीच तारले गेलो नसू तर, आपला त्या मोठ्या जनसमुदायात समावेश होऊ शकेल, जो कोणाही माणसाला मोजता येत नाही.

**मोठा प्रश्न हा आहे** : जेव्हां तुम्ही तुमच्या लज्जास्पद आज्ञाभंगाचा आणि देवाच्या कायद्यांच्या विरोधातील तुमच्या बंडाचा विचार करता, तेव्हां तुम्ही तारणाला अजिबात लायक नाही आहात, हे तुम्हाला पूर्णपणे माहीत असतांना सुद्धा, तुम्ही देवाकडे विनम्रपणे तारणासाठी याचना करत आहात काय? निनवेतील लोक लक्षात ठेवा (योना ३:६–१०).

**आपल्यापैकी प्रत्येकावर देव दया करो!**